शनिवार
२१ डिसेंबर १९७४
एक रुपया

# माणूस

आजमितीला नेमीचंद बिहारीलाल या कंपनीच्या कलकत्ता, दिल्ली व मुंबईशिवाय हाँगकाँग, कुवेत व दुबाई येथे शाखा आहेत. वर्षाला ५०।६० कोटींची उलाढाल चालू आहे. मूळचा खुशालचेंडू, पण वडिलोपार्जित आलेला जहरी कावेबाजपणा अंगात मुरलेला खूबचंद आता अधिक पैसा मिळविण्याच्या पलिकडे गेला आहे. आता त्याला स्वतःच्या साम्राज्याच्या बळावर इतर साम्राज्ये उलथून पाडायची आहेत. इतर साम्राज्यांना खिंडारे पाडायची आहेत. त्यांचे चावे घ्यायचे आहेत. माझ्या साम्राज्याचा शब्द सगळीकडे चालतो हे सिद्ध करताना तो कोणताही विधिनिषेध पाळत नाही. विक्रीकर आणि आयकर यांच्या कमिशनरपदीसुद्धा खूबचंदच्या पसंतीची व्यक्ती येते. जॉईंटप्लँट कमिटीपासून ते डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज या पदापर्यंत खूबचंद शेठचीच हुकमत चालते, अशी बोलवा ऐकू येते....

या खूबचंदची एक करामत
पोलाद....

मिळविले दोनशे रुपये टन या भावाने
विकले चौदाशे रुपये टन या भावाने
सरकारी अधिकाऱ्यांना
गुडघे टेकायला लावून....

## पार्कस्ट्रीटवरील शार्क
## एक तस्करकथा

# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २१ डिसेंबर | अंक : तिसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


## सातपुड्याच्या अंतर्भागातील पटविरोधी आंदोलन

☐ आपणास थोडी तसदी देत आहोत त्याबद्दल क्षमा करावी. भारत स्वतंत्र होऊन आता पंचवीसचे वर वर्षे झालीत. परंतु आदिवासी लोकांना स्वातंत्र्य काय आहे याची जाणीव झाली असे म्हणता येणार नाही. त्यात या सातपुड्यातील आम्हा लोकांची स्थिती तर विशेषच चिंताजनक म्हणावी लागेल. इतर बाबी जाऊ द्या. परंतु येथील जंगल अजून चिफ्टन सरकारच्या मालकीचे असून त्या जंगलाचा सत्यनाश होत आहे. शिवाय आम्ही गरीब आदिवासी शेतकरी हजारो वर्षांचे येथील रहिवासी असून व जमिनी आमच्या मालकीच्या असून आम्हाला आता शेतसाऱ्याच्या ऐंशीपट, चाळीस पट अशी पट भरून मालक बनण्याचा नवीन आदेश तहसीलदार-कडून मिळणार आहे. काही लोकांना नोटिसा दिल्या गेल्या आहेत. इंग्रज गेले, संस्थानिक गेले. परंतु या काठी भागातील चिफ्टन सरकार मात्र आजही हम करे सो कायदा असे वागत आहे व बळ-जबरीने पट वसूल करण्याचे मनसुबे रचीत आहे. अत्यंत दु:खाची गोष्ट अशी, की महाराष्ट्र शासन आपल्या तहसीलदाराकडून ही वसुली करणार असल्याचे ऐकतो. त्यासाठी पंधरा तहसीलदाराच्या नेमणुकाही झाल्या आहेत. हे सर्व आता अगदी असह्य झाले आहे. जनता आता पट मुळीच भरणार नाही. मागे एकदा पटीची रक्कम व मुशाहिरा इ. कर आमच्या पूर्वजांनी चिफ्टन सरकारला अगो-दरच भरलेला आहे. म्हणून विलीनीकरणानंतरही अस्तित्वात असलेल्या चिफ्टन सरकारला पुन्हा जमिनीची पट भरण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तेव्हा पट विरोधी-आंदोलनाने संबंध अप्परकाठी भागात पेट घेतला आहे. इतरही सात आठ चिफ्टन आहेत. अक्कलकुवा तालुका नवलपूर, सिंगपूरनाला रायसिंगपूर; काठी संस्थान सर्वात मोठे आहे. अशा पाच संस्थानाचा बनविला आहे.

हायकोर्टात चिफ्टन व महाराष्ट्र शासन या प्रकरणी हरले आहे शासनाला स्टे मिळाला नाही. परंतु सुप्रीम कोर्टात अपील दाखल आहे. त्यालाही सात वर्षे झाली. आणि आता ही वसुलीची हवा. आम्ही पट न भरण्याचा निश्चय केला आहे. परिणाम काहीही होवो, लोक जेलमध्ये जाण्यास तयार आहेत. पण जमीन सोडणार नाहीत व पटही भरणार नाहीत

आपण स्वराज्यासाठी बारडोली सारख्या चळवळी केल्या पण आता काठी भागात तशाच चळवळी पेटत आहेत. आपण एकदा अवश्य इकडे यावे व लोकांचा उत्साह वाढवावा.

**जे. वे. पाडवी, अध्यक्ष**
पट निवारण समिती, जमाना, ता. धडगाव, जि. धुळे

☐ 'माणूस'च्या दिवाळी अंकातील पुष्पा भावे यांच्या 'चेहरे' या लेखातील 'दिलीप ज्या नाटककाराचे नाटक सध्या दिग्दर्शित करीत आहे त्या अच्युत वझे यांचा आणि 'उन्मेष' या संस्थेचा परिचय म्हणजे आजच्या मुंबईतील तरुण रंगमंचाशी परिचय होय' हे विधान आक्षेपार्ह वाटते.

ह्या विधानाचा सरळ सरळ अर्थ असा आहे की अच्युत वझे आणि उन्मेष ह्यांचा परिचय आजच्या मुंबईतील तरुण रंगमंचाशी संपूर्ण ओळख करून देण्यास पुरेसा आहे. थोडा खोलवर विचार केला तर असं आढळून येईल की वरील विधानातील शेवटच्या काही शब्दांचा अर्थ अथवा व्याख्या इतरांना ज्या अभिप्रेत आहेत त्याच जर बाईंना असतील तर (उदा. आजच्या, मुंबईतील, तरुण रंगमंच, वगैरे वगैरे) हे अनेक इतर व्यक्ती आणि संस्था ह्यांना जाणूनबुजून डावलण्यासारखे आहे.

बाईंनी ज्यांचा उल्लेख केला आहे त्यांचा तरुण रंगमंचाशी असलेला संबंध निश्चितच मान्य केला पाहिजे. परंतु त्यांच्या बरोबरच तरुण रंगमंचाशी निगडीत असलेल्या इतर व्यक्ती व संस्था ह्यांचे कार्य दुर्लक्षून चालणार नाही. ह्या सर्वांचा परिचय बाईंनी करून द्यावा असा माझा आग्रह नाही. परंतु वरील विधाना-मुळे इतर कुणाचे तरुण रंगमंचाशी नाते नाही हा जो गैरसमज पसरण्याची शक्यता आहे ती लक्षात घेऊन आणि इतर चळवळींच्या तरुणांची धडपड व्यर्थ व नाउमेद होऊ नये म्हणून हा आक्षेप.

**दीपक राणे, मुंबई**

☐ झोप येत नव्हती.
वाचण्यासाठी काही शोधीत होतो. 'माणूस'चा अंक हाती आला.
उघडला तर समोर 'सोलकढी'
अजित लक्ष्मण वाडेकर व अमेरिकेचे ३८ राष्ट्राध्यक्ष वाचले.
डोक्याला कडकडून मुंग्या आल्या.
जुने अंक काढून 'सोलकढी' वाचणे आले.
हे अनंतराव कोण ? त्यांना आपला रामराम कळवा.

१९-१०-७४ **विनायक पाटील, निफाड**

▫ श्री. पारगावकर यांनी श्री. माडीवाले याची घेतलेली मुलाखत वाचली. (३० नोव्हेंबर अक) 'माणूसने' एका नवीन विषयाला चालना दिली याबद्दल अभिनदन! त्यातील काही शका अशा, महाविद्यालयात गहाळ होणाऱ्या ग्रथाचे प्रमाण किती? ग्रथ गहाळ झाल्यानतर सेवकाकडून त्याची भरपाई घेण्याची पद्धत काय? श्री. पारगावकरानी आणखी यावर लिहावे! नियम मोडून ग्रथ दिल्यास त्याचा वाचकाला (त्याचे दृष्टीने) फायदा होतो! परतु सेवकाची सुद्धा कुचबणा होते असा आम्हा ग्रथालयीन कर्मचाऱ्याचा अनुभव!

तूर्तास एवढेच.

४–१२–७४ न. व. नायगावकर, वाई

## सही कर नाही तर खालसा करतो

▫ सध्या शासनातर्फे आदिवासीच्या जमिनीबाबत चौकशी करण्यासाठी जे तहसीलदार शासनातर्फे नेमले गेले आहेत, त्याच्याकडे फक्त चौकशी करण्याचे व आदिवासी देतील तो जबाब लिहून घेण्याचे काम सोपविले आहे. परतु काही तहसीलदार चिफ्टन लोकाच्या दबावामुळे आदिवासी लोकाकडून नोटिशीवर सह्या घेण्याच्या बाबतीत दरडावणे, धाकपपटशा दाखविणे, त्यानी नोटिशीवर सही न केल्यास "तुझी जमीन आत्ताच्या आत्ता खालसा करतो' अशी धमकावणी देत आहेत व बळजबरीने हात धरून अगठा करून घेतात. वास्तविक नोटीस बजाविण्याचे काम कामदाराचे आहे.

जे या उपरही नोटीस घेण्यास तयार नसतात त्याच्या घरावर नोटिसा चिकटविण्याचा प्रयत्न करतात. असा प्रकार तोडीकुड येथे घडल्यावर तेथील लोकानी सर्व नोटिसा गोळा करून त्या तहसिलदाराच्या पिशवीत कोबून दिल्या. आम्ही येथे पिढ्यान् पिढ्या रहात असताना व जमीन आमचीच असताना तुम्ही आम्हाला कूळ किंवा मालक बनविणारे कोण? येथून चालते व्हा—अशी त्याची बोळवण केली.

वाई या गावीही कामगाराने बळजबरीने नोटीस बजाविल्याचे वृत्त आहे. अनेक गावी चिफ्टनचे लोक आणि तहसिलदार सगनमताने गरीब अज्ञानी जनतेवर दडपण आणणे, धाकदपटशा करणे, दरडावणे, धमकावणे व जमीन खालसा करण्याची भीती दाखविणे असे प्रकार करीत असल्याने जनतेने चौकशी कमिटीवर बहिष्कार घालण्याचे ठरविले आहे व चौकशी अधिकाऱ्याने बोलाविले तरी जायचे नाही, गावी आले तरी नोटिसा घ्यायच्या नाहीत असे ठरविले आहे. शासनाने चौकशी करणाऱ्या ह्या तहसिलदाराचे काम तावडतोब थाबविण्याचे आदेश काढावेत अशी जनतेची मागणी आहे. श्री. जेकमसिंह पाडवी, श्री. भाऊ मुदडा, श्री. रूपसिंह तडवी गावोगाव प्रचार करीत आहेत.

अक्कलकुवा — उल्हास पूर्णपात्रे
३–१२–७४ सघर्ष समितीतर्फे

**शहाद्यातील आदिवासी उठावाची चळवळ थंडावली असा प्रचार विरोधी गटांकडून अधूनमधून चालू असतो. शहाद्यातील कार्यकर्ते कशाप्रकारे काम करीत आहेत याची थोडीफार कल्पना खाली दिलेल्या अहवालांवरून येऊ शकेल. दरमहा असे अहवाल चळवळीशी संबंधित असणाऱ्या सर्वांकडे नियमितपणे पाठविले जात असतात.....**

## माहे सप्टेंबर

या काळात महाराष्ट्र सरकारचे शेती धोरण फसल्याचे इदिरा गांधीनी जाहीर केले. खताचे भोगळ वाटप, बियाण्यातील भेसळ यामुळे येथील शेतकरी वैतागलेलाच होता. पाऊस व्यवस्थित नसल्यामुळे शेतीत फारसे काम नव्हते. वसतराव नाईकानी रोजगार हमीची धाडसी योजना जाहीर केली. स्मगलर्सला अटका सुरू झाल्या, मिसाखाली राजकीय कार्यकर्तेही अटकेत जात होते. मुबई पुण्याकडचे मत्र्याचे घेराव, बिहारचे आदोलन, बगालच्या राजकीय कैद्याचा छळ गाजत होता. येथे पीक सरक्षण सोसायट्या डोके वर काढू पहात होत्या. धान्याचे भाव वाढत होते आणि जिल्ह्याचे पुढारी जिल्हा बँकेच्या निकडणुकासाठी जिपा, गाड्या, वर्तमानपत्रे विकत घेऊन धुरळा उडवीत होते. जगल भागात एस. आर. पी. होतेच. त्याचे अत्याचार तुरळक येत होते. वडगाग तालुक्यातील लोकावरच्या प्रचड अन्यायाविरुद्ध सभा सघटित झाली. रामपूरच्या एस. आर. पी.नी फसवून आपले कार्यकर्ते किरसिंग मोरे यांच्यावर हल्ला केला. शहाद्याला एस. आर. पी. विरुद्ध मोर्चा झाला.

या धकाधकीतच कार्यकर्ते अती ताण व निष्काळजीपणा यामुळे आजारी पडत होते. खेड्यावरची तरुण मडळाची मुले व असलेले कार्यकर्ते याच्या प्रयत्नाने कामे सुरळीत चालू ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. गणपतीची स्थापना याच काळात झाली या महिन्यातील कालखड आता विषयवारी देत आहोत.

मांडवी, ता. अक्राणी महाल (धडगाव) येथे धडगाव सातपुडा सर्वोदय मडळाने सभा आयोजित केली होती. त्यात आपले कार्यकर्ते सहभागी झाले होते. या सभेला छायाताई (सुमनवती), सुभाष मोरे, मुरीबाई व इतर कार्यकर्ते गेले होते. या सभेत अक्राणी महाल या जगल जमिनीचा प्रश्न हाताळण्याचे सातपुडा सर्वोदय मडळाने जाहीर केले.

दि. सप्टेंबर रोजी शहाणे, ता. शहादा, चद्रकांत भडारी, आमदार (कॉंग्रेस) याच्या गावी एस. आर. पी. अत्याचाराविरुद्ध निषेध मोर्चा व सभा झाली. एस. आर. पी. नी आमदाराच्या सल्ल्याने अन्याय करणे, सघटनेच्या कार्यकर्त्यांना शिवीगाळ करणे, धमक्या देणे याचा निषेध झाला व एस. आर. पी. ना अन्याय गप्प राहून सहन केले जाणार नाहीत याची कल्पना आली. शहादे परिसरात

पृष्ठ ३१ वर



आसपास

## सौजन्य व स्वयंभाव यांची जुगलबंदी

# शंवाकीय सोहळा

**आर.** एस. व्ही. पी. नमुन्याचे आमंत्रण आले की थोडी भीती वाटते आणि थोडा आढयतापूर्ण आनंद होतो. आपण येणार असल्याचे आगाऊ कळवा, पाच मिनिटे अगोदर येऊन आसनस्थ व्हावे, अशा अपेक्षा आपणाकडून ठेवण्याइतके आपण कोणी आहोत ही जी जाणीव आहे ती सुखावणारी आहे. पण त्या समारंभात आपण कसेतरीच दिसू या अनुभवसिद्ध खात्रीने थोडे कसेसेच होते हेही खरे.

आमंत्रण होते किर्लोस्कर प्रेसचे. किर्लोस्कर मासिकांच्या परिवारात मी तशी दहा–बारा वर्षे काढली आहेत. वर्षानुवर्षे 'सदरे' चालवण्यापासून ते एक तासाच्या पूर्वसूचनेवरून नागपूर वगैरे ठिकाणी धडपडत जाऊन किर्लोस्करसाठी खास लेख–मुलाखतीचे काम करण्यापर्यंत सर्व काही केले आहे. मुकुंदराव किर्लोस्करांशी तासंतास गप्पा मारल्या आहेत तर साहेब कामात आहेत असाही निरोप ऐकलेला आहे. मनोहरचे दत्ता सराफ चार ठिकाणी माझा शोध घेऊन मी जेथे असेन तेथे धाडकन गाडी घेऊन हजर झालेले आहेत. संपादक–लेखक यांच्यात होऊ शकणारी सर्व प्रकारची भांडणे मी व किर्लोस्कर प्रेसमधील संपादक मंडळी यांच्यात झालेली आहेत. थोडक्यात म्हणजे दोन नातेवाईकांचे संबंध जसे सर्व अवस्थांतून जाऊन काही औरच असा निबरटपणा धारण करतात तसा हा प्रकार आहे. तरी निमंत्रण आले ते कडक फॉर्मलपणाने !

समारंभ होता शं. वा. किर्लोस्कर यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनाचा. सायंकाळी सहा वाजता. कोणत्याही सभेच्या ठिकाणी मी अर्धा तास अगोदर जातो. चार ओळखीची मंडळी भेटतात–गप्पा झडतात–काही निष्पाप टिंगलटवाळी होते. वेळ बरा जातो. त्याप्रमाणे वीस एक मिनिटे आधी किर्लोस्कर प्रेसच्या दारात पोहोचलो.

मुख्य दारातून आत समारंभ–स्थळापर्यंत दहा पावलांच्या टप्प्यांवर, उजव्या हाताला पुरुष व डाव्या हाताला स्त्री असे स्वागत–स्वयंसेवक होते. अशी किमान पाच तरी स्वागत–जोडपी अभिवादन करीत होती. पाच दुणे दहा नमस्कार करीत आत पोहोचेपर्यंत आपल्या डोक्यावर गांधी टोपी वगैरे आहे किंवा काय अशी (बदनामीकारक) शंका छळू लागली होती. सलामीला भेटले दत्ता सराफ. दोन एक मिनिटात आमच्या एका कॉमन मित्राबद्दल काही निरोप सांगून पाठीवर थाप–हातात हात रुटिन उरकून सराफ मुरारबाजीप्रमाणे आणखी काही 'गेस्ट' लढविण्यासाठी 'मोर्चेबंद' झाले. पुढील दहा मिनिटात अनेक परिचित भेटले. 'वा वा वा – या या या' हे एकाद्या आफ्रिकन टोळीच्या राष्ट्रगीताप्रमाणे वाटणारे धृपद हवेत घुमत होते. तेथील सौजन्याचा माझ्यावरही बराच परिणाम होऊन काही वेळ मी स्वागत–समितीतच सामील होऊन सौजन्याचे फवारे उधळीत होतो.

समारंभ-स्थळ अत्यंत टापटिपीने सजवलेले होते. आख्खा किर्लोस्कर प्रेस–म्हणजे त्यातील मंडळी–स्वागत सौध बनून गेला होता. ल. ना. गोखले कुठूनसे आले आणि माझा एक मोकळा हात पकडून (दुसऱ्या हाताने मी आणखी कोणाशी तरी हस्तांदोलन करीत होतो.) म्हणाले, 'चला कोठे तरी बसून घेऊ.'

बसलो–तसा मी एका ठिकाणी बसणारा नव्हे. ल. नां. शी हलक्या आवाजात गप्पा मारीत असता हळूहळू सगळे समास्थान भरून गेले. कोण कोण होते हे सांगण्यात कागदाचा उगाच, अपव्यय कशाला ? पुण्यातले सगळे 'इलाईट' तेथे गोळा झाले होते.

मग मुकुंदराव–पुंडलिक–पु. ग. सहस्रबुद्धे–गदिमा यांची भाषणे होऊन 'शंवाकीय' या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले.

सजग वाचक म्हणतील असे का ? सर्व समारंभाचे वर्णन एका ओळीत उरकायचे होते तर आधी एवढे पाल्हाळ का लावले ? सांगतो.

त्यावेळी झालेली भाषणे सविस्तर येऊन गेलेली आहेत हे एक आणि दुसरे म्हणजे प्रत्यक्ष सभेचे वर्णन नेमकेपणाने करणे महा

कर्म कठीण आहे.

झाले काय की संयोजक, प्रमुख पाहुणे आणि दोन प्रमुख वक्ते याच्या परस्पराकडूनच्या अपेक्षा व त्यांचे स्वत:चे दृष्टिकोन याचा काही केल्या मेळ बसेना. रिकाम्या देवळात चार पाकोळ्या एकमेकाभोवती फिरत रहाव्यात असे सारे चालले होते.

गदिमाचे उदाहरण घ्या. त्याना येथे प्रमुख पाहुणे का केले, तर ते म्हणे औंध संस्थानचे नागरिक म्हणून. आता औंध संस्थानचे इतर नागरिक काय थोडे असतील ? मुकुंदरावानी आपल्या भाषणात हे औंध-नागरिक प्रकरण काहीशा विनोदाने काढले. मग गदिमानाही हे स्पष्टीकरण स्वीकारण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. पण मनातून ते अस्वस्थ झाले होते हे निश्चित. याच धर्तीवर सारा व्यवहार झाला-ताकाला जाऊन भाडे लपविणे असे काहीतरी याला *मराठीत म्हणतात.*

मुकुंदरावाची अपेक्षा होती, प्रमुख वक्त्यांनी 'शवाकीय'च्या साहित्यिक व वैचारिक संपन्नतेचा आलेख मांडावा. डॉ. विद्याधर पुंडलिक व डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे या प्रमुख वक्त्याना दुर्दैवाने या पुस्तकात तसे काहीच आढळले नव्हते. मग पुंडलिकानी 'पुस्तक सामान्य पण माणूस मोठा' असे सूत्र ठेवले तर पु. ग. नी शवाकिंच्या तीन कार्यक्षेत्रातील कामगिरीचे, एकाद्या परीक्षेतील प्रश्नाचे उत्तर लिहून द्यावे तसे फारच मुद्देसूद विवेचन केले या दोघाची तशी फार नाजुक अवस्था झाली. पुंडलिकाना पुस्तकात 'साहित्यिक' काही दिसेना तर पु. गं. ना त्यात 'वैचारिक' काही दिसेना. दोघानीही 'शंवाकि' मोठा माणूस असे म्हणून सुस्कारा टाकून श्रोत्याची रजा घेतली.

शं. वा. किर्लोस्करासारख्या बलदंड संपादकाच्या आत्मचरित्राला 'ऑडिटरचा एफिशियंट रिपोर्ट- रकान्यात नीट भरलेला तपशील' वगैरे म्हणण्याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला.

गदिमानीं डॉ. पुंडलीक यांची, संपूर्ण भाषणात एकूण तीन वेळा क्षमा मागितली व त्यांनी मांडलेले मुद्दे साफ खोडून काढले. डॉ. पुंडलीक जरा अस्वस्थ झाले. (सभेनंतर काही दिलजमाई झाली असे ऐकतो.)

'शंवाकीय' हे साहित्यिक दृष्ट्या उत्तम पुस्तक आहे' असा ठाम निष्कर्ष काढून गदिमानी भाषण संपविले.

या सभेचे पडसाद पुण्याच्या साहित्यिक वर्तुळात अजूनही उठत आहेत.

सर्वंकष सौजन्याच्या वातावरणात सुरू झालेला समारंभ शेवटी असा चिरचिरा का झाला ?- त्याबद्दल काही म्हणण्यापूर्वी एक, लक्षात राहिलेली गोष्ट नोंदवून ठेवतो.

सभेच्या शेवटी शंकरभाऊंचे ध्वनिमुद्रित भाषण ऐकण्यात आले. शंकरभाऊंची एक दोन वाक्ये झाल्यावर शंतनुराव किर्लोस्कर आपल्या लव्याजम्यासह भर सभेतून उठून गेले. ते ध्वनिमुद्रित भाषण जेमतेम दहा मिनिटाचे असेल. पन्नास वर्षाच्या आपल्या सहकारी सुहृदाचे चार शब्द ऐकण्यासाठीही शंतनुराव दहा मिनिटे थांबू शकले नाहीत ?

तसे अगदी औपचारिकपणे पाहिले तर समारंभ सुविहित झाला. पण वरवर पहाणा-*राला*ही *या ठिकाणी तरळत असलेल्या* सौजन्याच्या खाली असलेला स्वयंभावाचा निखारा जाणवल्याखेरीज राहिला नाही. हा स्वयभाव होता संपादकांचा, लेखकाचा, विचारवंताचा, उद्योगपतीचा- कवीचा !

या ठिकाणच्या व्यक्तिविशेषांमुळेच असे घडले असे मी मानीत नाही. मी शेकडो सभा पाहिल्या आहेत. दहा पासून ते हजारापर्यंतचे समूह एकत्र वावरताना पाहिले आहेत. दहा माणसे एकत्र आल्यावर कसे अनपेक्षित वातावरण निर्माण होते व कशी अनपेक्षित वळणे घेते हे या ठिकाणी पुन्हा पाहिले एवढेच.

व्यासपीठावरील मंडळींनी एकमेकांना खोडून काढण्याची नवीनच (की जुनी कोणास ठाऊक) परंपरा पुण्या-मुबईत पडत आहे काय ? -ऐतिहासिक चव्हाण-दांडेकर वादाच्या सभेस मी हजर होतो. चव्हाणाच्या चेहऱ्यावर होणारे सूक्ष्म बदल मी नोंदले आहेत आणि वाचकापर्यंत पोहोचविले आहेत. सभा-समेलने-परिसंवाद-भाषणे या ठिकाणच्या 'वा-वा-वा, या-या-या' या सौजन्यसूक्ता मागील आदि मानवी आविर्भावाची धार आणि धग जवळून लावून पाहिली आहे.

हे सारे अपरिहार्यच असेल का ?

कोणत्याही क्षेत्रातील 'यशस्वी' मंडळी व अशी वारवार एकत्र येणार-आणि एक प्रकारचा 'बुलंद' स्वयभाव असल्याखेरीज कोणी यशस्वी होत नसतो.

'शवाकीय' समारंभातही हे सारे पुन्हा पाहिले. काहीशा विषण्ण-तटस्थ मनाने.

आणखीही एक दोन गोष्टी जाणवल्या. 'स्पोकन वर्ड' हे माध्यम मुळातच काही मर्यादा असलेले आहे का ? शवाकींनी अर्धशतक आपले कर्तृत्व गाजवले-त्याची नोंद करण्यासाठी अर्धा तप पद्धतशीर कष्ट केले. या साऱ्याचा न्यायपूर्ण परामर्श दोन तासात घेणे कसे शक्य आहे ? मुकुंदरावानी सुरुवातीसच तशी अपेक्षा नाही हे स्पष्ट केले होते. तरी पुढची अस्वस्थकारक परिस्थिती टळू शकली नाही. का ? त्याची कारणे स्पोकन वर्डच्या मर्यादेत असावीत. स्पोकन वर्डला स्वत:ची अशी गती आहे-दिशा आहे. प्रत्यक्ष वक्त्याच्या नियंत्रणाखाली देखील ही गती दिशा राहते असे वाटत नाही. 'बोलला *जाणारा शब्द' हा असतो सामान्याच्या* पातळीवरचा बटबटीत, ढोबळ पण ऐट मात्र आणतो अक्षरकळेची, या ऐटीत त्याला आधार घ्यावा लागतो भावनेचा आणि विनोदाचा ! हे दोन्ही आधार फार बेभरवशाचे ठरू शकतात.

स्पोकन वर्डचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तो वक्त्याचा स्वयभाव सेकदासेकदाला जणू गोंजारीत रहातो. रिटन वर्डचे तसे नसते. असा गोंजारला गेला की स्वयभाव आणखी मागण्या करू लागतो. वेगळेपणा, चतुरपणा इत्यादीची खंडणी मागत सुटतो.

मग उभे रहाते ते सौजन्याची चिलखते चढविलेल्या स्वयभावांचे द्वंद्वयुद्ध. ते चालत रहाते *लखनऊच्या नबाबी 'पहिले आप-पहिले आप'* थाटात. श्रोतेही अशा वेळी बनून जातात सूर्याची प्रतिबिंबे गर्वाने वागविणाऱ्या असंख्य छोट्या आरशासारखे !

सभा-भाषणे यांना एक विलोरी बेबंदपणा येतो ते बहुधा या सगळ्या अंत स्त्रोतांमुळेच ! यातही एक वेगळी शान आहे वेगळी नशा आहे !

तर असा हा 'शवाकीय' प्रकाशन समारंभ- पुण्यामधील सभा- कार्यक्रमांच्या भाऊगर्दीतही उठून दिसणारा !

-चंद्रशेखर

# आनंदवन, अशोकवन, सोमनाथ, नागपल्ली
# आणि आता मुक्काम हेमलकसा

## बाबा आमटे यांच्या नव्या कार्यक्षेत्राचा परिचय

चंद्रपूरच्या घनदाट जंगलातील अगदी interior मध्ये असलेले गोंड-माडिया हे सुसंस्कृत जगापासून अजून अनेक योजने दूर आहेत. अद्यापही ते अश्मयुगातच आहेत. त्यांची वस्ती सुमारे ३०–३५ हजार. ह्या भागात रस्ते नाहीत. बैलगाडीखेरीज दळणवळणाचे साधन नाही. पोस्ट, टेलिग्राफ, टेलिफोन ह्या सुविधा अर्थातच नाहीत. वर्तमानपत्रे त्यामुळे मिळत नाहीत. जूनपासून डिसेंबरपर्यंत तर बाहेरच्या सगळ्या जगापासून हा प्रदेश cut off च होतो. पावसाळ्यात तर रस्त्यावरच्या चिखलामुळे बैलगाड्यादेखील जाऊ शकत नाहीत. पायी जाणे येवढाच मार्ग. मध्ये पर्लकोटा, पामूल गौतमी, इद्रावती, प्राणहिता अशा मोठाल्या नद्या आहेत. नद्यांवर कुठेच पूल नाहीत. पावसाळ्यात त्या दुथडी भरून वाहात असतात. त्यामुळे पट्टीचा पोहणाराच काय तो पार करून जाऊ शकतो. एरवी घरातील मनुष्याचा मृत्यु झाला तरी त्याची खबरबात १५०–२०० मैलांवरच्या चद्रपूरपर्यंत जाणे देखील कठीण. पूल फक्त वैनगंगेवर आहे. पण पावसाळ्यात पुलावरुन पाणी वाहात जाते, व रहदारी कित्येक दिवस खोळबून राहाते. शिवाय लहानमोठे असंख्य नाले व खळाळणारे झरे आहेत ते वेगळेच. ते देखील कित्येक दिवस अडवून ठेवू शकतात.

एका बाजूने आंध्रची हद्द तर दुसऱ्या बाजूने मध्यप्रदेशचा बस्तर जिल्हा. ह्या प्रदेशात चलनवलन सुरू होते ते जानेवारीपासून Forest च्या जीप्स, ट्रक्स सुरू होतात व मुख्य म्हणजे बल्लारशाच्या पेपर मिलचे ट्रक वाळू व इतर लाकूड नेण्याकरता ह्या प्रदेशात सर्वत्र सचार करू लागतात तेव्हा. आलापल्ली ते भामरागड हा 'राजमार्ग' इतका अरुंद की दोन बाजूने जर ट्रक आले तर एका ट्रकला जंगलात घुसण्याखेरीज मार्ग नाही. रस्त्यात असंख्य खाचखळगे, खड्डे सबध रस्ता हाडं खिळखिळी करणारा. जानेवारीपर्यंत रस्ता सुरू नाही. म्हणून ह्या प्रदेशात जाणे कठीण व पुढे दारु पिऊन बेफाम ट्रक चालवणाऱ्या सारथ्यामुळे जाणे कठीण.

ह्या प्रदेशामध्ये राहाणारे माडिया हे आदीवासीमध्येही बहुधा सर्वात मागासलेले असावेत. शेती करणे त्याना माहीतच नाही. जगल जाळायचे व तिथे धान किंवा कोसरी (बाजरीपेक्षाही खूप बारीक धान्य) फेकून द्यायचे. रोपाची लावणी करणे वगैरे माहीतच नाही. नागरणे, वखरणे पण माहीत नाही. काही दिवस एका जागी शेती करून दुसरीकडे जायचे व पुन्हा तिथले जगल जाळायचे अशी ही शेती–Shifting Agriculture. पाऊसही अत्यत अनियमित. सरासरी ८० इच. यदा पडला फक्त १५ ते २० इच. त्यामुळे धानाचे पीक सपूर्ण गेले. एरवीही अशा शेतीने पीक फारच कमी येते. भाताची किंवा कोसरीची पेज–किंवा शक्य असल्यास भात–मिठाच्या खड्या-बरोबर खायचा हे त्याचे जेवण. गहू, ज्वारी बाजरी माहीतच नाही. भाजीपाला लावणे माहीत नाही. मग खाणे तर दूरच. मात्र वालाला त्यांच्या धार्मिक कार्यात महत्त्व असल्याने वालाचे वेल मात्र प्रत्येक झोपडीवर चढवलेले दिसतात. जगलात असलेली जांभळे, आवळे, चिंच, आंबे (तेही कमीच) ह्या खेरीज फळे माहीत नाहीत. केळं ही देखील अपूर्वाईच. पिठाच्या चक्क्या नाहीत. कारण धान्य दळून पीठ करण्याचे कामच नाही. माडिया जगलातील कदमुळे व झाडपाला खातात. शिवाय ह्या भागात मोहाचे जंगल आहे. ते मोहाची फुले खातात. फळे वाळवून ठेवतात व जेव्हा काहीच शिल्लक राहात नाही तेव्हा ही फळे उकडून खातात. अर्थात हा माडीया सदैव उपाशी-पोटीच. त्यामुळे उदीर, माजर, साप, कावळे, चिमण्या, रानडुकरे, बेडूक, खेकडे जे मिळेल ते खातात. विधि निषेध कशाचाच नाही. झाडावर चढणारे मुगळ्यासारखे जे माकोडे त्यांची चटणी ही तर मेजवानीच. झुरळे पण खातात. त्यांच्या अपेक्षा अत्यंत माफक. भाताच्या पेजेबरोबर, मीठ, मिरची, कांदा, लसूण मिळावे येवढीच. पण कादा, लसूण, मिरची, पिकवणे त्यांना येत नाही व त्यामुळे ह्या भागात घोड्यावरून माल घेऊन व्यापारी येतात व १ किलो तांदूळ त्यांच्याकडून घेऊन १ किलो मीठ माडियांना देतात. किंवा १ किलो तांदुळाच्या बदल्यात ४ कादे. पैशाची अर्थव्यवस्था अजून यायची आहे. अद्याप हा प्रदेश वस्तुविनिमयाच्या (Barter) अवस्थेतच आहे. व्यापारी कमालीचे शोषण करतात. पण ह्या दुर्गम प्रदेशात व्यापारी जातो व त्याना भावाच्या सवा नफा घेऊन का होईना वस्तू पुरवितो ह्याचेच माडियांना उपकार वाटतात.

त्याची घरे म्हणजे गवताच्या अगदी छोट्याशा झोपड्या. त्यात गाडग्यामडक्याखेरीज धातूचे असे एकही भांडे नसते. पुरुष फक्त लगोटी नेसतात व स्त्रिया कमरेला एक फडके गुडाळतात. वरचे सर्व शरीर पूर्ण उघडे. लहान मुलाच्या अगावर तर कपडा नसतोच. मध्यतरी रेणुकाने वरोड्यातील बायकाकडून जुन्या साड्या गोळा करून तिथे नेल्या व त्या बायकाना नेसवून पण दिल्या. पण घरी गेल्यावर त्यानी त्यांचे अनेक तुकडे करून टाकले. कारण साडीसारखी चैन त्याना परवडण्याजोगी नव्हती. त्याचा रग काळा. कडक थडी व कडक उन्हाळा असे विषम हवामान. त्यामुळे व उन्हातान्हात अगावर कपडा नसताना हिंडल्याने त्याची कातडी रापल्यासारखी दिसते. स्त्रिया सबंध चेहराभर गोंदून घेतात. त्यामुळे आपल्याला त्याचे चेहरे मुद्दाम विरुप केल्यासारखे वाटतात. आथरायला, पांघरायला जवळ कपडा नसतोच. अगावरच कपड्याची वानवा तिथे आथरायला काय असणार? थंडीच्या दिवसात जंगलातील लाकूड

आणून शेकोटी पेटवायची व त्याच्या भोवती सर्वांनी झोपायचे–जमीनीवरच–झोपेत कोणी लोळत जाऊन शेकोटीत पडतो व भाजतो. लहान मुले तर अशी नेहमीच भाजतात. कधी अंगावरचे फडके पेट घेते व त्याने हे लोक भाजतात. हेही जणू काही नैसर्गिकच आहे असे मानायची त्यांची प्रवृत्ती. लिहिता वाचता कोणालाच येत नाही. आपला देश स्वतंत्र झाला आहे ह्याची देखील त्यांना कल्पना नाही. देश, धर्म, देवदेवता, साधुसंत ह्या गोष्टी देखील माहीत नाहीत. दारू भरपूर पितात मात्र मटका नाही. काही गावामध्ये शाळा आहेत. पण शाळाना सदैव कुलूपच असते. कारण विद्यार्थी शाळेत जात नाहीत व मास्तरला ह्या भाग म्हणजे अदमानच वाटते. ह्या भागात साहेबाच्या थाटात सायकलवर हिंडणारे म्हणजे फक्त Forest Guards किंवा अनेक गावांना मिळून असलेला पोलीस पाटील हे दोघेही माडियाचे शोषण करीत आले. जंगलाच्या ठेकेदारानी हेच केले. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या प्रत्येकाबद्दल माडियाला अविश्वास वाटतो. बाहेरून येणारा प्रत्येकजण हा आपल्याला लुटायलाच आला आहे अशी आतापर्यंतच्या अनुभवावरून त्यांची झालेली रास्त कल्पना.

स्वातंत्र्य मिळून २७ वर्षे झाली. अनेक पंचवार्षिक योजना झाल्या. धरणे झाली, कारखाने निघाले. विद्यापीठे निघाली. शेतीत हरित व धवल क्रांती झाली. पण कशाचाच पुसटता स्पर्शही ह्या लोकाना झाला नाही. अशा ह्या प्रदेशात ३–४ वर्षांपूर्वी बाबा आमटे प्रथम गेले व त्याना ह्या प्रदेशाने व माडियाने वेडच लावले. हिमालयाची एकाहून एक उंच शिखरे जशी सर करीत जावे त्याप्रमाणे त्यांच्या कर्तृत्वाने आनंदवन, अशोकवन, सोमनाथ, नागेपल्ली व शेवटी ह्या जंगलातील हेमलकसा हे आपले कार्यक्षेत्र निश्चित केले– प्रकृती इतक्या दुर्गम प्रदेशात जायला साथ देत नसतानाही व त्याप्रमाणे १९७३ च्या २३ डिसेंबरला लोक बिरादरी प्रकल्पाची सुरुवात करण्याकरता ते हेमलकशाला जायला निघाले. बरोबर एक ट्रक, थोडेसे सामान व एक तंबू जंगलातच काही ठिकाणी मुक्काम करावे लागले हेमलकशाला पोचल्यावरही थंडीत आकाशाखालीच काही दिवस मुक्काम होता. पण झटपट, गवताच्या २–३ झोपड्या बांधल्या गेल्या. सुरवातीलाच ७–८ वर्षांचा एक माडिया मुलगा आगीत होरपळलेला व फीट आली असताना एका कुत्र्याने मांडी खाऊन आतडी बाहेर आली बाहेत अशा अवस्थेत आला. बाबानी त्याला आपल्याजवळ ठेवून त्याची २ महिने शुश्रूषा केली व इथूनच दवाखान्याला सुरुवात झाली– बाबाच्या मनात नसतानाही– आजूबाजूच्या ५०–७५ मैलांच्या परिसरात दवाखाना नाही. क्वचित सरकारी दवाखाना आहे तर डॉक्टर नाही. ख्रिश्चन मिशनरी मात्र बऱ्याच भागात पोचले आहेत व त्याचे दवाखाने काही भागात आहेत. वास्तविक बाबा काही डॉक्टर नाहीत ते वकील. फक्त महारोगाचा कोर्स त्यानी पुरा केलेला पण सर्वच क्षेत्राप्रमाणे त्याचे वैद्यकीय ज्ञानही अफाट आहे.

दवाखाना सुरू झाला व पेशंटसची संख्या वाढतच राहिली व बाबाना औषधे देत रहावे लागले. हे सर्व काम माणुसकीच्या गहीवरातून चाललेले. ज्यानी महारोग्याच्या जखमातील आळ्या हाताने काढून जखमा धुतल्या आहेत. त्या बाबांना हे काम करणे कठीण नव्हते. पण मग मात्र बाबाना हे मलकशाहून हालता आले नसते. तिथे राहिले तर बाकीच्या Projects कडे कोण लक्ष देणार? पण आता पेशंटची संख्या इतकी वाढत गेली की दवाखाना बंद करणे शक्यच नव्हते. मग काही दिवस बाबाचा मोठा मुलगा डॉ. विकास तिथे जाऊन राहिला पण तो आनंदवनातील महारोग्यांच्या दवाखान्यात काम करीत असल्याने त्याला जास्त दिवस राहाणे शक्य नव्हते. मग आला धाकटा मुलगा प्रकाश. काही दिवसाकरता आलेल्या प्रकाशने आपला M. S. चा कोर्स तसाच अर्धवट सोडून तिथेच स्वतःला रोवून घ्यायचे ठरवले. कारण M. S. च्या डिग्रीपेक्षा ह्या लोकांचे प्राण मोलाचे होते. आपल्या First class करिअरचा विचार प्रकाशसारख्या सहृदय व संस्कारसंपन्न डॉक्टरच्या मनात येणे शक्यच नव्हते. दवाखाना वाढतच चालला. गेल्या ६ महिन्यात आजूबाजूच्या १३० खेड्यातून ३००० पेशंट आले. त्यात मलेरिया पासून टी. बी. महारोगापर्यंतचे सर्व. दवाखान्याला ठराविक वेळ नाही कारण ५०–६० मैलापासूनचे लोक पायी किंवा बैलगाडीतून येतात. पेशंट फारच Serious असला तर खाट उलटी करून त्यात झोपवून ४ जण डोक्यावर घेऊन येतात.

एका गवताच्या झोपडीत दवाखाना, तर जर्मनीने दिलेल्या एका तंबूत ऑपरेशन थेटर– अर्थात फक्त Minor Operations करणेच शक्य. दवाखान्यातील साधनसामुग्री आनंदवनातील महारोग्यानी तयार केलेली. पेशंटबरोबर आलेल्या लोकाना व पेशंटना राहाण्या करता माडियांनीच एक गवताची झोपडी तयार केली– एका दिवसात. त्याला घोटूल असे म्हणतात. पेशंटदेखील जमिनीवर झोपतात. पेशंटना तर जेवण द्यायचेच पण सुरवातीला तर पेशंटबरोबर आलेल्या लोकाना देखील द्यावे लागे. कारण ते उपाशी असताना घरच्या मंडळीना जेवण जात नसे. पण आता मात्र ते शिजवून घेतात. अर्थात त्यांना भांडी, बादल्या हे द्यावे लागतेच.

माडियाना मराठी समजत नाही. तेव्हा डॉक्टरलाच माडिया शिकावी लागली. डॉक्टरच्या रूपाने देवच आला असे माडियाना वाटते. कारण १५०–२०० मैलावरच्या चंद्रपूरच्या दवाखान्यात पेशंटना घेऊन जाणे त्याना शक्यच नव्हते. म्हणजे मृत्यू ठरलेलाच. येणारे पेशंट अशा अन्नान्नदशेतले की त्याना फी देणे शक्य नाही. त्यामुळे ह्या दवाखान्यास जमेची बाजू कधीच नाही. सतत खर्चच होत राहाणार. डॉक्टरची राहाणी व माडियाची राहाणी ह्यातील अंतरही कमीच. खादीची हाफ पॅंट व शर्ट हा प्रकाशचा पोषाख मडियाजवळ नाही म्हणून थडीतही हा स्वेटर वापरीत नाही. मच्छरदाणी लावीत नाही. बाबाची कन्या रेणुका व नागेश हटकर हे मुंबईचा आपला उत्तम स्थितीत चाललेला फोटोग्राफीचा धंदा सोडून हेमलकशाला जाऊन राहिलेले. दोघानाही वैद्यकीय शिक्षण व अनुभव नाही. पण दोघामध्येही डॉक्टरइतकीच सेवावृत्ती, तळमळ व सहृदयता. आलेल्या Patients ना आंघोळ घालण्यापासून त्याचे कपडे धुण्यापर्यंत सर्व कामे हे तिघे करतात. औषधोपचार करतात हे तर सांगायला नकोच. पेशंट बरा होऊन घरी गेला की अज्ञान व दारिद्र्य ह्यामुळेच त्याची कोणत्याच प्रकारे काळजी घेतली जात नही आधी माडियाचा डॉक्टरवर विश्वास नाही. मंत्र तंत्र, अंगारे-धुपारे, भगत, रानातला पाला हे सर्व उपाय झाल्यानंतर ते डॉक्टर-

कडे येतात. ह्यावेळी बहुधा दुखणे विकोपालाच गेलेले असते. म्हणजे डॉक्टरच्या पदरात अपयश येण्याचीच शक्यता जास्त. इथे काम करणाऱ्या डॉक्टरची कसोटीच आहे. ह्या कसोटीला इथला डॉक्टर आणि त्याचे मदतनीस उतरले आहेत ह्याचा पुरावा म्हणजे रोग्यांची सतत वाढत जाणारी सख्या.

सकाळी ७ पासून संध्याकाळी ६ पर्यंत काम चालूच असते. ह्यानतर मात्र हेमलकशाचे सौंदर्य एकदम सपल्यासारखे वाटते ते दुसऱ्या दिवशी उजाडेपर्यंत. सभोवतालची घनदाट जगल. रातकिडचांचा किर्र आवाज. चिमणीचा मिणमिणता प्रकाश. बाकी सभोवार गडद काळोख. हेमलकसा हे जे छोटेसे खेडे ती वस्ती देखील २ मैलावर. जेवणे संध्याकाळी ७ पर्यंत उरकून अजीत, नागेश, प्रकाश, रेणुका कल्याण व पडीत हे सर्व शेकोटी पेटवून त्याच्याभोवती बसतात तेव्हा आल्बर्ट श्वाईटझर ऑफ्रिकेच्या जगलात काम करायला गेले त्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. गप्पा तरी काय करायच्या? बाहेरच्या जगात काय चालले ते कळायला काही साधन नाही. पोस्ट ऑफीस आहे ते भामरागडला– ३ मैलावर. कधीतरी पोस्टात जाऊन पत्रे घेऊन यायची. वर्तमानपत्रे येत नाहीतच. स्टॅझीस्टर लावला तर B. B. C. सिलोन ह्याखेरीज भारतीय Centres नीट ऐकू येतच नाहीत. आणि नाहीतरी आकाशवाणीवरच्या विपर्यस्त बातम्यानी कोणाचे तरी समाधान होणे शक्य आहे काय? Cells सपले म्हणजे अर्थात रेडिओही बद. डिसेंबरपर्यंत पुरेल इतके धान्य, साखर, मीठ, चहा, साबण इत्यादी वस्तूचा साठा मे मध्येच करून ठेवला होता. पण गहू दळण्याचे काम रोज करावेच लागते दूध नव्हते, भाजीपाला नव्हता तेव्हा फक्त वरण व पिठले यावर या मडळीनी ३–४ महिने काढले. पण आता म्हैस नेली आहे त्यामुळे दूध आहे. अजीतने शेती व्यवस्थित सांभाळल्याने मिरची, वांगी, गवार, भेंड्या इत्यादी भाज्यापण निघू लागल्या आहेत. त्याना ग्राहक फारच कमी.

शेकोटीभोवतीचे बोलायचे विषय म्हणजे माडियाना शेतीचे तत्र कसे शिकवता येईल, भाजीपाला लावायला व नतर खायला कसे शिकवायचे. ओढ्याचे पाणी उन्हाळ्यात पूर्ण आटते व मग प्यायला देखील शिल्लक रहात नाही, म्हणून बांध घालून पाणी कसे अडवता येईल व उन्हाळ्यातही मिळू शकेल. त्यांना अंगभर कपडा कसा मिळू शकेल. त्याचे शोषण कसे नाहीसे होईल वगैरे. वैद्यकीय मदत मिळाल्याने त्यांची एक अडचण दूर झाली हे खरेच. पण त्यांचे शोषण थांबणे हेही तितकेच महत्त्वाचे. माडिया म्हणू लागले, आमच्याकरता कादा, लसूण, मिरची, गूळ, आम्हाला लागणारा कपडा घेऊन या. म्हणजे आता दवाखान्याशेजारी दुकान काढायला हवे. त्याची तयारी पांचालने केली आहे. दुकान निघाल्यास व्यापाऱ्याच्या हितसबधांना धक्का बसणार व त्यामुळे विरोधात उभे ठाकणार. त्यालाही तोड द्यायची तयारी करावी लागेल माडियाना वस्तुविनिमयातून पैशाच्या अर्थव्यवस्थेकडे आणावे लागणार. दुकानामुळे दवाखाना आणखी वाढणार. लौकरच डॉ प्रकाशच्या पत्नी डॉ. मदा आमटे ह्या आपली नागपूर मेडिकल कॉलेजमधली नोकरी सोडून हेमलकशाला ह्या कामात सहभागी होणार आहेत.

दवाखान्यातील पेशंट वाढले की औषधांचा हा पर्वतप्राय खर्च कोठून करायचा? हेमलकसा हे आपल्याला सर्वाना एक आवाहन आहे. आपल्याकडे physician's sample म्हणून आलेली औषधे तरी ठिकठिकाणचे डॉक्टर्स पाठवू शकतील. पणजीच्या डॉ. नीला वैद्य अशाप्रकारे औषधे घेऊन आल्या होत्या. अशाच तऱ्हेने जळगावात औषधे गोळा करून आम्ही शहाद्याच्या आदिवासीकरता पाठवली आहेत. सर्व महाराष्ट्रातल्या डॉक्टर्सना हे करता येण्याजोगे आहे. लाख रुपये भांडवल असल्याशिवाय दवाखाना सुरू होत नाही असे ज्या डॉक्टर्सना वाटते त्यांनी investment शिवायचा, काही Returns न मिळणारा व भविष्यकाळातही कधीच Paying होऊ न शकणारा असा हा अपूर्व दवाखाना जरूर पाहून यावा.

औषधी कपन्या व त्याचे प्रतिनिधीही औषधे पाठवू शकतील. दवाखान्याकरता चादरी, टॉवेल, बँडेज क्लॉथ, साबण आणि असख्य गोष्टीची मदत करणे शक्य आहे व आवश्यक आहे. कारण एका उदात्त अशा ध्येयवादाने व सेवावृत्तीने प्रेरित होऊन ही मंडळी तिथे काम करीत आहेत. दवाखान्याचा खर्च कसा चालवायचा हे एक मोठे प्रश्नचिन्ह त्याच्यापुढे व बाबांपुढे आहे. त्याचे उत्तर शोधण्याची चिंता त्यानाच करावी लागली तर ते एक मोठे दुर्दैव मानावे लागेल. म्हणून ज्यांना ज्यांना अशा कामाचे Appriciation आहे त्यानी यथाशक्ती साह्य करावे. आलापल्लीपासून ५० मैल पायी जायची तयारी असेल त्यांनी प्रत्यक्ष जाऊन यावे. ह्या एकलकोंड्या जिवांना बाहेरच्या जगातले कोणी भेटल्याचा आनद देखील अपूर्व आहे.

हेमलकशाला बाबाना ५० एकर जमीन मिळाली तेव्हा लोकबिरादरीचा हा प्रकल्प म्हणजे मुख्यत शेतीचा होईल व बाबा आणि साधनाताई तिथे रहातील अशी बाबाची इच्छा होती. पण त्याच्याऐवजी प्रकाश व मदा आता तिथे रहाणार व दवाखाना ही प्रमुख activity झाली. अर्थात शेतीही आहेच. जगल तोडून धान, मका, ज्वारी, भाजीपाला लावले आहेतच. शेती वाढते आहे. विहिरीला पाणी लागले नाही तरी ओढ्यावर एजिन बसवून पिके काढली जात आहेत. ह्या भागात वीज, टेलिफोन येण्याची शक्यता नजीकच्या काळात नाही. रस्ते चांगले झाले तर बस जाऊ शकेल. बाह्य जगाशी दळणवळण सुरू झाले तर माडियांना विज्ञानाचे व भौतिक सुधारणाचे फायदे लौकर मिळू शकतील. पण ह्या भागाकडे लक्ष देण्याचे राज्यकर्त्यांना कारणच काय? माडियांना बिचाऱ्याना Nuisance Value काही नाही. ती निर्माण होण्याची राज्यकर्ते वाट पहात आहेत की काय कोण जाणे.

नोव्हेंबरच्या ४–५–६ तारखाना ३–४ दिवस हेमलकशाला जाण्याची संधी मिळाली ती केवळ अपघातानेच. World Bank चे एक प्रतिनिधी मंडळ ह्या भागात येणार म्हणून रस्ता अगदी Temporary दुरुस्त केला–म्हणजे फक्त खड्डे बुजवून माती टाकली व यंदा पाऊस कमी झाल्याने नद्यांनाही पाणी कमी. त्यामुळे नदीतून ट्रक जाऊ शकेल अशी माहिती शिबिरात आलेल्या व हेमलकशाहून पायी परत आलेल्या मुलांनी दिल्यावर बाबा, साधनाताई व आम्ही काहीजण नागेपल्लीहून हेमलकशाला जायला निघालो ते कदाचित अर्ध्या रस्त्यातून परतही यावे लागेल अशा तयारीने. पण आमचा पहिला ट्रक–जूनपासूनचा–हेमलकशाला पोचला. लोकबिरादरीचे लोक माघार घेणे शक्य तरी होते का? हेमलकशाला कायम गेलेल्या लोकांना हार माहीतच नाही. पण त्याना विजयी करणे आपल्याही हातात आहे.

–प्रा. लता पाटणकर, जळगाव

# अेक वैशिष्ट्यपूर्ण बँक !


आमची बँक ही एक वैशिष्ट्यपूर्ण बँक आहे ती विकास बँक म्हणून कार्य करते.)
समाजातील सर्व घटकांच्या संतुलित विकासासाठी ती प्रयत्नशील आहे.

| | |
|---|---|
| भाडवल व निधी | : रु. २५ कोटी |
| अेकूण ठेवी | : रु. १२८ कोटी |
| अेकूण कर्जे | : रु. १६५ कोटी |
| खेळते भाडवल | : रु. २३२ कोटी |

शाखा - मुंबईत २५ आणि नागपुरात ६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.

६, बँकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१



# सोलकढी

## □ इंचात मापलेले मातृत्त्व

बायकामुलींचे सौंदर्य (यालाच घोंडो विठ्ठल देशपांडे आणि माधव मनोहर 'अपौरुषेय सौंदर्य' असे म्हणतात. म्हणू देत.) हा माझ्या खास अभ्यासाचा खास विषय आहे. ही गोष्ट कोणाला फारशी ठाऊक नाही. सगळयापासून ती चोरून ठेवायची शहाणी शिताफी मजजवळ लहान-



पणापासून आहे. येथे एक मात्र सांगायला हवे : अस्सल भारतीयत्व अंगी बाणले असल्यामुळे बायकामुलींच्यासुद्धा शारीरिक सौंदर्यापेक्षा आत्मिक सौंदर्याकडे माझे किती-तरी अधिक लक्ष असते. अहो, शरीर म्हणजे नुसता रक्तामांसाचा मरणोन्मुख गोळा; उलट आत्मा म्हणजे कसा तत्त्वा–तेजाचा मृत्युंजय पुंज. आत्मिक सौंदर्य पुष्कळ वेळा शारीरिक सौंदर्याच्या पलीकडे अवघडून उभे असल्यामुळे मला नाईलाजाने शारीरिक सौंदर्य बऱ्याबारकाईने न्याहाळावे लागते. पण ते आपले आत्मिक सौंदर्यसाध्याकडे जायचे एक अटळ सुंदर-साधन म्हणून. शारीरिक आणि आत्मिक असा सौंदर्यविवेक मातेच्या सौंदर्याबाबत मात्र लटका ठरतो. आत्मिक सौंदर्य किती आगळे. किती वेगळे. किती पवित्र. किती अपाप. किती भव्य. किती दिव्य. किती उदात्त. किती मंगलमंगल.

मात्मिक सौंदर्याची महती आपल्याला ठाऊक आहे. पाश्चात्यांना ती ठाऊक नाही. ठाऊक होईल असे वाटत नाही. याची साक्ष नुकत्याच घडलेल्या एका घटनेत सहज मिळेल. या वर्षीच्या विश्वसुंदरी-स्पर्धेत ब्रिटनची कुमारी हेलन मॉर्गन पहिली आली. सौंदर्यसम्राज्ञी हेलन मॉर्गन ब्रिटिश आहे. तिचे वय आहे बावीस. मोक्याच्या जागांची मापे आहेत ३५-२४-३५ अशी. (रामा-शिवा-गोविंदा) निकालानंतर लक्षात आले की कुमारी हेलन मॉर्गन ही वस्तुत: माता हेलन मॉर्गन आहे. तिचे लग्न झालेले नाही. तिला मूल मात्र आहे. आपल्या यशाचे श्रेय ती या मुलाला देते. त्याला जन्म दिल्यानंतर आपले चांगले बारा पौंड वजन घटले, असे ती सांगते. (कमाल आहे. आपल्याकडे बाळंत-पणाचा परिणाम कसा गरगरीत होतो. पाश्चात्त्य बायका वेगळ्या प्रक्रियेने बाळंत होत असतील काय ?)

हे समजल्यावर कुमारीमाता हेलनविरुद्ध निषेधाचा मोठाच आवाज उठला. मातृत्वाचा निषेध करणाऱ्या पाश्चात्यांच्या भविष्याबद्दल मला फार्फार चिंता वाटते. तिचे ३५-२४-३५ असे मापृत्व तिला मातृत्वामुळे लाभले; इतर स्पर्धकांना केवळ आपल्या मापृत्वानिशी स्पर्धेत उतरावे लागले; हेलनला मात्र मातृत्वमग्न मापृत्वाचा वेगळा लाभ उठवता आला; म्हणजेच ही विषमस्पर्धा झाली; अशी विरोधकांनी हकाटी केली. खरोखर, मातृत्व का असे इंचात मापता येते ?

सगळे मोजण्यामापण्याची महत्त्वाकांक्षा हेच तर पाश्चात्त्य संस्कृतीचे दुखणे आहे. आम्हाला हे दुखणे जडायची भीती नाही. □

## चर्चिल, रिचर्ड बर्टन आणि मी

३० नोव्हेंबर १९७४ हा, माजी ब्रिटिश प्रधानमंत्री सर विन्स्टन चर्चिल यांचा शंभरावा जन्मदिवस. सगळ्या जगाने हा दिवस साजरा करायला हरकत नव्हती. पण तसे झाले नाही. ब्रिटनने अर्थातच या राष्ट्रोद्धारक वीरपुरुषाचे मोठ्या जिव्हा-ळ्याने स्मरण केले. दुसऱ्या महायुद्धातल्या अद्वितीय कामगिरीने विन्स्टन चर्चिल जगाच्या इतिहासात चिरंजीव झाले आहेत. आपल्या हयातीत चर्चिल आख्यायिका होऊन राहिले होते. आता त्या आख्यायिकेतली गूढरम्यता आणि अद्‌भूत थोडे फिके पडले आहे. चर्चिल यांचे कठोर पुनर्मूल्यमापन करणारी काही पुस्तके लिहिली गेली आहेत. पण चर्चिल यांच्या कडव्या टीकाकारांनीसुद्धा त्यांचा मोठेपणा सतत मान्य केला आहे.

त्यामुळेच श्रेष्ठ अभिनेते रिचर्ड बर्टन यांनी, चर्चिल-जन्मशताब्दीचा सुमुहूर्त साधून,


त्यांच्याबद्दल जे टमटवाळ उद्गार काढले त्याबद्दल आश्चर्य वाटले आणि रिचर्ड बर्टन यांच्याबद्दल कीव वाटली. रिचर्ड बर्टन हा फार मोठा नट आहे असे मानतात. मानणारे मानोत; मला तो आवडत नाही. बर्टनच्या व्यासंगाबद्दल-देखील पुष्कळ बोलले जाते. आपल्याला बर्टनची माहिती आहे ती (एकमेव) एलिझाबेथचा पाचवा टेलरमेड नवरा म्हणून. या दोघांच्या विवाहपूर्व आणि विवाहोत्तर सहजीवनाच्या सुरस आणि चमत्कारिक कहाण्या पुष्कळ सांगितल्या गेल्या. पुढे यथाकाल त्यांचे फंफाटले. एलिझाबेथ टेलर आता सहावा बर्टन शोधते आहे आणि रिचर्ड बर्टन दुसरी एलिझाबेथ शोधतो आहे. (शोधणाऱ्याला काय म्हणून सापडणार नाही ?) हे काहीसे विषयांतर झाले. पण खरे म्हणजे 'सोलकढी'त विषय कोणता आणि विषयांतरे कोणती हे सहज ओळखता येणार नाही. या बोटावरची थुंकी त्या बोटावर करावी त्याप्रमाणे, प्रसंगी, विषयाचे विषयांतर करण्यात किंवा विषयांतराचाच विषय करण्यात मी वाकबगार आहे. मात्र अजूनही माधव मनोहरांसारखे 'विषयांतरा-नां'च धरून लिहिणे मला साधत नाही हे कबूल केले पाहिजे. असो.

सांगायचा मुद्दा असा की नटसम्राट बर्टनमहाशयांनी 'द न्यू यॉर्क टाईम्स'ला दिलेल्या एका मुलाखतीत असे म्हटले की 'सर विन्स्टन हे भेकड, सत्तेमुळे चळलेले युद्धखोर आणि जणू एक मध्ययुगीन टोळी-प्रमुख होते.' योगायोगाची गोष्ट अशी की बीबीसीतर्फे दूरचित्रवाणीवर चर्चिलजन्म-शताब्दीनिमित्त होणाऱ्या एका नाटकात रिचर्ड बर्टन हेच विन्स्टन चर्चिल यांची भूमिका करणार होते. मुलाखतीमुळे बीबीसीचे नाटचदिग्दर्शक मि. शॉन सटन इतके उद्विग्न झाले की यापुढे रिचर्ड बर्टनना बीबीसीवर काम दिले जाणार नाही असे त्यांनी जाहीर केले.

विन्स्टन चर्चिल हा माझा हीरो. गेली पंधरावीस वर्षे चर्चिलविषयक पुस्तके मी मोठ्या अगत्याने वाचतो आहे. चर्चिलचे एक विस्तृत चरित्र मराठीत लिहायचा विचार मध्यंतरी माझ्या डोक्यात आला होता. प्रत्यक्षात न येणारे विचार डोक्यात कसे अगदी वाजतगाजत येतात. तसे विन्स्टन चर्चिल यांचे एक बऱ्यापैकी (म्हणजे चांगले) चरित्र मराठीत आहे. (लेखक : वसंत शांताराम देसाई; व्हीनस प्रकाशन–पुणे; पृष्ठे : २६४; किंमत ७ रु. ५० पैसे; प्रकाशन :१९६३.) पण अधिक मोठे आणि तपशीलवार चरित्र लिहिले गेले पाहिजे असे वाटते.

रिचर्ड बर्टनच्या टमटवाळ उद्गारांनी तर असे तीव्रतेने वाटू लागले. कारण विन्स्टन चर्चिल यांच्याबद्दल असे बोलणारे रिचर्ड बर्टन फक्त ब्रिटनमध्ये आहेत असे थोडेच आहे ?

—अनंतराव

# ब्रह्मदेश

## लष्करी सत्तेविरुद्ध लढा

वा. दा. रानडे

यूनोचे माजी सरचिटणीस ऊ थांट यांच्या पार्थिव देहाचे दफन कोठे करावयाचे या प्रश्नावर ब्रह्मदेशात विद्यार्थी आणि सरकार यांच्यात वाद निर्माण झाला. त्यातून दंगली व गोळीबार होऊन रंगूनमध्ये लष्करी कायदा पुकारण्यात आला. ने विन यांच्या लष्करी राजवटीला असलेला आपला विरोध ऊ थांट यांनी कधी उघड शब्दाने व्यक्त केला नसला तरी त्यांच्या कृतीतून तो सूचित झाला होता. ने विन अधिकारावर आल्यापासून ब्रह्मदेशास भेट द्यावयाची नाही असे त्यांनी ठरविले होते व तो निश्चय त्यांनी पाळला होता. आपल्या थोर नेत्याचा सरकारकडून यथोचित सन्मानाने अंत्यविधी होणार नाही असे विद्यार्थ्यांना स्वाभाविकपणेच वाटले आणि रंगूनला त्यांचे शव येताच त्यांनी ते आपल्या ताब्यात घेऊन रंगून विद्यापीठाच्या आवारात खास कबर बांधून तेथे त्यांचे दफन केले. पण सरकारच्या एक हजार सैनिकांनी ते शव तेथून उकरून काढून सरकारने ठरविलेल्या जागी त्यांचे दफन केले. यामुळे चिडलेल्या जमावाने पोलीस ठाणी जाळली. पोलिसांनी गोळीबार केला व रंगून शहरात सरकारने नंतर लष्करी कायदा पुकारला.

ऊ थांट यांच्या अंत्यविधीचा हा वाद म्हणजे ने विन यांच्या लष्करी राजवटी विरुद्ध दीर्घकाळ साचत आलेल्या असंतोषाचाच उद्रेक होता. बारा वर्षांपूर्वी ने विन यांनी ऊनू यांचे निवडणुकांत बहुमत मिळवून निवडून आलेले सरकार उलथून पाडून आपल्या नेतृत्वाखाली लष्करी राजवट स्थापन केली. देशापुढील प्रश्न सोडविण्यास ऊनू यांचे सरकार अकार्यक्षम ठरले आहे. कारेन, काचीन वगैरे वन्य जमातींचे बंड तसेच कम्युनिस्टांचे बंड मोडून काढण्यात ऊनू यांना अपयश आले म्हणून आपण सत्ता हाती घेत असल्याचा ने विन यांचा दावा होता. ऊनू यांच्या काळातील संसदीय लोकशाही पद्धतीची घटना त्यांनी रद्द करून एकपक्षीय राजवट स्थापन केली. ब्रह्मी-समाजवादी कार्यक्रम पक्ष (बर्मा सोशॅलिस्ट प्रोग्रॅम पार्टी) या सत्तारूढ पक्षाशिवाय इतर पक्षांना बंदी करण्यात आली. या वर्षाच्या सुरुवातीला देशात नवी घटना अस्तित्वात आली पण ही घटना म्हणजे सत्तारूढ पक्षाची सत्तेची मक्तेदारी कायम ठेवण्याचा आणि त्याच्या सत्तेला कायदेशीर व घटनात्मक स्वरूप देण्याचा प्रयत्न होता. एक पक्षीय समाजवादी लोकशाही असे देशातील राज्यपद्धतीचे स्वरूप राहील हे नव्या घटनेत जाहीर करण्यात आले. या घटनेनुसार ब्रह्मदेशात गेल्या मार्चमध्ये चौदा वर्षांत प्रथमच निवडणुका झाल्या व लष्करी नेत्यांनी आपली सत्ता ४५१ सभासदांच्या पीपल्स नॅशनल असेंब्लीपुढे औपचारिकरीत्या सुपूर्त केली. ने विन यांच्या नेतृत्वाखालील पूर्वीचे क्रांतिकारी मंडळ बरखास्त करण्यात येऊन त्याजागी मंत्रिमंडळ स्थापन झाले व ने विन पंतप्रधान झाले. पण नावे बदलण्यापलीकडे प्रत्यक्षात काहीही बदल झालेला नाही. घटनेनुसार मंत्रिमंडळ असेंब्लीस जबाबदार असले तरी असेंब्लीत ने विन यांच्या पक्षाशिवाय दुसरा कोणताही पक्ष नसल्याने मंत्रिमंडळाला कोणताही धोका नाही.

गेली बारा वर्षे ने विन यांच्या हाती सत्ता एकवटलेली आहे. प्रमुख उद्योगधंद्यांचे राष्ट्रीकरण करून समाजवादाच्या दिशेने काही पावले या राजवटीने टाकली पण त्यांची अंमलबजावणी लष्करी अधिकारी व मुलकी अधिकाऱ्यांकडे सोपविल्याने प्रत्यक्षात त्यांचेच राज्य प्रस्थापित झाले असून अधिकारपदांचे सारे फायदे आणि सुखसोयी हा वर्ग उपभोगीत आहे. सामान्य जनतेची परिस्थिति सुधारण्याऐवजी तिच्या हालअपेष्टा वाढल्या आहेत. सव्वा ते दीड लाख सैनिकांच्या हाती सत्तेची मिरासदारी आहे. टंचाई असलेल्या वस्तूंचे वाटप करताना संख्या व दर्जा या दोन्ही दृष्टींनी प्रथम त्यांची गरज भागविली जाते. त्यातून जे काही उरेल त्यातला वाटा प्रथम ब्रह्मी जनतेला आणि त्यानंतर काही उरल्यास चिनी, हिंदी वगैरे अल्पसंख्याकांना मिळावयाचे अशी ही विषम वाटप पद्धती आहे. गेल्या वर्षी भाताचे पीक सर्वांत चांगले आले असा सरकारचा दावा, पण धान्य वसुलीच्या मोहिमेत प्रत्यक्षात फार थोडे धान्य सरकारला मिळाले. देशात ४१ कोटी ३५ लाख बास्केटस् (एक बास्केट—४६ पौंड) तांदूळ पिकल्याचा सरकारी अंदाज होता व त्यापैकी साडेबारा कोटी बास्केटस् तांदुळाची वसुली होईल अशी अधिकाऱ्यांना आशा वाटत होती. पण प्रत्यक्षात ७ कोटी १८ लाख बास्केटस् पलीकडे ही वसुली गेली नाही. त्यातून महिन्याला ४०००० टन प्रमाणे वाटप सरकारतर्फे करण्यात आले. लोकांच्या गरजांच्या मानाने फक्त एकतृतीयांश धान्य त्यांना सरकारी दुकानातून मिळते व बाकीचे धान्य काळ्या बाजारात तिप्पट किंमत देऊन त्यांना आपली गरज भागवावी लागते. लष्कराने ७ कोटी बास्केट तांदूळ स्वतःसाठी राखून ठेवला आहे हा तांदूळ लोकांना वाटला तर टंचाई काही प्रमाणात कमी होईल अशी कम्युनिस्ट पक्षाची मागणी आहे. लोकांच्या गरजा प्रथम भागल्याशिवाय आम्ही तांदुळाची परदेशी निर्यात होऊ देणार नाही असे आंदोलन दोन तीन महिन्यांपूर्वी त्यांनी केलं. अक्याब येथे गोदी कामगारांनी बोटीवर तांदूळ चढविण्याचे नाकारले पण परदेशी चलन मिळविण्यासाठी तांदुळाच्या निर्यातीवर ब्रह्मदेशाला मोठ्या प्रमाणात अवलंबून रहावे लागते. एकूण निर्यातीत एकतृतीयांशापेक्षा अधिक निर्यात तांदुळाची असते. तेव्हा तांदूळ निर्यात कमी केल्यास अर्थव्यवस्थाच मोडकळीस येईल असा पेच ब्रह्मी राज्यकर्त्यांपुढे आहे.

नोकरशाही पद्धतीच्या कारभारामुळे अकार्यक्षमता, दिरंगाई या गोष्टी वाढल्या आहेत. बहुतेक सरकारी उद्योगधंद्यांच्या प्रमुख संचालकपदावर लष्करी किंवा मुलकी बडे अधिकारी आहेत. ते किंवा त्यांच्या हाताखालचे सरकारी नोकर स्वतः निर्णय घेण्याचे धैर्य दाखवीत नाहीत. बहुतेक प्रकरणे निर्णयासाठी मंत्र्यांकडे पाठविली जातात. कारखान्यातील एखाद्या यंत्राचे सुटे भाग मागवायचे असले तरी त्याचा हुकूम सुटून माल पदरात पडण्यास वर्ष लागते. अशा कारभार पद्धतीने उत्पादन वाढीस गति मिळणार कशी?

ही परिस्थिति जनतेला आता असह्य झाली असून त्याविरुद्ध ती आंदोलन करू लागली आहे. गेल्या मे—जून मध्ये रंगून मेकटिला, चौक, मंडाले, ये नांगयुआंग, अक्याब बंदर येथे रेल्वे, गोदी कामगार, कापड गिरण्या व इतर सरकारी उद्योगधंद्यातील कामगारांनी बैठे संप, घेराओ व निदर्शने केली. दडपशाहीने हे आंदोलन त्यावेळी मोडण्यात आले पण असंतोष अजून धुमसत असून निरनिराळ्या निमित्ताने तो डोके वर काढीत आहे. याच्या जोडीला पेकिंगवादी कम्युनिस्ट आणि कारेन, काचिन वगैरे टोळीवाल्यांनी सशस्त्र उठाव चालू ठेवलेच आहेत. सर्व विरोधी पक्षांची आघाडी उभारून ने विन सरकारविरुद्ध उठाव करण्याचा ऊ नू यांचाही प्रयत्न आहे. या वाढत्या असंतोषातून आपली सत्ता टिकविणे ने विन यांना कठीण जाणार आहे. □

# मल्हार रामराव

## मराठ्यांचा इतिहास जागवणारा थोर बखरकार



डॉ. भीमराव कुलकर्णी

दीडशे वर्षांपूर्वी, ज्येष्ठ वद्य दशमी शके १७४५ रोजी महाराष्ट्राचा एक थोर, जिद्दीचा आणि स्वाभिमानी बखरकार निधन पावला. मल्हार रामराव चिटणीस हे त्याचे नाव. थोर साहित्यिकांच्या शताब्दचा साजऱ्या करण्याची एक स्तुत्य प्रथा अलीकडे सुरू झाली आहे. मल्हार रामरावांचे महत्त्व मराठी गद्यलेखकांच्या क्षेत्रात एवढे मोठे आहे की, त्यांच्या मृत्यूला दीडशे वर्षे पुरी झाल्याच्या निमित्ताने त्यांचे उचित स्मरण साऱ्या महाराष्ट्राला असणे अत्यावश्यक आहे.

शिवछत्रपतींचे, त्यांच्या वंशजांचे, त्यांच्या गादीवर येणाऱ्या छत्रपतींचे स्मरण झाले की हटकून मल्हार रामराव चिटणिसांचे नाव डोळ्यासमोर येते. एकट्या माणसाने जिद्दीने साऱ्या छत्रपतींच्या आयुष्याचा रंगीबेरंगी पट विणावा, आणि तो विणताना दोन-अडीचशे वर्षांचा सारा महाराष्ट्र त्यातल्या साऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींसह साकार करावा, अशी अद्‌भूत किमया एखाददुसऱ्या व्यक्तीने करावी, असे मध्ययुगीन महाराष्ट्रात क्वचितच घडले आहे. ही किमया करणारा एकुलता एक बखरकार म्हणजे मल्हार रामराव चिटणीस......

शिवछत्रपतींच्या चाणाक्ष नजरेने पारख करून ज्या अनेक कर्तृत्ववान व्यक्तींना मानमान्यतेस चढविले, त्या व्यक्तींमध्ये त्यांचे खंदे लेखणीबहाद्दर चिटणीस बाळाजी आवजी यांची गणना होते. महाराष्ट्राच्या पडत्या काळात ही चिटणिशी सांभाळण्यामध्ये ज्यांच्या वाटचाला परम दुःखाखेरीज काहीच आले नाही, त्यासाठी वनवास, तुरुंगवास पत्करावा लागला, परागंदा व्हावे लागले, दुसऱ्या बाजीरावासारख्या खुनशी, नादान व लहरी पेशव्याच्या तावडीत सापडून घरादारावर जप्ती येऊन आयुष्याची राखरांगोळी व्हायची वेळ आली, तरी ज्यांची छत्रपतीनिष्ठा कणभरही डळमळली नाही, असे निःसीम स्वामिभक्त म्हणजे मल्हार रामराव चिटणीस......

राघोबादादा पेशवे यांचे अभिमानी म्हणून पेशवाईतील पराक्रमी सरदार सखाराम हरी गुप्ते यांची ख्याती आहे. ज्या रघुनाथरावांसाठीं सखाराम हरींनी हयातभर नाना फडणिसांशीं उभा दावा मांडला, आणि त्यांच्या पायात मणामणाच्या बेड्या पडल्या असता, मेल्यानंतरही आपली हाडे रघुनाथरावांचेच नाव उच्चारतील, असे बाणेदारपणाने सांगून नानांचा मुखभंग केला, त्याच रघुनाथरावांच्या चिरंजीवाने—दुसऱ्या बाजीरावाने, सखाराम हरी गुप्त्यांच्या या जावयास, मल्हार रामरावास देशोधडीला लावावे, यापेक्षा दैवदुर्विलास तो कुठला ?

शिवछत्रपतींचे चिटणीस बाळाजी आवजी हे मल्हाररावांचे

खरापपणजोवा होत. बाळाजी आवजी, जिवाजी खडो, रामराव जिवाजी, मल्हार रामराव अशी ही परपरा आहे.

बाळाजी आवजी चिटणिसाना फितुरीच्या आरोपावरून समाजीने हत्तीच्या पायाखाली देऊन ठार मारले. पोरक्या झालेल्या खडो बल्लाळाच्या निष्ठेमुळे त्याला पुन्हा चिटणिशी मिळाली. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत ही चिटणिशी काही काळ जिवाजी खडो यानी उपभोगली. त्यांच्या मृत्यूनतर ती त्याच्या भावाकडे म्हणजे गोविंदराव चिटणिसाकडे गेली आणि अशा रीतीने ज्येष्ठ वारसाच्या घराण्यातून ही चिटणिशी निसटली, ती प्रयत्नाने काही काळ मल्हाररावाना मिळाली होती, परंतु त्यावेळी त्या चिटणिशीत काही अर्थ नव्हता. पेशव्यांनी छत्रपतीना निष्प्रभ केले होते आणि दोन पिढ्यांच्या दारिद्र्याने मल्हारराव अक्षरश: होरपळून गेले होते. सखाराम हरीसारख्या राघोबाच्या पक्षपाती सरदाराचे जामात झाल्यामुळे नाना फडणीसानी आकसाने तरुणपणीच त्याचा सारा सरंजाम जप्त केला होता, पुढे शिंदे बायाच्या रणधुमाळीत मल्हाररावाचा जैतापूरचा वाडा साफ धुतला गेला होता व १८०२ साली यशवतराव होळकराने पुणे लुटले, त्यावेळी मल्हारराव हाती सापडल्याची सधी साधून यशवंतरावाने त्याजवर लाख रुपयाची पट्टी बसविली, तेव्हा काहीतरी सधी साधून पुण्याबाहेर पडण्याची सधी मल्हारराव पाहू लागले. तेव्हा बाजीरावाचा दत्तक भाऊ विनायक अमृतराव याच्यासाठी साताऱ्याहून वस्त्रे आणण्याच्या कामगिरीचे निमित्त करून मल्हारराव पुण्याबाहेर पडले, आणि बाजीरावाची वक्रदृष्टी होऊन त्यांना रानोमाळ भटकत रहावे लागले. बाजीरावाचा पाताळयत्री कारभारी त्रिंबकजी डेंगळे याच्या कचाट्यात सापडून सातारचे छत्रपती प्रतापसिंह याचे पराक्रमी बधू चतुरसिंग व त्याचे फडणीस बापू कान्हो याना तुरुगात खितपत पडावे लागले होते, तीच गत त्रिंबकजीने मल्हाररावाची केली असती, परतु महाराष्ट्राचा इतिहास जागविण्याचे मोठे कार्य मल्हार रामरावाच्या हातून पार पडावयाचे होते, म्हणून मल्हारराव त्रिंबकरावाच्या कचाट्यात सापडले नाहीत.

ग्रँट डफच्या व बाळाजीपत नातूच्या मुत्सद्देगिरीमुळे छत्रपती प्रतापसिंहाची सातारच्या गादीवर प्रतिष्ठापना होऊन बाजीरावाच्या नाड्या आवळल्या गेल्यानतर मल्हार रामरावाना काहीसे स्वास्थ्य मिळाले. काही काळ चिटणिशी मिळाली आणि 'पुरातन राज्याचे माहितगार' म्हणून त्यानी छत्रपतीची चरित्रे एक हाती, एक टाकी लिहिण्याचा प्रचड उद्योग मोठ्या आत्मविश्वासाने आणि सन्मानाने तडीस नेला.

छत्रपतीच्या दरबारात साताऱ्यास इंग्रजाचा वकील म्हणून काम करीत असता ग्रँट डफने मराठ्याचे कागदपत्र साक्षेपाने गोळा करून पाश्चात्य इतिहासलेखनप्रणालीनुसार साऱ्या अनुकूलतेसह मराठ्याचा इतिहास लिहिण्याची सिद्धता एकीकडे चालू ठेविली असता, दुसरीकडे सर्वस्वी प्रतिकूल अवस्थेत मल्हार रामराव तन्मयतेने ही चरित्रे लिहीत होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे. छत्रपती प्रतापसिंह व ग्रँट डफ यांचा गाढ स्नेह होता, आणि छत्रपतीनी मल्हार रामरावाना ग्रँट डफला सर्वतोपरी साहाय्य करण्यास फर्माविले असता, ग्रँट डफला साहाय्य करून आपण हात चोळीत बसण्यापेक्षा स्वत:च्या लेखणीचे सामर्थ्य व कर्तृत्व महाराष्ट्राला दाखविण्याचे कदाचित मल्हाररावांनी मनात योजिले नसेल ना? कारण मल्हाररावानी छत्रपती शिवाजी महाराजापासून, छत्रपती प्रतापसिंहाचे वडील छत्रपती दुसरे शाहू महाराज याच्यापर्यंतच्या सहा छत्रपतीची (१ शिवाजी, २ सभाजी, ३ राजाराम, ४ शाहू, ५ रामराजा, ६ दुसरा शाहू) चरित्रे व मराठ्याच्या राजनीतीचे विवेचन करणारा 'राजनीती' हा सातवा ग्रथ अशा एकूण सात बखरी इ. स. १८१० सालीच लिहून पुऱ्या केल्या. ग्रँट डफच्या 'मराठ्याचा इतिहास' बाहेर पडला तो १८२६ साली! १८१८ साली मल्हार रामरावांनी या चरित्र ग्रथास चतुरसिंगाची हकीकत जोडली व छत्रपतीच्या या पराक्रमी वशजाची झालेली कुचबणा, त्याची मानहानी, त्रिंबकजीने त्याला दाखविलेली तुरुगाची हवा व तुरुगातच या दुर्दैवी छत्रपतीला आलेला मृत्यू याचे हृदयद्रावक वर्णन केले आहे.

ग्रँट डफने शिवाजीस आणि पर्यायाने सर्व मराठ्यास चोर, लुटारू म्हणून सबोधून मराठ्यांचा स्वाभिमान डिवचला व त्या स्वाभिमानापोटी साने, खरे, राजवाडे याच्यासारखे इतिहाससशोधक निर्माण झाले व त्यानी मराठ्याच्या इतिहासाचे हृद्गत मराठी माणसाखेरीज इतरास सुतराम कळणे शक्य नाही या जाणीवेने पोटाला चिमटा घेऊन मराठ्याच्या इतिहासाची साधनसामग्री सिद्ध केली.

गमत अशी की, मराठ्याच्या इतिहासाचे हृद्गत ज्याला चागल्या रीतीने उमजले होते, असा एक इतिहासकार त्याच्या उदयापूर्वी सुमारे पन्नास वर्षे अगोदर उदयाला येऊन आपले कार्य करून गेला होता! मध्ययुगीन जाणिवांच्या पौराणिक पद्धतीच्या त्याच्या लेखनामुळे त्याचे महत्त्व जितके समजावून घ्यावयास हवे होते, तितके समजावून घेण्याचा प्रयत्न झाला नाही. अस्सल कागदपत्राचा सग्रह करण्याच्या ध्यासाने बखरीसारख्या जुन्या इतिहासलेखनपद्धतीचे महत्त्व तुलनेने गौण वाटले आणि त्या भरात बखरीच्या वाट्याला उपहासाचे, हेटाळणीचे जिणे आले.

अस्सल कागदपत्राच्या आधारे सिद्ध केलेला इतिहास हा केव्हाही महत्त्वाचाच असला तरी, बखरीकडे आज 'मध्ययुगीन इतिहासलेखनाची एक पद्धती' या दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे आणि त्याच्या लेखनपद्धतीचा भेद करून त्याच्या समजस व्यापक भूमिकेचे, पल्लेदार लेखनशैलीचे आणि मराठी सस्कृतीच्या अगोपागाच्या त्यातून दिसणाऱ्या वैशिष्ट्याचे अवलोकन करून, त्याचा गतसस्कृतीचा आलेख रेखाटण्यासाठी योग्य तो उपयोग करून घेतला पाहिजे. कारण मल्हार रामराव लिहीत होते, त्यावेळी त्याच्याकडे ऐतिहासिक अस्सल कागदपत्र जवळजवळ नव्हते. इतिहासलेखनाचा आणि शिक्षणाचा तसा काही अव्वल दर्जाचा सस्कार त्याना होता असेही नव्हते. तरीही सरळ, साध्या परतु परिणामकारक मराठी गद्याचा उपयोग करून त्यानी साऱ्या छत्रपतीचा एवढा विस्तृत जीवनपट विणावा आणि त्यानतर शतक दीड शतक आपल्या या चरित्रानी मराठी वाचकाला झपाटून टाकावे आणि त्यानी लोकमानसातील या प्रतिमा आपल्या लेखणीच्या करामतीने इतक्या कौशल्याने नतरच्या लोकमानसावर कोरून ठेवल्या की जणू काही दगडावरच्या रेघेप्रमाणे त्या वज्रलेप झाल्यासारख्या वाटाव्यात.

चिटणिसांच्या या कृतीची तुलना अर्थातच महाभारताशी होणे शक्य नाही. परंतु 'मराठ्यांचे महाभारत' जर कोणी साकारले असेल तर ते चिटणिसांनीच असे म्हटले पाहिजे! मराठ्यांच्या आणि मुसलमानांच्या बखरींतील मोठा फरक इंग्रज इतिहासकारांना जाणवला तो त्यांनी नोंदवून ठेविला आहे. मुसलमानांच्या बखरी कृत्रिम भाषेच्या अवडंबराने गजबजलेल्या आणि अतिशयोक्तीच्या फुसक्या डोलाऱ्यावर नाचणाऱ्या तर मराठ्यांच्या साध्यासुध्या भाषेत क्वचित पौराणिक दृष्टांतांचा आधार घेत अतिशय प्रामाणिकपणाने आणि मोकळेपणाने लिहिलेल्या! मराठी बखरकारांचा मोठा गौरव यापेक्षा दुसरा कोणता असू शकेल?

मल्हार रामरावांच्या चरित्रलेखनामध्ये 'सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र' हे सर्वांत मोठे आहे आणि या चरित्रातून शिवाजी महाराजांचे जे प्रतिबिंब त्यांनी वाचकाच्या मनावर ठसविले आहे, तेच गेल्या शंभर वर्षांत साऱ्या वाचकांच्या मनात पुरेपूर रुतून बसले आहे. स्वामिनिष्ठा आणि लेखनबहादुरी या दोन गुणांच्या बळावर मल्हाररावांनी 'एक आदर्श नृपती' या नात्याने एक मनोरम चित्र उभे केले आहे. या बखरीमध्ये ऐतिहासिक दृष्ट्या अनेक दोष आहेत (हे दोष साऱ्याच मराठी बखरींचे विशेष आहेत), मुत्सद्देगिरीच्या आणि प्रत्यक्ष युद्धकर्माच्या बाबतीत मल्हाररावांच्या अनुभवांच्या मर्यादांमुळे शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील लढायांची त्यांनी केलेली वर्णने जुजबी आहेत, स्वकालातील कित्येक घटनांचे त्यांनी शिवकालावर बेमालूम कलम केले आहे, हे सारे खरे असले तरी शिवाजी महाराजांच्या अष्टपैलू कर्तृत्वाचा आणि त्यांच्या असामान्यत्वाचा, विभूतिमत्त्वाचा एक खोलवर ठसा त्यांचे हे चरित्र मनावर उमटवून जाते. 'सुबोध, चटकदार, आवेशयुक्त व रसभरी भाषाशैली योजून शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी कौतुक व आदरभाव जागृत करण्याचे काम चिटणिसांच्या बखरीप्रमाणे करण्यास आजच्या सरावलेल्या लेखकाची लेखणीदेखील समर्थ होणार नाही.' असे उद्गार प्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. दत्तोपंत आपटे यांनी या बखरीसंबंधाने काढले आहेत.

मल्हाररावांच्या या एकटाकी मोठ्या लेखनसंभारातील संभाजी व राजाराम यांच्या चरित्राच्या दोन छोट्या व मनोज्ञ बखरी अतिशय महत्त्वाच्या आहेत. दुर्दैवाने त्यांचे महत्त्व जितक्या मोठ्या प्रमाणात अभ्यासकांनी लक्षात घ्यावयास हवे, तितके अद्याप घेतलेले दिसत नाही. उलट मल्हाररावांनी संभाजीची जी एक प्रतिमा उभी केली आहे, ती पुसून टाकण्याचा आटापिटा काही संशोधकांनी चालविला आहे. त्यांच्या या प्रयत्नाने ती पुसून तर टाकली जात नाहीच, उलट ती अधिक दृढ होते, असाच अनुभव येतो!

मल्हाररावांचे संभाजीचे चरित्र केवळ १८–१९ पृष्ठांचे आहे, परंतु ते अनेक प्रकारच्या आशयांनी इतके ठासून भरलेले आहे आणि इतक्या सरळसोटपणे हा आशय चढत्या क्रमाने मनावर संक्रांत करण्यात आला आहे की, मल्हाररावांच्या लेखणीच्या जहरी फटकाऱ्यांचे सामर्थ्यच त्यातून कळून येते. हे चरित्र एकीकडून शिवाजीच्या तुलनेने उभे करण्यात येते आणि दुसरीकडून गीतेतील एका महत्त्वाच्या सिद्धांताचा प्रत्यय यावा, या दृष्टीने त्याची मांडणी करण्यात येते. मातृपितृभक्त, साध्यासुध्या मावळ्यांमध्ये क्षात्रतेजाचे स्फुल्लिंग फुलविणारा, लेखनकामात तत्पर असलेल्या ब्राह्मणांच्या कर्तृत्वाला अवसर देऊन त्यांना प्रतिशिवाजी बनविणारा, न्यायनिष्ठुर, प्रजाहितदक्ष, स्वराज्याची प्रतिष्ठापना करून औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूस शह देण्यात, राजकर्तव्यतत्पर, साधुसंत, देवधर्म यांची कदर करणारा शिवाजी तर या प्रत्येक बाबतीत उणा असणारा संभाजी विनाशाप्रत कसा गेला हेच तर चिटणिसांना दाखवायचे आहे.

संभाजीच्या दुर्वर्तनामुळे राजारामास गादीवर बसविण्याचा डाव मुळात अगदी मनाविरुद्ध रचण्यात आलेला व दुबळ्या स्वरुपाचा. त्यामुळे फारसा प्रयत्न न करताच संभाजीची कैदेतून सुटका झाली व सहजगत्या त्याला रायगड गाठता आला. त्याला जवळजवळ कसलाच विरोध होत नाही. तरीही संभाजी आततायीपणे एकेक अनन्वीत कृत्ये करीत आहे. आल्या आल्या सावत्र मातेस अपशब्द उच्चारून तिच्यावर शिवाजीस विषप्रयोग केल्याचा आरोप करतो व तिला भिंतीत चिणून ठार मारतो. राज्यकर्त्यांच्या अंगी अवश्य असलेला दूरदर्शीपणा या गुणाचा त्याच्यामध्ये अभाव असतो. शिवकालीन कर्त्या मुत्सद्द्यांना तो दूर करतो. हलक्या लोकांच्या कानी लागून भल्याभल्यांना तो हत्तीच्या पायी देतो. देवधर्मांची त्याला कदर रहात नाही. संतमहंतांचे बोलणे त्याच्या मनापर्यंत पोचतच नाही. अस्वस्थ होऊन समर्थ त्याला आपण होऊन पत्र पाठवतात. मराठी वाङ्मयातील शिवकर्तृत्वाचे मूल्यमापन करणारे हे उत्तुंग स्वरुपाचे पत्र इतके अर्थपूर्ण आहे की, कोणीही व्यक्ती त्या पत्रामुळे खडबडून जागी झाली असती, पण ते पत्र वाचून संभाजी ठेवून देतो आणि हे सारे विशेष चिटणीस एका शब्दात वर्णन करतात. ते त्याला 'उग्र प्रकृती' म्हणतात आणि त्याच्या क्रोधामुळे जे महाभारत घडले, त्याचा पट विणतात.

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥

या गीतावचनाचा साक्षात प्रत्यय संभाजीच्या क्रोधावशतेमुळे कसा येतो, हे दाखविले आहे. प्रथम तो कलुषा नावाच्या नादान ब्राह्मणाच्या नादी लागतो. त्याच्या चतुर स्त्रीच्या वशीकरणामुळे, स्त्रीसमोहामुळे त्याला बुद्धिभ्रंश होतो. तो कलुषाच्या पूर्णपणे नादी लागतो. राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होते. औरंगजेबाचे सैन्य सर्व बाजूंनी लचके तोडू लागते, 'राज्य ठिकडीचे अंगठीएवढे असावे' असे म्हणून गेलेल्या मुलुखाचे समर्थन करावे लागते. औरंगजेबाचा पुत्र अकबर आश्रयार्थ आला, तर संभाजीला त्याचा औरंगजेबाला शह देण्यासाठी काहीच उपयोग करून घेता येत नाही. खंडो



बल्लाळाची स्वामिनिष्ठा त्याच्या लक्षातच येत नाही. बायको कान-पिचक्या देते तो उद्वेगतो. शिवाजीच्या साऱ्या राजकारणाचे खोबरे होते. मुत्सद्दी सारे हतप्रभ, हतवीर्य होतात. या सर्वांचा परिणाम सर्वनाश होण्यात न झाला तरच नवल. संभाजीकालीन दुर्दशेचे चिटणिसानी रेखाटलेले चित्र मोठे भेदक आहे. चिटणीस म्हणतात.

संभाजी दिवसेंदिवस कबजीचे स्वाधीन अधिकच होत चालले. इतबार मनसबा सर्व त्याचेच स्वाधीन. कोणीही पुरातन राज्यातील इतबारी त्याची प्रतिष्ठा ठेवावी अथवा मसलतीत घ्यावा, हे गोष्ट राहिली. उग्रपणे शासन, कोण्ही वर्णविचार न करिता शिरच्छेद करावा, ऐसे करीत चालले कबजीचे सहवासे त्याचे वाममार्गकर्म तेणेकरून फारच विचार राहिला नाही. माणूसमात्र फारच त्रास पावते जाले. सर्व प्रजेचीही क्षोभता जाली. न्यायाची रीत राहिली नाही. देवब्राह्मणाचे ठायीही निष्ठा राहिली नाही. असे आचरण धरिले एक कबजी सागतील ते प्रमाण. दैवयोगेकरून होणार काल प्राप्त झाला त्यायोगे दुसरे सुचू नये याप्रमाणे जाले. मातबर व बुद्धिवत व शूर होते ते हतवीर्य जाले. महाराजानी नूतन पराक्रम करावा, नवे राज्यसाधन करावे, हे राहिले नाही. सुभेदार प्रातातील वगैरे, तैसेच गडकिल्ले याचे, कारभारी, याजवरी हा कारभारात खातो म्हणून चुगली करिताच त्याचा विचार न करिता त्यास आणावा, मारावा, नागवावा, अतरच असलिया शिरच्छेद करावा. या भयेकरून मातबर चार होते ते कोणही जवळ बोलू न पावत. त्यास आपली आपलीच अबरू प्रतिष्ठा जतन होणे हेच येऊन पडले. एक कबजीचे सागणे मात्र प्रमाण. त्या नादे महाराज चालणार. त्यासच अनुमोदन देणे. मग विचार काय राहिला ? तजकरे घ्यावे, घरे बुडवावी, नागवावे माणूस राज्यात वाढले ते काही परराज्यातून आणून वाढविले ऐसे घडत नाही. ऐशी राज्यक्षयाची लक्षणे होत चालली. राज्य क्षयास जाणार त्या योगे (असे) घडत चालले. वडिलोपार्जित सेवकाच्या प्रतिष्ठा राहिल्या नाहीत. सर्वही लघु मनुष्ये वृद्धिगत जाली. राज्यातील सर्व कारभारी किल्ले सुभे याणी रोजमुरा वाटणे इत्यादिक बारीक मोठी वर्तणूक करणे ते आज्ञा नेऊन करावी, तसे चालावे, हे थोरल्या महाराजानी रीत घातली. बंदोबस्त हुकुमाशिवाय काडी न हालावी असे केले होते. त्या चालीने सर्व जागजागाची लिहिली यावी ते समयी सर्वाध्यक्ष कबजी (याजवर) अतिप्रीति, त्याणी इतका कारभार कोठवर करावा ऐसे म्हणावे. व त्यास ' छदोगामात्य कवि कलश पडितराव ' ऐसा किताब दिल्हा. तेव्हा सर्व आला कारभार ' त्याजकडे जा ' म्हणावे. बावानी कागद पाहाणे केलेलेच आहे, तथापि लिहिणार इतके काय म्हणून लिहितात, यात काय आहे, हशील कलम त्याहावे, ते चराठी कशास लिहितात व चदीपर्यंत किल्ले घेऊन काय समजोन करणारानी केले कळत नाही. किल्याचा बोभाट यावा, गनिमानी वेढा घालावा, त्याचे वर्तमान येथे येऊन पोहोचून उपराळा जावा तो तो किल्ला जावा, लोक मारले जावे हे पातक किती घडते, व दुर्लौकिक मोठा होतो की नाही ? राज्य आंगठीचे ठिकडें असे आसपास असावे पाहता सर्व ध्यानात येत असावे. म्हणजे उपराळाही होतो. बदोबस्त यथास्थित राहतो. सेवक मर्यादेने चालतात. असे अनेक प्रकारे (बावानी) कल्पना कराव्या, बोलावे. त्यास महाराजानी ऐकावे (हे) त्याचे दैव ! ब्राह्मण लघु असता योग्यता आली तेव्हा त्यास तर्क व कर्तेपणा, बुद्धी कोठील कळतच आहे. राजे तरी त्याचे स्वाधीनच वश जाले. राज्यभ्रष्ट होणार, तेणेकरून काही सुचते न झाले. थोर थोर ज्यानी राज्याविशी पराक्रम केले, राज्य वृद्धीस नेले व शूर पराक्रमी यांणीही ऐकावे, आचरण सकल पाहावे, आणि म्हणावे की, ' देवानी आम्हास का ठेविले ? कैलासवास महाराजानी केला त्या अगोदर मेलो असतो, अगर महाराजांनी सर्व मारिलेयात मारिले असते तरी उत्तम होते, परतु असे दिवशी हे पाहणे अनुचित. यावे अन्न बहुत दिवस खादले व या राज्यात वाढलो, लौकिक मेळविला, ते व्यर्थ जिणे, ऐसे घडले. महाराजाचे अकल्याण होते. आम्हात पराक्रम, बुद्धी असून व्यर्थ झाली. ' ऐसे सर्व बहुत श्रम करून ' होते ते होईल, पाहणे प्राप्त, उगेच असावे ' ऐसे सर्व करिते जाले. सर्वही हतवीर्य होऊन काही एक न बोलता राहते झाले. पागा, हत्ती सर्व कारखाने, फौज जिकडील तिकडे बेनिगेने बुडाले, मेले, गेले. फौजेचा दरकार नाही. बुडाली. '

संभाजीच्या सर्वनाशाचे चित्र रेखाटल्यानतर ' मरणान्तानि वैराणि ' या नात्याने संभाजीला हौतात्म्य देऊन त्याची प्रतिमा उजळली आहे.

संभाजीच्या पार्श्वभूमीवर राजारामाचे एक अतिशय उजळ व देखणे चित्र राजाराम चरित्रात रेखाटण्यात आले आहे. राजारामाला चिटणिसानी ' स्थिर बुद्धी ' हे समर्पक विशेषण लावले आहे. त्याच्या सौम्य, दूरदृष्टीच्या धोरणामुळे औरगजेबाची दाणादाण कशी उडाली याचे वर्णन वाचताना वाचकाचे मन बखरकाराबद्दल कौतुकाने भरून येते. राजाराम हा क्षमाशील, शात, धीमा व धोरणी आहे. संभाजीने त्याच्या आईस चिणून मारले असले तरी त्याच्या मनात कसलाही कटू भाव नाही, उलट लक्ष्मणाने सीतेबद्दल दाखवावा तसा भाव तो येसुबाईबद्दल दाखवतो. त्याला कसलाही राज्यलोभ नाही. संभाजीपुत्राच्या नावाने तो राज्य करतो. मुत्सद्द्याना, कर्तबगार पुरुषाना हजार अगानी वर येण्यास वाव देतो. रामचद्र अमात्य, प्रतिनिधी याचे कर्तृत्व त्याच्या कारकीर्दीत फुलून येते, सताजी–धनाजी यांच्या पराक्रमानी औरगजेब त्रस्त होतो, खडो बल्लाळाच्या स्वामिभक्तीने राजाराम मोठ्या दिव्यातून पार पडतो. संभाजीच्या मृत्यूनतर 'मराठे मेले ' म्हणून नाचणाऱ्या औरगजेबाला ' मराठे आहेत आणि ते कर्दनकाळ आहेत ' या जाणिवेने हताश व्हावे लागते.

राजारामकालीन मराठ्याच्या गनिमीकाव्याचे बखरकाराने केलेले वर्णन किती बोलके आहे ते पाहा :

' महाराजाकडील सरदार लोकानी गगातीरी आटोळे व समशेर बहादूर वगैरे यांनी झाडीत राहून पाळेगारी करून मुलूख मारावा. चौथाई वगैरे अमल घ्यावा. चोहोकडून धामधूम एकदाच करावी. याप्रमाणे लढाया जागा जागा झाल्या. मोगली फौज मोठी, एक ठिकाणी उभे राहून लढाई करणार मराठे यानी आज एकेठाई तर दुसरे दिवशी वीस-पचवीस कोसावर जावे. पुन्हा एकाएकी येऊन छापा घालावा. काही लढाई देऊन लुटून पळावे कही रसद मारावी असे करू लागले. तेव्हा यासी कसे लढावे ऐसे मोगलानी म्हणावे कदाचित् गाठ पडल्यास, कबजेत असल्यास, मराठे लोक पळणार, याजवर हत्यार कशास धरावे म्हणून ह्योच्या गळयात कमान

अडकवावी. यांनी त्याजवर हत्यार करून हात तोडून पळून जावे. कदाचित् जेरदस्तीत आले तरी गळयात कमान अडकवून चिखलात अगर भुईस लोळवावे. यानी मिष घडेन पडावे. सोडल्यानतर जावे. सारांश राजाराम ह्याची फौज रामसैन्याप्रमाणे अकस्मात भलतेकडून पाचदहाशे, दोनशे असे गठ्ठ्यानी शिरून शत्रूस दुभग करावे, हाणावे मारावे, पळून जावे. किल्लेचे लोकांनी स्वाऱ्या कराव्या. रात्री बेरड लोक घालून घोडी चोरून न्यावी. ह्याप्रमाणे करीते झाले सारांश महाराजांचे लोकांनी प्राण तृणप्राय: करून महाराजाचे राज्य व्हावे हे सर्वांचे मनोगत तेव्हा हिंदू ज्ञाती यांनी प्राणाची गरज न धरिता राज्याविषयी झटावे.

'औरगजेब पादशहा सारखा शत्रू ज्याची लाखो फौज व खजिना बेमुबलक, छकडयास छकडे द्रव्याचे भरवून कोटीशा ज्याचे बरोबर चालत आहेत अशाशी लढणे, आणि आपले सैन्य तर थोडे. यास्तव मनुष्य राखून, जाया होऊ न देता, मसलतीने त्याच्या सैन्याभोवते हिंडून, फिरोन त्यास लागेतोड करावी; रयतेची मात्र वैरण राखून रानातील वैरण जाळून टाकावी; रसद चालू देऊ नये; आपल्या फौजेत मणाची धारण, त्याच्या लष्करात शेराची धारण; अशा तऱ्हेने करीत मराठे फौज किती आहे हा अदमास ध्यानात येऊ देऊ नये; त्याचे फौजेस चैन पडू देऊ नये; त्यांची ठाणी व त्याजकडे प्रात मुलूख वहिवाटीत होते; तेथील लोकानी इकडे लक्ष ठेवून वागावे, आपली फौज ज्या प्राती जाईल त्या प्रांतातील लोकांनी, जमेनदारानी, खडणी देऊन त्याचा बचाव करावा; मोगलाची फौज असेल तेथे तेथे पचविसा तीसा कोसाचे छट्यानी राहून त्या फौजेस चैन पडू देऊ नये, असे महाराज करिते जाले. लोभ करीतच असत. मोगलाचे घोडे पाण्यावर आले असता पाणी न पीत त्यास मोगली लोकानी म्हणावे जे, पाण्यामध्ये धनाजी व सताजो दिसतो की काय ? रात्री दिवसा कोणीकडून येतील, काय करतील, असे केले. मोगलाई फौजेत आठही प्रहर भय बाळगीत. पादशहासी बहुत आश्चर्य झाले की, मराठी फौज ही बळावत आहे. अकस्मात यावे, बक मच्छ उचलून नेतो तसा घाला घालावा, शिपाईगिरीची इति करावी, प्रसग पडल्यास माघारे पळून जावे खाण्या-पिण्याचा दरकार बाळगीत नाही. पाऊस, ऊन, थडी व अधारी काही न पाहता घोडयावरच हरबरे व भाकरी, चटणी, कांदे खाऊन धावतात. त्यास कसे जिंकावे ? एक्या मुलकात फौज आली म्हणून त्याजवर फौजेची रवानगी करावी, तो दुसरेकडे जाऊन दानी घेतात मुलुख मारितात हे आदमी नव्हत, भूतखाना आहे.'

बखरकाराची भाष्य करण्याची, इतिहासात निर्माण होणाऱ्या नानाविध प्रश्नाची सागड घालून तत्कालीन वाचकाची मने सिद्ध करण्याची एक स्वतत्र पद्धती आहे. या दोन्ही चरित्रातून चिटणिसानी एका मोठ्या अडचणीच्या प्रसगातून शिताफीने मार्ग काढला होता. औरगजेबाच्या कैदेत राहिलेल्या येशूबाईच्या पातिव्रत्याबद्दल कोणाही मराठी वाचकाला चिन्हाळा वाटेल यात शका नाही. त्याबद्दल कसलाही सशय येऊ नये, याची दक्षता घेताना बखरकाराने येशूबाईच्या व्यक्तिमत्त्वावर मोठा प्रकाश टाकला आहे. या सबध प्रश्नाची स्वतत्र लेखात चर्चा करावी इतका तो लेख महत्त्वाचा आहे. लेख सपविण्यापूर्वी औरगजेबाच्या मृत्यूसमयीच्या हताशतेचे वर्णन करण्यासाठी जो पौराणिक पद्धतीचा प्रसग बखरीत योजिला आहे, तो मोठ्या गमतीचा असल्याने वाचकाच्या समोर ठेवणे अगत्याचे आहे, असे वाटते. राजारामाच्या अकाली मृत्यूनतरही औरगजेबाला मराठी मुलुखात शिरकाव करून घेता येत नाही. 'मराठ्यां'चे राज्य निस्तोष या कल्पनेने तो व्यथीत होतो आणि मग शेवटी त्याच्या डोक्यात प्रकाश कसा पडतो, त्याचे चित्र चिटणीस खालीलप्रकारे रेखाटतात.

'अवरंगजेब पादशाहास शरीरव्यथा बहुत होऊन हैराण जाहले. काळ समीप आला. त्या सधात बेगम याणी महमद शाहाजादे व आसदखान वजीर यास आपल्या पुत्राशी वाट काय म्हणोन विचारले. उभयतानी सागितले की, 'पादशाहासी विनंती करावयाची आमची योग्यता नाही. तुम्ही विनती करावी. तुमच्या विनतीमागे आम्ही अनुमोदन देऊ.' त्यावरून बेगम याणी पादशाहापाशी समाचारास जाऊन बहूत श्रमी होऊ लागली. त्याकाळी पादशाहा यानी विचारले की, 'श्रमी व्हावयाचे कारण काय ?' तेव्हा बेगम यांणी विनती केली की, 'दो गोष्टीविशी. आपल्यासारिखा पिता यास मृत्युसमय, आणि माझा पुत्र बदीस. म्हणोन श्रमी' हे ऐकून पादशाहा बिछा-यावर बसोन, जवळ होते त्यास बाहीर काढून, बेगम याजपाशी बोलले की, 'आम्हासाठी तुम्ही कष्टी न व्हावे. शतवर्षे वाचले असताही मृत्यू आहेच. पुत्रासाठी श्रमी होता तरी हा पुत्र तुझा पुन: शिवाजी उत्पन्न झाला आहे. शिवाजी व आम्ही बदरिकाश्रमी राज्य-इच्छा धरून तप केले. आमची तपश्चर्या अतिउग्र, तामसी, त्यायोगे म्लेच्छ जालो. ह्या धर्मांची स्थापना करावी हा नियम आमचा. शिवाजीची सात्त्विक तपश्चर्या म्हणोन हिंदू धर्मांत जन्म होऊन हिंदूची स्थापना करावी हा नेम त्याचा. आयुर्दाय कमी होऊन तोच शिवाजी हा तुझा पुत्र जन्मला. याचा झेंडा दिल्लीस लागेल. माझे पुत्र याचे आश्रयाने चालतील. असा तुझा पुत्र आहे. श्रमी व्हावयाचे कारण नाही. आज पचवीस वर्षे हिंदू मोडीत असता मोडत नाहीत. याचे कारण हे.' यावरून बेगम यानी विनती केली की, 'या गुह्य गोष्टी तुमचे तुम्ही जाणे. मनुष्यलोकात व्यवहाररीतीने आपण सार्वभौम दिल्लीपती. तुमच्या राज्यात मराठे गनीम म्हणवितात साप्रत कैदेत आहेत. आपल्या मागे याणी सार्वभौमत्व जरी केले, तरी पादशाहीत गनीम म्हणवितील याची वाट काय ? त्यावरून पादशाहा बोलिले की, 'दक्षिणेस साडेसहा सुभे यात यांचा घोडा गनीम न म्हणता फिरावा, असे करून देतो. माझे तिघे पुत्र, तू कन्या चौथी. चौथाई तुझे हिश्शाची तुझ्या पुत्रास दिली.' 'माझे पुत्रास वतन नाही,' म्हटल्यावरून साडसहा सुभ्यामध्ये सरदेशमुखी वतने दर शेकडा रुपये १२॥ साडेबाराप्रमाणे सनदा करून, त्या सनदेचे माथा आपले पजे अलत्याचे उठवून, शाहू महाराजास बोलावून आणून मुदबकातून सगळी भाकर आणविली. तो पादशाहाजादी इणे आडवी होऊन [म्हटले] सगळी भाकर दिली असता माझ्या मुलाची वाट काय ? म्हणोन अर्धी ठेवून अर्धी दिल्ही ती व सनदा शाहू महाराज याच्या ओटयात घालून, मस्तकी हस्त ठेवून बहूत दिवस राज्य करशील असा आशीर्वाद दिल्हा. बेगम यास सागितले की, 'यास मुक्त केलेस आपल्या नेमास अतर पडेल, आमच्या मागे सोडा.'

ऐतिहासिक सामान्य सिद्धात काढणे, मोठ्या व्यक्तींच्या स्वभावाची व गुणदोषाची चर्चा करणे हे आजच्या पद्धतीने बखरकारानी करावे, असे म्हणणे योग्य होणार नाही. त्यानी हे काम त्याच्या पद्धतीने, प्रकाराने केले आहे. त्यामागील भावना व जाणीव समजून घेतल्या पाहिजेत.

मल्हार रामरावानी अनेक प्रकाराने हे सिद्धात प्रस्थापनेचे व गुणदोष चर्चेचे काम केले आहे. ते बाळबोध आहे असे जरी वरून वाटते तरी तसे ते नसून काही खुब्यानी भरलेले आहे, असेच मला वाटते. □ □

सकाळचे नऊ वाजत होते. कलकत्त्याला अजून जाग येतच होती, पार्कस्ट्रीट, चौरंगी, डलहौसी स्क्वेअर ही व्यापाराची व उलाढालीची केंद्रे तर अता कुठे जांभया देऊ लागली होती. मुंबईचा आळस आणि मरगळ उगवत्या सूर्याच्या आगमनाबरोबर पळते. कलकत्त्याची बात तशी नाही. केव्हाही पहावे कलकत्ता आळसलेलंच. बंगाली भाषेत चटपटीत, घाई ते शब्दच नसावेत बहुतेक. चौरंगीवरून संध्याकाळी रमतगमत निघावे, ईस्टर्न ग्रँड हॉटेलच्या रुबाबदार व भव्य इमारतीवरून पुढे व्हावे आणि डावीकडे नजर फेकावी. कलकत्त्याचा सारा दिमाख येथे उभा राहिलेला दिसेल. दिमाखदार आणि रंगेल हॉटेलस् प्रकाशात नहात तुम्हाला खुणावीत, बोलवीत असतील. मोठ्या मोठ्या दुकानांच्या नखरेल show windo तुमच्या खिशाकडे पहात जिभल्या चाटतांना तुम्हाला दिसतील. आडोशा आडोशाला सर्वच भल्या व बुऱ्या धंद्याचे दलाल तुमच्या नजरेचा झेल अचूक टिपण्यासाठी टपून बसलेले आढळतील. आणि या सर्व गोष्टी पार्क स्ट्रीटवर नसत्या तरच आश्चर्य. लायसेन्सेस, परमिटस्, रिलीज ऑर्डर्स, सेल ऑर्डर्स,– कोळसा असो, लोखंड असो, रासायनिक पदार्थ असोत नाहीतर परकीय चलन असो त्याचे वायदे आणि व्यवहार याच नखरेल रस्त्यावरील उपाहारगृहात फेसाळणाऱ्या मद्याच्या साक्षीने, लचक नृत्याच्या तालावर पुरे केले जातात. १९४७ पासून या रस्त्याने अशा तऱ्हेचे किती व्यवहार पाहिले असतील कोणास ठाऊक.



दिवसा मात्र हाच रस्ता आपण जणू त्या गावचेच नाहीत अशा आविर्भावात वावरतो. दिवसा याच रस्त्यादर वर्दळ असते फक्त उद्योगपतींची व व्यापाऱ्यांची. पार्कस्ट्रीट एरियात लुंगासुंगा व्यापारी टिकूच शकत नाही. येथील व्यापारी हा त्याच्या त्याच्या भागात संस्थानिक असायलाच हवा. परदेशात त्याच्या दोन चार तरी शाखा असल्याच पाहिजेत आणि त्याच्या संस्थानात तो म्हणेल तो शब्द चालायलाच पाहिजे. आता हे सारे गुण त्या व्यापाऱ्यांचे की या पार्कस्ट्रीटचे हे कोडे मात्र मला अजून उलगडले नाही. मुंबईच्या बाजारात जसा मऱ्हाटमोळा चेहरा क्वचितच दिसतो तसा पार्कस्ट्रीटवर देखील नेहरू सदऱ्याच्या खिशात धोतराचा सोगा कोंबलेला बाबूमोशॉय विरळाच.

चुंग–ताय हॉटेलच्या उजवीकडच्या बोळकंडीत शिरून समोर दिसणाऱ्या जिन्याने वर गेलात की पहिल्या मजल्यावर लागते. ad India चे advrtising office. त्याला लागूनच आहे world travels ची प्रवासी कचेरी. दुसऱ्या माळ्यावर आहे शेरमन मॅथ्यू कं. ची कचेरी. पोलादाच्या प्लँट्स्ना लागणारी केमिकल्स ही कंपनी पुरवीत असते. तिसरा माळा व्यापला आहे स्मिथ शिपींग कंपनीच्या पसाऱ्याने. या कंपनीची जहाजे जगभरचा माल भारतात आणीत असतात. भारताच्या बाहेर नेत असतात. चवथा व पाचवा माळा नेमीचंद बिहारीलाल आणि कं. या आयात निर्यात करणाऱ्या कंपनीने व्यापला आहे. हॉटेल चुंग-ताय पासून नेमीचंद बिहारीलाल कंपनीचे संचालन करतो आहे खूबचंद.

जेमतेम मॅट्रीकपर्यंत शिक्षण घेतलेल्या खूबचंदने कलकत्त्याची अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. ४४ च्या दुष्काळात किड्यामुंगीप्रमाणे मरणारी कलकत्त्याची प्रजा पाहिली आहे. मेलेले मुडदे केरकचऱ्याप्रमाणे गाड्यात भरून नेणारे मग्रूर गोरे सोजीर पाहिले आहेत. ४७ च्या चिरफाडीनंतर आलेले निर्वासितांचे लोंढे पाहिले आहेत. नौखालीच्या यात्रेला महात्माजी गेले त्यावेळी खूबचंदचे आजोबा आपल्या छोट्या पेढीचा भार खूबचंदच्या वडिलांच्या अंगावर सोडून गेले. खूबचंदच्या नावावर चढलेले हे बहुधा शेवटचेच पुण्यकृत्य असावे. त्या-

नंतरच्या २६ वर्षांच्या काळात नेमीचद बिहारीलाल आणि कं. ने सरकारची सोय पाहिली व सरकारने देखील या सोयीची दामदुप्पटीने भरपाई केली. ५६ साली नेताजी सुभाष रोडवरील कोंदट जागा सोडून नेमीचद विहारीलाल क. पार्कस्ट्रीट-वरच्या आलीशान जागेत हलली आणि तीन वर्षांत खालच्या मजल्यावरचे चुगताय, ad India, world travel service, स्मिथ शिपीग व शेरमन मॅथ्यु खूबचदच्या वडिलांनी विकत घेतली. ६७ साली आयात परवान्यात केलेला फेरफार उघडकीस आल्यानतर झालेल्या बेअब्रूला घाबरून उत्तमचदशेठने आत्महत्या करून घेतली. तेव्हापासून खूबचद या अवाढव्य साम्राज्याचा मालक व चालक झाला. आजमितीला नेमीचद बिहारीलाल या कपनीच्या कलकत्ता, दिल्ली व मुबई-शिवाय हाँगकाँग, कुवेत व दुबाई येथे शाखा आहेत. वर्षाला ५०-६० कोटींची उलाढाल चालू आहे. मूळचा खुशालचेंडू पण वडिलोपार्जित आलेला जहरी कावेबाजपणा अंगात मुरलेला खूबचद आता अधिक पैसा मिळ-विण्यापलीकडे गेला आहे. हजारो लाखो रुपये अधिक मिळवून त्याची स्वतःच्या सपत्तीत भर टाकण्याची तृष्णा आता त्याला राहिली नाही आहे. आता त्याला स्वत.च्या साम्राज्याच्या बळावर इतर साम्राज्ये उल-थून पाडायची आहेत. इतर साम्राज्याना खिंडारे पाडायची आहेत त्याना चावे घ्यायचे आहेत. माझ्या साम्राज्याचा शब्द सगळीकडे चालतो हे सिद्ध करायचे आहे. आणि हे सिद्ध करताना तो कोणताही विधीनिषेध पाळीत नाही. विक्रीकर आणि आयकर याच्या कमिशनरपदीसुद्धा खूबचदच्या पसतीचीच व्यक्ती येते. जॉईंट प्लँट कमिटीपासून ते डायरेक्टर ऑफ इडस्ट्रीज, या पदापर्यंत खूबचदशेठचीच हुकमत चालते. अशी बोलवा ऐकू येते.

एक सुबक बसक्या नाकाची 'व्होक्स' सकाळी नवाच्या आसपास चुगताय समोर येऊन उभी राहिली. गाडी लाबून दिसायला लागल्याबरोबर फूटपाथवरच्या विक्रेत्या-मधील चुळवूळ कोणाच्याही डोळ्यातून सुटली नसती. गाडी थाबल्याबरोबर गुरखा धावत आला. खूबचदची ब्रीफकेस त्याने घेतली. व तो वर निघून गेला. चुगताय अजून झोपलेलेच होतं. झाडूवाले व वेटर्स यांची मात्र आता लगबग सुरू झाली होती. रात्री विस्कटलेल चुगताय जागच्याजागी बसविण्यास त्यानी सुरुवात केली होती. दुपारी ११ वाजता पुन्हा प्रसन्न मुद्रेने गिन्हाईकाचे स्वागत करायला चुगताय सज्ज होत होते. खूबचद झपाट्याने आत शिरला. एरिक झडपडून समोर आला. २५ वर्षांचा हा नवा anglo Indian मॅनेजर साफसफाई आणि थाट यांचा जरा जास्तच शौकीन होता. त्याच्यामुळे साफसफाईचा व एकूण सजा-वटीचा खर्च थोडा वरच गेला होता पण त्याबरोबरच गेल्या महिन्यापासून हॉटेलच्या विक्रीतही वाढ होत होती. आणि त्यामुळेच खूबचदने त्याला इन्क्रू देण्याचा विचार थोडा लाबणीवर टाकला होता.

'एरिक, ते कोपऱ्यातील टेबल आहे ना ते आज राखून ठेव. त्याच्याजवळ तो लोल-काचा स्क्रीन राहूदे. उत्कृष्ट मद्य आणि उत्कृष्ट अन्न यांची निवड मी तुझ्यावरच सोपवतो. ठीक आहे ?

'यस्सर, यस्सर' मालकाने दाखवलेल्या विश्वासाने एरिक मनोमन सुखावला.

'अरे हो, आणि हे पहा, मोनालिसाला सांगून ठेव कॅबेरेच्या वेळी आज आमच्या टेबलाकडे बिलकूल फिरकावयाचे नाही. जयरामन्‌ला असला आचरटपणा आवडत नाही. माझा साराच घाट विस्कटून जाईल. काय समजले ?'

'I shall follow your instructions Sir' एरिक म्हणाला.

केवढा प्रचड घाट खूबचदने जमवीत आणला होता. आज सध्याकाळी या नाट-काचा दुसरा अंक सुरू होणार होता. खूबचदची सारी इभ्रत, कावेबाजपणा, कोणतीही गोष्ट भल्याबुऱ्या मार्गाने विकत घेण्याची ताकद, कपनीचे नाव, सारे काही पणाला लागणार होते. दोन वर्षांपूर्वी हाँगकाँगहून त्याचा Business manager तयार लोखंडासाठी एक मोठी ऑर्डर हिंदुस्थान स्टीलसाठी घेऊन आला. ठरल्या-प्रमाणे स्टील कपनीने ऑर्डर पुरी केली. Export incentive चा पुरा लाभ उठवीत खूबचदने स्टेनलेस स्टीलचा कोटा भारी किंमतीला विकून अमाप नफा कमावला.

'सरळ सरळ व्यवहारात साली रडीसुद्धा पैसा कमावते.' हे तत्त्वज्ञान उराशी बाळग-णारा खूबचद या सरळ सरळ व्यवहारावर खुश राहिला असता तरच नवल होते. त्याच्या उलट्या खोपडीतून एक नवीच शक्कल पैदा झाली आणि पहाता पहाता त्याने तिला एक आकार दिला. हाँगकाँगहून येता येता ३००० टन बिलेट्सची ऑर्डर व १०% advance चा चेक तो घेऊन आला व हिंदुस्थान स्टीलकडे मागणी नोंदवून टाकली. येथे या नाटकाचा पहिला अक समाप्त झाला.

हिंदुस्थान स्टीलने मागणी नोंदवून घेतल्या-वर खूबचदच्या पित्यानी पडद्याआड खूपच हालचाल केली. order वरील रेफरन्सवरून allotment setter चा number हुडकून काढला. त्यावरून work order acceptance च्या स्टील प्लँटला गेलेल्या copy चा माग काढला. त्याच्यावरून Rolling schedule चेक केले. order चे Rolling केव्हा होणार त्याची तारीख आणि planing चा cardex नबर मिळवला. कोणत्या ओतभट्टीतून माल निघणार याचा पुरा पत्ता लावला. व त्या ओतभट्टीवर कोणता Mettalurgist मुख्य आहे याचा तपशील त्या metallurgist चा इतिहास भूगोल अर्थ व मानसशास्त्रासकट खूबचदच्या हातात ठेवला. खूबचदाच्या उलाढाली आता सुरू होत होत्या.

जयरामन् बिचारा सरळधोपट इजिनियर होता. अन्नामलाईच्या B. E. (MET.) परीक्षेत Distinction मिळवून हिंदुस्थान स्टीलच्या प्लँटवर १५ वर्षांपूर्वी रुजू झालेला

# पार्कस्ट्रीट वरील शार्क

• रमेश जोशी •

हा Engineer आता chief metallurgist होता. बिलेट्स्चे composition प्रमाणित ठेवण्याची पुरी जबाबदारी त्याची होती. त्याच्या तरबेज नेतृत्वाखाली तयार झालेली बिलेट्स् साऱ्या कसोटयांना पुरेपूर उतरत होती. आणि केवळ म्हणूनच जयरामन्च्या supervision खाली तयार झालेली बिलेट्स् परदेशी पाठवली जायची. जयरामन्च्या सेक्शनने आत्तापर्यंत rejection घेतले नव्हते. कलकत्त्याच्या कपनी अतिथीगृहात घामट हवेमध्ये जयरामन् अजयबाबूची वाट पहात बसला होता. अजय पाच वर्षापूर्वीपर्यंत जयरामन्चा सहकारी होता. आता आगरवाल उद्योगसमूहाचा मुख्य इजिनिअर झाला होता. अजयच्या पूर्वीच्या ओळखीमुळे आगरवाल समूहाला लोखडाची चणचण कधीच भासली नव्हती अजयची एक चक्कर Plant वर झाली की समूहाच्या नावाने धडाधडा वाघिणी कोसळत. लोक अजयबद्दल बरेच उलटेसुलटे बोलत असत. पण जयरामन्ला त्यात काही दोष वाटत नसे. कोणी काही सागू लागले की जयरामन् म्हणायचा 'अरे चागला जिता–जागता–चगा माणूस आहे, का नावे ठेवता ?' जयरामन्च्या स्वभावाशी हे सुसगतच होते कारण त्याला या अवनीतलावर लुच्चे, फसवे, लफगे अजून भेटलेलेच नव्हते, त्याचे अस्तित्त्व अजून त्याने मान्य केलेच नव्हते. काही काही माणसे अशीच असतात. माणूस हा गुन्हेगार प्रवृत्तीचा असू शकतो या गोष्टीवर त्याच विश्वासच नसतो. त्याच्या स्वभावबदलाला ती कारणे जोडतात व त्याची गुन्हेगारी सरळ परिस्थितीच्या माथी मारून मोकळी होतात.

'हॅल्लो जयराम, चागला जाडजूड झालायस् की! आमचा कृष्णन् काय म्हणतोय आणि बारकी वेगी! ए, साला गेल्यावेळी दिलेले Cadbury चे पाकीट दुर्गापूरला नेलसना? का दिलस् मध्येच कोणाला तरी! चलो यार बाहर तो निकलो यहाँ बैठे बैठे क्या करोगे ?'

हा अजय यायचा तो असा धबधब्यासारखा खळखळत यायचा. अजयच्या आग्रहावर apeal नसायचेच. हा जणू परिपाठ झाला होता. जयरामन् मुकाटयाने उठून चालू लागला आणि चुपचाप गाडीत जाऊन बसला. गेल्या ५ वर्षांचा हा परिपाठच होता. आता गाडी येथून निघणार, न्यू मार्केटला जाणार. तेथे जयरामन्ची छोटया मोठया पण विलायती वस्तूची खरेदी होणार. आणि मग सध्याकाळी ७ च्या सुमाराला Blue fox मध्ये Parle street वर आलिशान खाना. पैसे अर्थातच अजयचे. Blue fox ही जयरामन्ची खास आवड. कारण येथे कॅबेरेची धमाल नसायची. शांत सुरेल सगितावर चमचमीत गप्पा व स्पेशल मासा यावर जयरामन् खुश होता.

न्यू मार्केटवरून गाडी निघाली आणि दुसऱ्या Traffic Light पासूनही पार झाली तेव्हा जयरामन् भानावर आला.

'अरे बेटा अजय–Blue fox तर मागेच राहिले.'

'अबे Blue fox ची ऐसीतैसी. आज तुला चुगतायची मच्छी खिलवतो. साला आख्या कलकत्त्यात अशी मिळाली तर मच्छी खाण सोडून देईन.'

अच्छा, अच्छा, आज काय चिनी मच्छी पकवली काय ?

जयरामन् मिश्कील हसत म्हणाला. 'अरे छोडो यार. आजपर्यंत या अजयने अशी छोटी छोटी मच्छी नाही पकडली. आणि ज्या मच्छीला पकडले तिला घरी बद करूनच ठेवले. जाने दीजिये इन बातोको भैय्या. ये आगया हॉटेल–ए–चुगताय'

नेहमीच्याच नखऱ्यात, तोऱ्यात, दिमाखात चुगताय झळाळत असते. दारावरचा भूतीया आल्यागेल्याला सलाम घालत असतो अजय–जयराम आत शिरतात. आतील अधाराला डोळे सरावण्यासाठी दारातच जरा उभे रहातात.

'आयीये आयीये अजयबाबू, अरे आज सकाळीच मी तुला ये म्हटले तर आजच आलास. सकाळी म्हणाला असतास तर जरा चागलं टेबल राखून ठेवल असत.'

"जयराम–मीट मि. खूबचद. जमीनसे अस्मानतकका–ये बिल्डिंगका मालीक–या बिल्डिंगच्याबाहेर बसणाऱ्या पानवाल्याच्या दुकानापासून नेमीचद बिहारीलालपर्यंतचा वालीद. जिनके हाथ और कान बहूत लबे है. कुवेतपासून हॉगकॉंगपर्यंत पोहोचले आहेत. अरे बाबा हा कोटयधीश आज आपले या हॉटेलमध्ये स्वागत करायला उभा राहिला आहे हे आपले नशीब."

"नही नही साब कोओी बात नही" खोखो हसत खूबचद म्हणाला, आज घरी बायको नाही. विचार केला कोणी ओळखीचे आले की इथेच थोडे खावे आणि मग घरी जावे. आईये आईये यहाँ आ जाईये आज आप और आपके दोस्त मेरे मेहेमान है!"

लोलकाचा त्रिलोरी screen असल्या तेजाने तळपत होता, खूबचदाचे डोळेही असेच लकाकत होते. थडगार बीअर आता हळूहळू घशाखाली जाऊ लागली. त्या खळाळत्या द्रव्याचा सुखद गारवा आता साऱ्या शरीरभर पसरू लागला. आता गप्पा अधिकच मोकळेपणाने होऊ लागल्या.

"जयरामसाब, आज बरी आपली पेहेचान झाली. माझी छोटीमोठी खूप कामे plant वर असतात. मी नेहेमीच plant वर येतो. भेटत जाईन आलो की." खूबचद म्हणाला.

"अच्छा, आपली छोटीमोठी कामे मला होण्यासारखी असतील तर सागून द्या मला. दरवेळी तुम्ही plant वर यायची तकलीप का घेता ? जयरामन्ने जरा जादा अदबीनेच म्हटले.

"नको नको साहेब आम्ही व्यापारी माणसं. आधीच बदनाम झालेली. आमच्या भानगडी कशाला तुमच्या डोक्यावर घ्यायच्या. कुठे कोणी जास्त लक्ष घातल तर फट् म्हणता ब्रह्महत्त्या व्हायची. अपनी अपनी जगहपे हम अच्छे है आप अच्छे है!"

खूबचद आता हळूहळू जाळे पसरू लागला.

"खूबचदशेठ आपण फिकीर करू नका. आपले काम नेक असेल सरळ असेल तर मला सांगा मी करून देईन, मी कुणाला भीक घालीत नाही. अखेर जोपर्यंत आपली नियत शाबूत आहे तोपर्यंत लोकाच्या बोलण्याशी आपल्याला काय करायचे ? तुम्ही बिनधोक मला सांगत चला."

जाळे तर छान पसरल होते. मासा जाळयात आपण होऊन येत होता. अजयला पलीकडच्या टेबलावरून बोलावणे आले. तो तिकडे गेला. खूबचदने एरिककडे पाहून बोट हवेत नाचवले. आणखी बीयरच्या

वाटल्या आल्या.

बीअरची सूक्ष्म नशा आता जयरामवर पसरू लागली. साऱ्या चित्तवृत्ती हलक्या झाल्या. अेक सुखद जाणीव शरीरभर फुलून येअू लागली.

"जयरामनसाब आता तुम्ही म्हणताच आहात तर सागतो, पण तुम्हाला माझे काम नाही जमायचे–परवडायचे नाही, "

"भैय्या, माझ्या हातात असेल तर तुझं काम झाल म्हणून समज त्यात तुला अवघड वाटण्यासारखे काही नाही. माझ्या हातून होण्यासारख नसेल तर मीहूनच तुला सागेन. डर किस वातका ?

"अच्छा, तो सुन लीजिये " खूबचद पुढे सांगू लागला. "गेल्यावर्षी मी हाँगकाँगहून बिलेट्स्‌ची order नोदवली ३००० टनासाठी Export साठी जरूर ते License काढले. ३ लाख रुपये advance भरले. माझी order आता process मध्ये आहे ? अजून दोन तीन महिन्यात delivery, मिळेल. पण बीचमे एक मुसीबत आयी. " लट्ठ चिरूट पेटवण्यासाठी खूबचद थोडा थाबला. चागला दवदबीत धूर तोडातून काढून खूबचद पुढे बोलू लागला.

"माझ्या तैवानमधल्या मूळ गिऱ्हाइकाने त्याची ऑर्डर बदलली. त्याने आधी दिलेल्या प्रमाणात थोडा बदल केला. आणि कार्बन अर्धा टक्का प्रतिशत वाढवून मागितले. माझ्या हाँगकाँगच्या manager ने ती गोष्ट कबूल केली आणि मला लिहिले. मी Export Promotion Council, H. S. L., Foreign Trade या सगळ्या मडळीना लिहून थकलो पण action कोणीच घेत नाही. आता ती बिलेट्स्‌ जर जशीच्या तशी Roll झाली तर माझी party ती reject करील. आणि आता अवधी पण फार नाही. काय कराव काही कळत नाही. अगदी काकुळतीला येऊन खूबचद सागत होता.

"बिलेट्स्‌ अशीच Roll होअून गेली तर देशाच व माझ स्वतच ३·५ लाख डॉलर्सचे नुकसान होईल. इभ्रत व पत जाईल ते तर वेगळेच. मोठच सकट अुभे राहिले आहे. export permit वरील प्रमाण बदलणे काही तुमच्या हातात नाही. ते जोपर्यंत बदलत नाहीत तोपर्यंत HSL काही करायला तयार नाही. " खूबचंद कावेबाजपणे आपल्या बोलण्याचा परिणाम काय होत आहे हे निरखीत बसला होता. अपेक्षित भाव त्याला जयरामनच्या चेहेऱ्यावर दिसत होते. जयरामन्‌ विचारात गढला होता. अधून मधून ग्लासातील बीअर घुटक्या घुटक्याने पीत होता. खूबचंद अत्यत धीमेपणाने बसला होता. त्याला अपेक्षित उत्तरासाठी थाबायला भरपूर वेळ होता.

"ही सरकारी नोकरशाहीची दिरगाई एकदा कोणीतरी मोडूनच काढायला पाहिजे. आप चिंता छोडिये, जी काय प्रमाणं असतील ती माझ्याकडे द्या. प्रमाणाप्रमाणे बिलेट्स्‌ तुम्हाला करून देण्याची जिम्मेदारी माझी. तुमचे प्रयत्न तर चालूच ठेवा. नाही तर export inspection च्या वेळी तुमचे व माझे दोघाचेही वाघे होतील मला फक्त तुमचा order acceptance नंबर द्या. ह्या पुढले सारे माझ्यावर सोपवा. "

जयरामन्‌ म्हणाला.

नतरच्या जेवणात मात्र मग खरी मजा आली. एरिकचे एकदर व्यवस्थापन फार चांगले जमून गेले. अजयने व जयरामन्‌ने चुगताय सोडले तेव्हा जयरामन्‌वर एक प्रकारच्या तृप्तीची भावना पसरली होती. ☐

अॅड-इंडियाच्या खुर्चीत वातानुकूलीत गारव्याचा सुखद आस्वाद घेत खूबचद बसला होता तोंडातला चिरूट फकाफका धूर ओकीत होता हातातल्या पेन्सिलीने समोरच्या कागदावर रेघोट्या मारण्याचा रिकामा उद्योग करणारा खूबचद फोनची घटा वाजली की रिसीव्हर अधीरतेने उचलीत होता. अपेक्षीत फोन अजून येत नव्हता. केबीनमध्ये काही कामासाठी अथवा सल्ल्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांवर विनाकारण खेकसत होता. कलकत्त्याच्या डॉक्समध्ये येऊन पडलेल्या निर्यात होणाऱ्या मालाची कसून तपासणी चालू होती. ३००० टन बिलेट्स्‌चे भवितव्य Export promotion चे तपासणी अधिकारी ठरवणार होते. खूबचदचा माल अजून कमी दर्जाचा ठरत नव्हता. किंवा कमी दर्जाचा ठरल्यामुळे त्याचा निर्णय जाहीर करणे Promotion च्या अधिकारी वर्गाला अवघड वाटत होते. खूबचदचा administrative officer गेले चार दिवस मुगळ्यासारखा Laboratory ला चिकटून बसला होता. माल कम अस्सल असल्याची कुणकुण त्याच्या केव्हाच कानावर आली होती. त्यामुळे तोही धास्तावून गेला होता. शेठला ही वाईट बातमी कशी द्यायची त्याची तालीम गेल्या दोन दिवसात कमीत कमी शभर वेळा तरी त्याने मनातल्या मनात केली असेल. बिचारा मुखर्जी. त्याला काय माहीत आपला शेठ याच बातमीसाठी ऑफीसमध्ये तडफडत आहे ते.

दोन तासाच्या खोळंब्यानंतर मुखर्जीला एकदाचा report मिळाला. रिपोर्ट कसला म्हणा वज्राघातच होता तो. साराच्या सारा माल नाकारला गेला होता. २५–३० लाखाच्या नुकसानीचे आकडे मुखर्जीच्या डोळ्यांसमोर ताऱ्यासारखे चमकू लागले. दृष्टीपुढे खूबचदचा निर्दय चेहेरा येऊ लागला. रिपोर्ट खूबचदच्या ताब्यात देऊन लवकरात लवकर सटकण्यासाठी काय कारणे उभी करावीत त्याचा विचार मुखर्जीचे मध्यमवर्गीय पाढरपेशे मन करू लागले. ad-India तील खूबचदच्या खोलीबाहेर मुखर्जी उभा होता. हातापायाला घाम फुटला होता. धोतराच्या आतले पाय लटपटत होते. जिभेला कोरड पडली होती. हळूच दार उघडून मुखर्जी आत गेला.

"आ... ह... मुखर्जी... रिपोर्ट आणला का ? "

"हाँ बाबूजी. लेकिन–मतलब–लेकिन..."

मुखर्जीची बोबडीच वळली.

"घाबरायला काय झाल ? rejection आहे ना ? असू दे–असू दे. मी पहातो काय करायचे. तू आता घरी जाऊन आराम कर. उद्या नाही आलास तरी चालेल. नाहीतर तस कशाला चल मीच तुला घरी सोडतो. चार दिवसाच्या हेलपाट्यानी दमला असशील. चल. "

लालभडक व्होक्स कलकत्त्याच्या गर्दीतून वाट काढीत निघाली. गार वाऱ्याने दुपारपासून भणाणलेल मस्तक आता ताळ्यावर येऊ लागल होत. खूबचद Rejection येऊन इतका शात कसा. छोट्याशा चुकीवरोबर ज्वालामुखीसारखा उफळणारा खूबचद – भलेबुरे काम छोटा मोठा अधिकारी करीत नसेल तर थेट गृहमत्र्याला फोन लावणारा खूबचद एखाद्या वृत्तपत्राकडे सापडलेले, खूबचंदाच्या भानगडी असलेले, कागदपत्र नष्ट करण्याचा हुकूम गुडांना देणारा खूबचद.

छे छे काही तरी चुकत होते, एकतर हा खूबचद तरी नव्हता किंवा Promotion Council चा Report Rejection चाच यायला हवा होता. मुखर्जींचे मुरलेले डोके काम करीत होते. आणि आता कुठे सुटत असलेले दुवे जुळायला लागले होते. Jigsaw Puzzle मधले मधले तुकडे अजून जुळत नव्हते पण जयरामन्च्या गेल्या काही दिवसात खूबचदाने घेतलेल्या गाठी, जयरामन्ला पोहोचती झालेली बंगाली मिठाई—खूबचदाच्या order चा त्याच्या इतर कारकुनाने केलेला पाठलाग—काहीतरी सगत लागत होती. पण शेवट कळत नव्हता. खूबचदचा थंडपणा तर त्याला आणखीच अस्वस्थ करीत होता. काहीतरी घडवले होते काही तरी घडवले जाणार होणार होते. काय आहे काही समजत नव्हते. कुठेतरी सुरुग पेरल्यासारखे वाटत होते. वात जोडली गेली होती, केवळ बत्ती लावायची राहिली होती. कोण लावणार कुठे लावणार. विचाराच्या तद्रीत गाडी मुखर्जीला घरासमोर उभी राहिलेली कळली सुद्धा नाही.

¤

कलकत्यात पूजेच्या उत्सवाचा थाट उडाला होता. महोत्सव दरवर्षीपेक्षा काकणभर अधिकच वाटत होता. दुष्काळ—महागाई—तस्करांना झालेली अटक—वीजकपात कशा कशाचा परिणाम महोत्सवावर झालेला आढळत नव्हता. रसगुल्ले चमचम करायला बदी होती पण रस्त्यातून हिंडताना तस काही वाटत नव्हत. खूबचदचा "मॉर्ट कार्लो" बगला रोषणाईने सजला होता. खूबचद भल्या मोठ्या हॉलमध्ये एका प्रशस्त खुर्चीत बसला होता मुखर्जींच्या हातात एक लाबलचक यादी होती. यादीप्रमाणे मिठाईचे पेटारे भरले जात होते. आत पूजेसाठी शुभसदेश देणारी कार्डे सरकवली जात होती. यादी वाचता वाचता मुखर्जी जयरामन्च्या नावावर थोडा अडखळला. मुखर्जींचा बदललेला सूर खूबचंदलाही खटकला.

"साहेब जयरामन्वर चार्जशीट ठेवला गेला असं ऐकतो. त्याचा काय गुन्हा झाला साहेब?" नजर तिरपी ठेवीत मुखर्जीने खूबचदला विचारले.

नको असलेला विषय नेमका आज पूजेच्या दिवसात निघाला होता. क्षणभर खूबचदच्या मनात मुखर्जीला तिरसटून उडवून लावण्याचा विचार आला. विनाकारण चाभारचौकशा केलेल्या त्याला एरवी मुळीच चालल्या नसत्या. पण आजची गोष्ट वेगळी होती. मुखर्जीला बरेच काही समजून चुकले होते. मालाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याला सर्वस्वी मुखर्जींचीच मदत होणार होती. मुखर्जीला दुखवून चालणार नव्हते. सहज खूबचद उठून उभा राहिला. मुखर्जींच्या खाद्यावर हात टाकून त्याला तो बाहेरच्या बाल्कनीत घेऊन आला.

'मुखर्जी—चिंता करनेकी कोई बात नही—मी जयरामन्ला वाऱ्यावर सोडून देईन असे तुला वाटत का? आतापर्यंत मी मला उपयोगी पडलेल्या कोणालाही दैवाच्या आधीन केल नाही. जयरामन्ने जन्मात पाहिले नसतील एवढे पैसे मी त्याला एक रकमेने देईन. कालच कपनीने त्याची चूक कबूल केली. दोन महिने चाललेला घोळ सपला. नुकसान भरपाई मागणारी आपली नोटीस कपनीला गेल्यावर ते लोक सरळ आले. फारच गळयात पडले म्हणून २०० रुपये टनावर सौदा तोडला त्याच्या नशिबाने ३००० टनावर निदान २०० रु. तरी त्यांना मिळणार आहेत. नाहीतर मॅनेजिंग डायरेक्टरपासून सर्वांचे राजिनामे लिहून घेतले असते. अच्छा छोडिये इस बातको... ही फाईल जाताना घेऊन जा. उद्यापासून यातल्या सर्व मिल्सना पत्र जाऊदेत. कोणालाही १४०० रु. टन याखाली quote करू नकोस orders finalise करण्याची घाई करू नकोस. दिवसेंदिवस बिलेट्स् आणि लोखंडाच्या किंमती वाढत जाणार आहेत.'

मुखर्जींची अस्वस्थता आता जास्तच दिसू लागली अवाक् झाला होता बिचारा सारी करामत ऐकून. सारे चित्र स्पष्ट दिसू लागले. खूबचदने सरकारला फारच मोठी टोपी घातली होती. हिय्या करून मुखर्जी म्हणाला.

'साब—ही सारी गोष्ट वर्तमानपत्राला कळली आणि त्यानी गहजब केला तर आपण जागेवर राहाणार नाही. हल्ली जनता फार खवळली आहे कोणाला म्हणता कोणाला ठेवीत नाहीत.

गडबडाट करीत खूबचद हसला, म्हणाला 'अरे या जनतेला मी चांगलाच ओळखून आहे. अळयाप्रमाणे वळवळ करणारी ही जनता यांना काही दुसऱ्या जगाची जाण आहे होय? अळयानी भरलेल्या घमेल्यात दगड टाकला तर काही क्षण अळयाची वळवळ वाढते. नतर काही वेळाने त्याच अळया त्या दगडावर देखील चढून इकडे तिकडे मजेत फिरू लागतात. दगडाखाली मेलेल्या अळयाची त्याची जाण केव्हाच विसरली जाते आपली भारतीय जनता या अळयासारखी आहे. वर्तमानपत्र वगैरे तात्पुरती आरडाओरड करतील. अग्रलेख लिहितील आणि त्यानतर आपले काम सपले म्हणून सारे गप्प बसतील. आपण आपले काम करू—त्याना त्याचे करू देत. तू कशाला त्रास करून घेतोस? अरे हां परवा तू म्हणत होतास ना? तालवर् जागा बघितली आहे. त्याला पाच हजार विसार म्हणून द्यायचे आहेत. हे पाकीट राहूदे, तातडीने जागा घेऊन टाक गेली तर पुन्हा मिळणार नाही.'

मुखर्जींच्या खाद्यावर थोपटून खूबचद झपाट्याने आत निघून गेला. धोतराच्या सोग्याशी चाळा करीत मुखर्जी अवाक् होऊन जागच्याजागी खिळला.

□ □


# श्रीग्रामायन

मूल्य
पंधरा रुपये

लखक
श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# महानगर कलकत्ता

वि. भा. देशपांडे

पुण्यात मे महिन्यात मॅजेस्टिक बुकस्टॉलचा समारंभ होता. पु. ल. देशपांडे यांची तिथं भेट झाली. नाटकावरून बोलणं निघालं. ते म्हणाले, नवीन काय पाहिलंस. मी उत्तरलो–पुण्यात होणारं आणि येणारं सर्व नाटकं पहातो. कधीमधी मुंबईला जाऊन पहातो. त्या पलीकडचं पहाण्याची इच्छा आहे. बोलता बोलता ते म्हणाले, दिल्लीची संगीत–नाटक अकादमी अशा प्रकारे कुणी नाटकं पहात असेल तर प्रवास–अनुदान देते. तू मला ऑगस्टमध्ये भेट...पु. ल. अकादमीचे उपाध्यक्ष आहेत...

मी आणि माधव वझे ऑगस्टमध्ये त्यांना खरोखरीच भेटलो. कामाच्या उदंड व्यापात त्यांनी आमचं काम लक्षात ठेवून केलं... आणि आम्हा दोघांना बंगाली रंगभूमी पहाण्यासाठी संगीत–नाटक अकादमीकडून प्रवास–अनुदान लाभलं. कोणतही अनुदान न घेतलेला आमचा एक मित्रही नाटकप्रेमानं आमच्याबरोबर होता–त्याचं नाव बापू गोखले. दुसऱ्या प्रांतातलं नाटक बघण्यासाठी नाटकवेड्या मित्राबरोबर सात–आठशे रुपये खर्चून येणारा नाट्यप्रेमी सध्याच्या दिवसात विरळाच. एका अर्थी गोखले म्हणजे थोरच !

दसरा गाठून कलकत्त्याला जायचं योजलं. कारण तिथली दुर्गा-पूजा आणि जत्रा हा प्रकार पाहायला मिळावा हा हेतू. त्याप्रमाणं दसऱ्याच्या अगोदर दोन दिवस (म्हणजे २३ ऑक्टोबरला) कलकत्ता मुक्कामी पोहोचलो. पधरा–सोळा फलाट असलेलं प्रचंड स्टेशन, पण त्याला ग्रेस नाही व्ही. टी. स्टेशनसारखी शान नाही. पोहोचलो तेव्हा अंधारून आलं होतं. साडेचार–पाचलाच तिथं अंधारतं. पहाटे पाचला उजाडतं. आपल्याला सुरुवातीला जरा चमत्कारिक वाटणारं असंच हे आहे. टॅक्सीत बसल्यावर थोड्या वेळातच रस्त्याच्या चढ-उतारांचा अंदाज आला. रस्त्याविषयी आणि गावाविषयी काही मत तयार होत असतानाच टॅक्सीचं टायर खाली बसलं...तर असा रस्ता.

मुक्काम होता महाराष्ट्र निवासात–तीन आठवडे.

दसरा होईस्तोवर दोन–तीन दिवस तुफान पाऊस झाला. सारं शहर जलमय झालं. पहावं तिकडं घोट्यापासून गुडघ्यापर्यंत पाणीच पाणी...त्यातच दुर्गापूजा पहाणाऱ्यांची गर्दी. कोणतही वाहन यायला तयार नाही. डोक्यावर पाऊस कोसळत होता. खाली पायानं पाणी कापीत चाललो होतो. पाणी आणि रस्ता दोन्हीही संपत नव्हते. मनात येऊन गेलं, पाऊस असाच आणखी काही दिवस कोसळत राहिला तर नाटकं पहाण्याचं काय करायचं ? दुर्गेला आणि कालीला आमची काळजी...पुन्हा पाऊस म्हणून नाही...फार थंडी नाही... तसंच जीवघेणं उकडणंही नाही.

परप्रांतात गेल्यावर जेवणखाण्याचा आणि भाषेचा प्रश्न सतावणारा. पैकी रहाण्या–जेवण्याचा प्रश्न महाराष्ट्र निवासानं सोडवला. अस्सल ब्राह्मणी पद्धतीचं रुचकर, स्वच्छ जेवण. योग्य वेळेला गेलं तर सारंच गरम गरम जेवण मिळायचं. भरपूर जेवण, भरपूर आग्रह, अगदी तुपाचादेखील आग्रह. निवासामधली स्वच्छता ही एक स्मरणीय आणि अनुकरणीय गोष्ट आहे. ती स्वच्छता तात्कालीक आणि दर्शनी स्वरुपाची नाही. तिला सातत्य आहे. स्वच्छता ठेवण्याचाही आग्रह आहे. स्वच्छतेच्या साथीला विनम्रता आहे.आदरातिथ्य आहे शेकडो महाराष्ट्रीय माणसं राहायला–जेवायला एकत्र येऊनही इतके सद्‌गुण तिथं गुण्यागोविंदानं नांदत असलेले पाहून आम्ही अवाक्‌च झालो होतो. महाराष्ट्र निवासाच्या तळमजल्यावर महाराष्ट्र मंडळ आहे. त्यांचा स्वतंत्र हॉल आहे. सध्याकाळी झकासपैकी पत्त्याचा अड्डा पडतो. सर्व मराठी सणवार मोठ्या उत्साहानं साजरे केले जातात. कलकत्त्यातल्या मराठी मंडळीचं ते एक सांस्कृतिक केंद्र आहे. या वर्षी या मंडळाला पन्नास वर्षे पूर्ण होताहेत. मोठा उत्सव आहे. अभिमानानं सुवर्णोत्सव साजरा करावा असं या मंडळानं खूप श्रेय कमावलेलं आहे. तसा लौकिक मिळवलाय. भारतातल्या महाराष्ट्र मंडळात कलकत्त्याच्या मंडळाचा उल्लेख गौरवानं केला जातो...अभ्यंकर, नलिनीबाई जोशी, साने इत्यादी अनेक पदाधिकारी कार्यमग्न असतात. याच मुक्कामात नॅशनल लायब्ररीचे जोशी भेटले. शांत, अबोल असा हा माणूस. खूप वाचलेला, विचार केलेला, साहित्याची पक्की जाण असलेला. तेंडुलकरांची नाटकं बंगालीत आणण्यास मदत करणारा...लक्षात रहाणारा माणूस. आणखी लक्षात रहाणारे मराठी कुटुंब म्हणजे पंडितांचे ! तारा पंडित स्वत: लेखिका, त्यांचे यजमान चित्रकार, मुलही कलाकार. महाराष्ट्रातली अनेक माणसं त्यांच्याकडं आत्तापर्यंत येऊन गेलेली. प्रत्येकाचं तितक्याच आत्मीयतेनं स्वागत. आलेल्या माणसांना जी जी मदत हवी असेल ती करण्याची दिलदार वृत्ती. पुन्हा अपेक्षा काही नाही. ते कुटुंब वीस वर्षे कलकत्त्यात असल्यानं बंगालीची उत्तम जाण. त्यामुळं पुण्या–मुंबईहून जाणाऱ्या माणसाला फारच सोयीचं. तशाच सौ. सिंधू तिवारीबाई. अतिशय हरहुन्नरी. मराठी–हिंदी–बंगाली नाटकाशी संबंधित. बोलायला फटकळ, मनात काही रहाणार नाही. घरीदारी नागपुरी थाटाचं ऐसपैस स्वागत. अशी अनेक मराठी माणसं भेटत गेली...

...कलकत्ता अवाढव्य पसरलेलं आहे. ते एक महानगरच आहे. त्याची लोकसंख्या नेमकी कुणीच सांगू शकत नाही. कारण सरकारी

जनगणन आणि प्रत्यक्षातली सख्या यात खूपच अंतर असल्याचं सांगतात. अनधिकृत वस्ती आणि सख्या किती हे कोण सागणार? शहराचा विस्तार जसा प्रचड तशीच लोकसख्याही प्रचडच. खर तर कलकत्त्यात सारच प्रचड आहे. लोकसख्येप्रमाणच विपुल दारिद्रय आहे. सहज लक्षात येणारी गोष्ट म्हणजे श्रमाची काम बिहारी माणूस करतो, व्यापार गुजराथी—मारवाडी करतो. बगाली माणूस बाबूगिरी करतो. तसा बगाली माणूस एकूणातच आळशी—थड. तो असतो तेव्हा थड नाहीतर नक्षलवादी बनतो. सध्या कलकत्ता शात आहे. त्यामुळ बगाली नक्षलवादी माणसाच उग्र स्वरूप आम्हाला पाहायला मिळाल नाही. पण दोन—तीन वर्षांपूर्वीच्या अनत कथा ऐकायला मिळाल्या. नक्षलवादी चळवळ का थाबली अस आम्ही काहीना विचारल. तर ते म्हणाले, लोकांनाच ती त्रासाची व्हायला लागली. मूळ चळवळीत गुडांचा भरणा अधिक झाला. रोजच जीवन जगणं असह्य झाल. एक विशेष, खून, मारामारीत बगाली माणसाची हत्या कमी झाली. खून झाले ते प्रामुख्यान बंगालेतर माणसांचेच! ही चळवळ विद्यार्थी—तरुण आदीच्या हाती होती. बेकार तरुण मोठ्या प्रमाणात त्यात सामील होते. बेकार तरुणाना पार्टीत सामावून घेण्याची मोठी योजना' होती. त्या तरुणाला पिस्तूल—बदूक वगैरेच पद्धतशीर शिक्षण दिलं जायच—कदाचित अजूनही ते चालू असेल.त्यामुळ तिथल्या बहुसख्य तरुणाना 'बुलेटस 'ची तपशिलात माहिती आहे. सहाजिकच कुणी पोलिसाना घाबरत नाही. रस्त्यावरचा—चौकातला पोलीस ही एक प्रदर्शनी वस्तू वाटते. काहीना गंमतीचा, बेफिकीरीचाही वाटतो. नाटकातदेखील तो टिंगलीचाच विषय आहे. तो आपला शत्रू आहे, आपल्याला सरकारच्या वतीन गोळ्या घालणारा आहे अशीच अनेकाची समजूत. नक्षलवादीच्या उग्र चळवळीमाग राजकीय कारणापेक्षा आर्थिक दारिद्रय, बेकारी, सामाजिक अस्वस्थता, परपरा प्रस्थापिताविरुद्धचा एकूण राग अशी कारण अनेकानी सागितली. पण प्रत्येक बगाली माणूस नक्षलवादी चळवळीच समर्थन करताना दिसला आणि गुडगिरीचा निषेधही! ही चळवळ कायमची थडावली का? अस विचारताच उत्तर आल—नाही, ती पुन्हा कधी सुरू होईल ते सागता येणार नाही...

एक—दोन विद्यार्थी भेटले. कॉलेज, विद्यापीठ, शिक्षण व्यवस्था याबद्दल आदरानं. उत्साहान फारस कुणीच बोलत नव्हत. गेल्या मार्च—एप्रिल महिन्यात झालेल्या परीक्षेचा निकाल ऑक्टोबरात लागला. तोपर्यंत विद्यार्थ्यांन काय करायच? पुढच्या वर्गात बसायला परवानगी असते. इटरव्ह्यू द्यायचे. मिळाली तर नोकरीही. पण निकाल उशिरा का लागतात तर तो विद्यार्थी म्हणाला—निकाल उशिरा लावण्यात विद्यापीठाची दिरगाई एवढच कारण नसतं तर विद्यार्थी सघटना, राजकीय पक्ष आणि सरकारचा सुद्धा हात असतो. विलब करण्यामाग हेतू एकच तो म्हणजे सहा महिने पदवी मिळण्यास विलब होतो. पदवी आणि बेकारी यांचा समतोल राखण्याचा एक दुबळा प्रयत्न, बेकारी कमी करण्याचा रोखण्याचा तो म्हणे एक भाग असतो. याचा अर्थ विद्यापीठ अन् सरकारच जाणे! पण तिथला विद्यार्थी ही अंदरकी बात जाणून आहे. तो बेकारही आहे आणि बेदरकारही! तो सर्रास 'कॉपी'. करतो. मोठ्या प्रमाणात कॉपी करूं देण्याच्या अनधिकृत संघटना आहेत. इच्छा असूनही कॉपीला विरोध होत नाही. कारण परीक्षार्थी आणि शिक्षक याच्यामध्ये एखादा सुरा किंवा पिस्तूल असते. शिवाय विद्यार्थी म्हणून जो कुणी परीक्षेला बसला असेल त्याच्या नजरेतील विखार असतो तो वेगळाच...दसरा ते दिवाळी पूजेनिमित्त कॉलेज—विद्यापीठं बंद होती. त्यामुळं प्रत्यक्ष तिथं जाऊन फारसं पाहाता आल नाही. पण काही प्राध्यापक भेटले. त्यातल्या एकाला विचारल, सध्या विद्यार्थ्यांमध्ये वातावरण कस आहे? विद्यार्थी—शिक्षक नात कस आहे? साभिप्राय हसून तो उत्तरला—काही वर्षांपूर्वी शिक्षकाला पाहून विद्यार्थी मान खाली घालून जात असत, आता कॉलेजच्या इमारतीतून जाताना विद्यार्थी आसपास असले तर आम्ही मान खाली घालून जातो...त्या प्राध्यापकाच एवढच वाक्य खूप काही सागून गेल.

बगाली माणसाच प्रादेशिकत्त्व हे भारतीयत्त्वा इतकं ज्वलत आहे. त्याला आपल्या भाषेचा, प्रदेशाचा, वाङ्मयाचा, कलेचा आणि एकूणच सगळ्या गोष्टीचा जहाल अभिमान आहे. सर्वसामान्य बंगाली माणूस हिन्दी बोलायला राजी नसतो. बिहारी माणूस आपल्याशी हिन्दी बोलेल पण बगाली माणूस बोलेलच अस नाही. सुशिक्षित माणूस फार तर इग्रजीत बोलेल, पण हिन्दीत नाही. रवीन्द्रनाथ टागोर आणि सुभाष चन्द्र ही त्यांची प्रमुख दैवत. त्याचे अनेक ठिकाणी फोटो आणि पुतळे. टागोरांच व्यक्तित्त्व आणि कर्तृत्व हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा, अभिमानाचा विषय. अनादरांची यत्किंचितही भावना नाही. नवीन पिढी] टागोराच्या साहित्याशी मनान जवळीक साधू शकत नाही. अगदी थोड्याना—विध्वंसकाना आता ते सार नकोसं वाटत! पण बगाली माणसाच्या मनातून—जीवनातून टागोर पुसून टाकण ही सामान्य गोष्ट नाही हे मूठभर विरोधकाच्याही ध्यानी आलेल आहे. अर्थात विरोधाचा सूर तसा नगण्य आहे. बगाली माणूस तसा परपरा प्रिय, सनातन वृत्तीचा. जातीभेद विशेष नाही. आपल्या परंपरा, दैवत साभाळीत राहाण्यात त्याला आनद. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो स्त्री—पूजक आहे. केवळ साहित्यात—कलेतच नव्हे तर प्रत्यक्ष व्यवहारात देखील तो स्त्रीचा सन्मान राखतो. ट्राम—बसमध्ये स्त्रियांसाठी स्वतत्र जागा तर असतेच पण एरवी देखील तिचा मान राखून तिला जागा दिली जाते. गर्दीतही तिला अकारण धक्का लागणार नाही याची तो काळजी घेईल. तसा कुणी प्रयत्न केला तर त्याला समज देईल. दुर्गापूजेची प्रचड गर्दी आम्ही पाहिली. पण त्यात मवालीपणा दिसला नाही. कलकत्त्याचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे तिथं गुंडगिरी आहे पण मवालीपणा नाही. विश्वास बसणार नाही अशी ही गोष्ट! ...भरपूर भात, मासे खाणारा हा बंगाली माणूस स्वच्छतेच्या बाबतीत अत्यत निष्काळजी आहे. लोकसख्येत जसा या शहराचा अग्रक्रमांक आहे तसाच अस्वच्छतेमध्येही! आधुनिक वस्तीचा काही भाग वगळल्यास बहुतांश कलकत्ता अस्वच्छ आहे. रस्त्यावर कचऱ्याचे ढीगच्या ढीग पडलेले. त्यातच सार्वजनिक नळातून पाणी वाहात असलेले. मुख्य म्हणजे त्या अस्वच्छतेबद्दल कुणालाही खत नाही. म्युनसिपल कार्पोरेशन यथाशक्ती तो कचरा उचलून नेते. पण त्यांची यत्रणा अपुरी आहे. स्वच्छतेबद्दल आणि

माणसांच्या वाहतुकीबद्दल ही यंत्रणा उदासीन कां ? असं आम्ही अनेकाना विचारलं. उत्तर आलं की, ती यत्रणा तरी काय करणार ! लोक टॅक्सच भरीत नाहीत. लोक टॅक्स भरण्याबाबत उदासीन त्यामुळं पैसा नाही, अन् पैसा नाही म्हणून काही करता येत नाही. आणखी एक बघायला मिळालं ते म्हणजे ट्राम–बसमध्ये तिकिटं आपणाहून काढण्याच प्रमाण फारच कमी. कडक्टरनं दोन–तीनदा विचारल्यावर मग पैसे देण होत, ते सुद्धा सगळयांचं होतं असं नाही. कारण तो पर्यंत उतरण्याचा स्टॉप आलेला असतो. कडक्टरही मर्यादेपेक्षा जास्त आग्रह धरीत नाही. ट्राम–बस–मिनीबस–खाजगी बस–टॅक्सी इत्यादी वाहनात किती माणसं घ्यावीत याला तसं काही बधन नाही. बसमध्ये रीतसर जागेवर, दारात टपावर तसेच मागच्या–पुढच्या बाजूला खिडकीला–दाडीला धरून ज्यांना ज्यांना जाता येईल त्यांनी जाव–प्रवास करावा. अट एवढीच की प्रत्येकानं आपल्या जिवाची जोखीम घ्यावी. तिकीट न काढता जीव सांभाळून जाण यातच प्रवासाच सारं कौशल्य साठवलेलं. आपल्या इकडच्या सारखी कंडक्टरची गुर्मीतली भाषा नाही. निघाल्या जागेपासूनच बस माणसानी ओथबलेली असते, त्यामुळ कुणी कुणाला बोलायचा प्रश्नच येत नाही. अस हे सगळे उघडपणान का सहन केल जातं त्याचं कारण फार महत्त्वाचं आहे. लोकसख्या आणि उपलब्ध वाहतुकीची साधनं यांच प्रमाण व्यस्त आहे. उदंड माणस एका वाहनातून गेल्याशिवाय हा प्रश्नच सुटणं शक्य नाही. वाहनाना माणसाच्या सख्येच बधन जस नाही तसंच रहदारीच्या नियमाचही नाही. अपवादात्मक काही मोठे चौक सोडले तर बाकी ठिकाणी वळणाऱ्या दिशेला हात दाखवणे, ओव्हरटेक करणे, आयलडला वळसा घालणे वगैरे गोष्टीचे नियम आणि निर्णय ज्याचे त्याने घ्यावचे. काही झालं तर पोलीस निवांतपणान उभा राहून छानपैकी दुर्लक्ष करतो. रहदारीच्या नियमांच पालन न केल्यान मुबईपेक्षा आमच्याकड अपघात कमी होतात अस तिथल्या काहीच म्हणण ! यावर आपण काय बोलणार ! हावरा स्टेशनवर आपली स्वत ची गाडी प्लॅटफॉर्मवर नेता येते. त्या गाडीचही प्लॅटफॉर्म तिकीट काढावं लागत. आता महत्त्वाच्या ठिकाणी वाहनाच्या पार्किंगसाठीही वेळेनुसार पैसे द्यावे लागतात. तिथली ठराविक जागा एखाद्यान लिलावान घेतलेली असते. तो आपल्याकडून पैसे वसूल करतो. तशी पद्धत मुबईला लौकरच येणार असल्याच ऐकलं...

दुर्गापूजा हा बगाली माणसाचा अभिमानाचा उत्सव. तस पाहिल- तर बारा महिन्यात तेरा देवीच्या पूजा होतात. देव मात्र एकही नाही. निदान आम्ही ऐकला नाही. आम्ही होतो तेवढयात कालीपूजा, लखीपूजा (लक्ष्मी पूजा), दुर्गापूजा अशा तीन पूजा झाल्या. दुर्गापूजेचा मडप सुरेख असतो. रगीत चुणीदार कापडाचे विविध आकार केले जातात. त्या चुण्यामुळे नक्षीकाम साधले जाते. दिव्याची आरास तर असतेच. पण मुख्य म्हणजे देवीची मूर्ती विलक्षण सुदर असते, मोहक–देखणी असते. त्या मूर्तीसाठी आणि मडपासाठी हजारो रुपये खर्च होतात. गणपती उत्सवाप्रमाणे उत्साह असतो. प्रत्येक गल्लीत दोन-तीन पूजा असतात. वर्गणी गोळा केली जाते. खर तर सक्तीन घेतली जाते. आता पूजेमधलं भक्तीच रूप जाऊन उत्सवाच रूप शिल्लक राहिलय. पूजोत्सव गल्लीतल्या दादा मडळीकडे गेलाय. त्यामुळ उघडपणान कुणी काही बोलत नाही...

देवीच्या मूर्ती जिथ तयार करतात त्या 'कुमारतुली' भागात आम्ही जाऊन आलो. प्रथम कामटयाचा आकार करून घेतात. त्यावर थान म्हणजे भाताच्या गवताचं आवरण घालतात. नंतर प्लॅस्टरचा हात फिरवतात. मूर्ती एकदम हलकी असते. देवीचे केस लावणे, रंगकाम करणे, दागिने-कपडे घालणे वगैरेसाठी वेगवेगळी खास माणसं असतात. हजारो रुपयाचा धदा होतो. पण तिथला कलाकार दारिद्र्यातच राहातो. ही दुर्गापूजा पाहायला सारं शहर लोटतं. देवीची मुख्य सजावट ही शोला प्रकारानं केलेली असते. शोला हा हलक्या-पातळ लाकडाचा पाढरा प्रकार. अतिशय तेजस्वी दिसतो. शिपल्यासारखा असतो. ती सजावट करून देणारे काही स्वतंत्र कलाकार आहेत. दसऱ्याला हा उत्सव संपतो. परस्पराना त्या दिवशी मिठाई वाटली जाते. बगाली मिठाई तर फार प्रसिद्ध. नासक्या दुधापासून केलेली. खव्याचा संबध नाही. नाव मोठी मजेदार. रसगुल्ले, सोनपापडी, मिष्टीदही, सदेशा वगैरे. दुर्गापूजेनिमित्त 'जात्रा' प्रकाराचे खेळ अनेक ठिकाणी होतात. बगाली माणूस या दुर्गापूजेनिमित्तान सर्व प्रकारच्या कामाला रजा घेतो. बँक, पोस्ट वगैरे ऑफिसे तीन-चार दिवस बद असतात. सारे आनदात असतात. कुणाला कशाचेच काही वाटत नाही. कारण त्यावर बोलण म्हणजे श्रद्धेला तडा जाणार आहे, अस मानतात. दुर्गापूजेइतकीच दुसरी प्रिय गोष्ट म्हणजे रवींद्रनाथ टागोरांची कर्मभूमी शातिनिकेतन. दोन दिवस तिथ राहिलो. तिथही सर्वांना सुट्टी होती. पण प्राचार्य कौशिक भेटले. त्यांनी काही गोष्टी दाखवल्या. विशेषत: रवीद्रनाथांची निवासस्थान पाहिली. उत्तरायण, शामली, कोर्णाक, पुनश्चो ही त्यांची निवासस्थान. त्यांच्या चित्राच प्रदर्शन पाहिल. त्याच्या सर्व वस्तूची, अन्य काही गोष्टीची जपणूक चागली केलीय. काही इमारतीच मूळ रूप बिघडवून टाकलेल नाही. तेही महत्त्वाचच ! बोलपूर गावापासून दीडेक मैलावर शातिनिकेतनचा परिसर आहे. परिसर सुंदर आहे. दाट झाडी, काळेशार रस्ते, नीरव शातता. बाह्यजगाचा तसा काही सबध नाही. सगीत, नाटय, शिल्प इत्यादी अनेक कलासाठी वेगवेगळया इमारती. टागोर ज्या झाडाखाली विद्यार्थ्यांना शिकवीत असत ते पाहिल. तशाच आणखी पुष्कळ जागा तयार केलेल्या आहेत. गोलाकार सिमेंटचं मोठं बाक आहे. वीस-बावीसपेक्षा अधिक विद्यार्थी एका वर्गाला नसावेत. काही तास वर्ग-खोलीत तर उरलेले मुक्तांगणात. नव्या सिमेंटच्या इमारती सुदर वनराजीला हिणवतात की काय असं वाटतं. पण त्याला इलाज नाही. कालाचा महिमा मानलाच पाहिजे. अजूनही जगातून अनेक विद्यार्थी शातिनिकेतनला येतात. मोठया आनदाने शिकतात. हे विद्यापीठ केंद्र सरकारन ताब्यात घेतलेलं आहे, त्यामुळं अनेक प्रश्न सुटलेले आहेत. तिथ सखरीराय चौधरी भेटले. (ज्याच्याकडे पु. ल. काही दिवस राहिले होते.) डॉ. कौशिक भेटले. तिथले बहुतेक सारे शिक्षक तिथच शिकून तयार झालेले. काही टागोराच्या प्रत्यक्ष सहवासात राहिलेले ! शांतिनिकेतन दोन दिवसात पाहण हे काही खरं नाही. किमान आठ-पधरा दिवसाचा निवात मुक्काम हवा. तिथल्या वातावरणात मुक्त वावरायला हव. शिक्षक-विद्यार्थी प्रत्यक्ष काम करताना पाह्यला हवं. पण ते शक्य नव्हत. तेवढया थोडया वेळात एका सगीत शिक्षिकेकडून रवीद्र सगीत टेप करून घेतलं. ती भूमी कलाकाराची हेच खरं. तिथ लाकडी वस्तू फार सुरेख मिळतात. दिल्लीला गेल्यावर जसा आग्र्यापर्यंत जाऊन ताजमहाल पाहावा तस कलकत्याला गेल्यावर आडवाट करून शातिनिकेतन पाहायला जाव...अशा महानगरीतली 'वग रगभूमी' आम्ही पाहिली. तिचा दर्शन-वृत्तांत पुढील अंकी. ☐

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**२१-१२-७४ ते २७-१२-७४**

### रेल्वेमंत्री मिश्रांची इंदिराजींना डोकेदुखी

संसदेचे अधिवेशन संपून पतप्रधान श्रीमती इदिराजी गाधी, ललित नारायण मिश्रा, वगैरे मत्र्यानी सुटकेचा श्वास सोडला असला तरी ते सुटलेले नाहीत. धनु राशीतील रवी आयात परवाने प्रकरण लोकात असतोष निर्माण करणार आहे. इदिराजीनांदेखील ते वारे झोबणार आहेत. त्या ललित नारायण मिश्रांना मत्रिमडळातून बाहेर काढण्याचा गभीर डाव खेळू लागतील. केद्र व उत्तर प्रदेश, महाराष्ट्र अशा काही राज्यातील मत्री भ्रष्टाचारात गाजतील. महाराष्ट्र मत्रिमडळातील एखादा मत्री कांग्रेस पक्षाच्या केद्रस्थानी अगर केद्र मत्रिमंळात घेण्याचा विचार वेगाने सुरू होणार आहे.

### मेष : सर्व क्षेत्रात भाग्योदय

राशीस्वामी भाग्यस्थानी ही एकच गोष्ट तुमच्या जीवनाची प्रगतीकारक घोडदौड सुरू झाली आहे याची ग्वाही देणारी आहे. अकरावा गुरू व्ययाकडे झपाट्याने वाटचाल करीत असला तरी जाताना तो तुम्हाला पैशाचे घबाड देऊन जाईल असे मानायला हरकत नाही. या आठवड्यात तुमची शुभराशी कन्या आहे. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर एकदरीत खूश राहाणार आहेत. तुमच्या मागण्याना 'हिरवा कदील' दाखवणार आहेत. शेती अवजारे व खते याच्या व्यापारात भरपूर नफा मिळेल. दलालीचा व्यवसाय तेजीत राहील. राजकीय नेत्याना लोकप्रियता लाभेल. महिलांना नोकरीत अपेक्षित स्थान मिळेल.

### वृषभ : अतिरेक टाळा

आठव्या मंगळाची गंभीरपणे दखल घ्यावी. आधीच तुमची तब्वेत नाजूक. त्यातच साडेसाती. केतूही वाईट फल देणारा. ही ग्रहपरिस्थिती शारिरिक दुर्बलता, मानसिक अस्वस्थता आणते, रक्तावर परिणाम घडवते. यासाठी आहारात तिखट, आंबट याचा अतिरेक होऊ देऊ नये. तसेच जागरणे टाळावीत. नोकरी धंद्याची परिस्थिती तशी वाईट राहाणार नाही. पण मालक अगर वरिष्ठ याची कचकच चालूच राहील. पैसा कमी पडणार नसला तरी प्रतिष्ठेला तडा जातो काय अशी काळजी वाटत राहील. प्रवासाचा बेत पुढे ढकला. दुसऱ्याच्या भाडणात पडू नका. बेकारांना लहान प्रमाणात कामधंदा मिळू शकेल. महिलानी नोकरीत आपल्या कामाकडे लक्ष द्यावे.

### मिथून : प्रेमाची चाहूल

चद्र-रवीचा प्रतियोग आहे. ससारात हा प्रतियोग थोडीफार वादळे निर्माण करण्याची शक्यता आहे. पण तरुण तरुणीची हृदये मात्र प्रेमरज्जूनी बदिस्त होण्याची शक्यता आहे. त्यांनी भावनेच्या अथवा विकारावस्थेच्या आहारी जाऊ नये. सोमवार ते बुधवार कोणतेही नवे काम, नवी योजना आखा. पैशाचे प्रयत्न करा अपेक्षित काम होईल. गुरुवार व शुक्रवार नोकरी करणाऱ्यांना अनुकूल आहे. नोकरीत वरिष्ट एखादी महत्त्वाची जबाबदारी तुमच्या अगावर टाकतील, ती नाकारू नका. पदवीधर बेकारानी नोकरीपेक्षा एखाद्या स्वतत्र व्यवसायाची योजना आखावी. नोकरी मिळेल ती तात्पुरती असेल. या आठवड्यात प्रवासाचा बेत पुढे ढकला. महिलांना ससारात आनदाचे वातावरण निर्माण करता येईल.

### कर्क : चांगले मित्र मिळतील

तुम्ही कवी अगर लेखक असाल तर या आठवड्यात तुमची वाङ्मयीन क्षेत्रातील कामगिरी तुम्हाला लौकिकास पोचवील. तुमच्या वाङ्मयीन कृतीचे कौतुक होईल. सोमवार ते गुरुवार परदेश प्रवासा साठी तुम्ही चालवलेला प्रयत्न यशस्वी होईल. शुक्रवारी राजकारणातील एखाद्या उच्च पदस्थ व्यक्तीची कृपा तुम्हाला लाभून तुमच्या अनेक महत्त्वाच्या कामांना चालना मिळेल. स्थावराच्या अगर नवीन घरवाप्रणीला हा आठवडा तेवढासा अनुकूल नाही. नोकरीतील गुप्त शत्रू व गुप्त विरोधक काहीसे नरमतील. या वेळी तुम्हाला मित्राच्या मगल कार्यात भाग घ्यावा लागेल. त्यासाठी खर्च होईल. तुम्हाला सोमवार व मगळवार शुभवार आहेत. याची नोद ठेवून कोणतीही योजना आखा. महिलांनी पैसा जपून वापरावा. उसने पैसे देऊ नयेत.

### सिंह : उच्च पद मिळेल

पाचव्या स्थानी अत्यत बलशाली असा ग्रह आहे. मगळाचे हे सामर्थ्य तुम्हाला वैभवाकडे नेणारे आहे. यावेळी तुम्ही मागे राहू नये. नोकरी, राजकारण, समाजकारण वगैरे क्षेत्रात तुमची शान वाढणार आहे. राजकारण हा तुमचा प्रमुख धर्म आहे. गेले काही दिवस राजकारणात होत असलेली तुमची उपेक्षा आता सपत आल्याची जाणीव होऊ लागेल. सोमवार, मंगळवार व शुक्रवार इष्ट देवतेची मनोभावे उपासना करा. नोकरी-व्यवसायात काही चागल्या घटना घडतील. भेटत नसलेली व्यक्ती भेटेल. तुम्हाला विरोध करणारी व्यक्ती तुमच्यासाठी श्रम करण्याची इच्छा दर्शवील. विवाहेच्छू तरुण-तरुणीचे विवाह दिमाखात पार पडतील. वृद्ध लोकाना सहानुभूती मिळेल. महिलांना ससारात नवीन वस्तू खरेदी करता येतील.

### कन्या : नोकरी नकोशी वाटेल

नोकरी करणाऱ्यांची रास बऱ्याच अशी कन्या असते. इमाने इतबारे नोकरी करावी व मालकाचा धदा व्यवसाय वैभवाला न्यावा हीच तुमची वृत्ती. पण हा आठवडा नोकरीच्या दृष्टीने काही तेवढासा अनुकूल नाही. कामाचा ताण तर असह्य होईलच, पण त्या कामाचे श्रेयदेखील तुमच्या पदरात पडणार नाही. पैशाची चणचण भासली नाही तरी खर्चाला आळा घातला नाही तर कर्ज काढण्याची पाळी येईल. सोमवारी येणे असलेले पैसे वसूल होतील. मगलकार्या-

निमित्त आहेराच्या निमित्तानेही खर्च होईल. सध्या प्रवासाचा बेत आखू नये. काही ग्रह वाईट आहेत. लेखन मोबदला मिळणे लांबणीवर पडेल. सोमवार ते गुरुवार काही बाबतीत शुभ आहेत. महिलांना नोकरीत फार काम पडेल.

## तूळ : अफाट खर्च

हा आठवडा तसा फारसा वाईट नाही. तिसरा रवी उद्योगाच्या व व्यापारी क्षेत्रात नव्या आकांक्षा निर्माण करील. उद्योग व्यवसायात नवे दालन उपलब्ध होईल. प्रामुख्याने सौंदर्य प्रसाधने, रेशमी कापड, कच्ची फिल्म या धंद्यात तुमचा नव्याने प्रवेश होईल. भागीदारीच्या व्यवहारात मात्र न पडणे हिताचे ठरेल. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहार जरा जपूनच करा. सोमवारी नोकरीचे काम होईल जुनी नोकरी असेल तर काम बदलेल. सेवानिवृत्तीला आलेल्या व्यक्तीला मुदतवाढ मिळेल. गुरुवार व शुक्रवार प्रवास घडेल. विवाहेच्छूंना लग्नाचा योग आहे. महिलांना कलागुण दाखविण्याची संधी मिळेल.

## वृश्चिक : नोकरीत वरचष्मा

अजून तुमच्यावर मंगळाचे वर्चस्व आहे. त्याचप्रमाणे राहूचेही वर्चस्व आहे. तुम्हाला अधिकाराची लालसा असते. मित्र हो, या आठवड्यात तुम्हाला बदली होऊन खास निर्माण केलेल्या एकाद्या महत्त्वाच्या जागेवर जावे लागेल. वरिष्ठांवर, मालकांवर व हाताखाली असणाऱ्या लोकांवर तुमचा वरचष्मा राहील. रविवार, गुरुवार व शुक्रवार महत्त्वाची कामे करावीत. यश मिळेल. वाङ्मयनिर्मिती, शेती अवजारे खरेदी, फर्निचरच्या उद्योगाचा श्रीगणेशा इत्यादी कामे करा. नोकरीसंबंधातील एकादे जुने प्रकरण वाढवू नका. महिलांना नोकरी करायची व चार पैसे मिळवायची संधी मिळेल.

## धनू : प्रगतीला मोकळी वाट

तुम्हाला राहू बारावा आहे. अजून तरी काही काळ तो तुमची तब्येत सुदृढ होऊ देणार नाही. पण रवी-मंगळ हे दोन प्रबळ ग्रह एकत्र बारावे राहून तुम्हाला छळीत होते त्यापैकी निदान रवी आता तुमच्या मदतीला आला आहे हे भाग्यच समजा. नोकरी व्यवसायात तुमची जी कोंडी होत होती ती फुटलेली आहे. नवा धंदा करण्यासाठी अनुकूल वातावरण करायला संधी मिळेल. शैक्षणिक क्षेत्रात पुढे पाऊल पडेल. नोकरीच्या बाबतीत एखादा इंटरव्ह्यू ठरला असेल तर त्यात तुम्ही पास व्हाल. आर्थिक परिस्थिती थोडीफार सुधारेल. महिलांच्या मनातील निराशा कमी होऊ लागेल. तब्येत सुधारेल.

## मकर : पैशाला जपा

तुमच्या अवतीभवती दुष्ट ग्रहांचे जाळे विणले जात आहे याची दखल घ्यावी. कोणत्याही बाबतीत धाडस आणि दुर्लक्ष होणे म्हणजे नुकसानीला आमंत्रण देणेच होय. रविवार ते बुधवार विशेष काळजी घ्यावी. नोकरीत चुका होऊ देऊ नका. बँकेत कॅशियर असणारे, हिशेबाचे काम करणारे, प्रत्यक्ष पैशाचा संबंध असणारा व्यापारी, यांनी फसवणूक होऊ देऊ नये. मोहाला बळी पडू नये. उसना पैसा देऊ नये. या आठवड्यात पत्रव्यवहारात मात्र थोडेफार यश लाभेल. प्रवास कोणत्याच प्रकारे न करणे हिताचे. विशेष करून विमानप्रवास टाळा. महिलांनी दागिने या आठवड्यात तरी मिरवण्यासाठी घालू नयेत.

## कुंभ : नोकरीधंद्यात बढती

रवी-मंगळाची तुमच्यावरील अद्वितीय कृपादृष्टी हीच मुळी या आठवड्यातील तुमच्या असामान्य यशाची गुरुकिल्ली आहे. ही गुरुकिल्ली तुम्हाला लाभली आहे. तिचा उपयोग करून घेणे हे आता तुमच्या हाती आहे. शनिवार हे मंगळवार या दिवशी सत्तेवर असलेल्या एकाउच्चपदस्थ व्यक्तीकडून तुम्हाला निमंत्रण येईल. राजकारणात तुम्हाला महत्त्वाचे स्थान देण्याचा विचार त्याच्याकडून चालू होईल. नोकरीत या वेळी तुम्ही मोठेच भाग्यवान ठरणार आहात. ध्यानी मनी नसलेला लाभ तुमच्या पदरी पडणार आहे. व्यापारात लोखंडी सामानाचे व्यापारी विशेष भाग्यवान ठरतील शनिवार व बुधवार तुमचे अनुकूल वार आहेत. महिलांना समाजात मोठा मान मिळणार आहे. नोकरीत यश.

## मीन : राहाणी उंचावेल

चौथा शनी व बारावा गुरू सोडले तर ह्या आठवड्यात तुमच्या जीवनात काही विशेष घडणार आहे. अनेक दिवस तुमच्या राहाण्याच्या जागेचा प्रश्न कुजत पडला होता तो या आठवड्यात निर्णयाप्रत जाईल. तुम्ही नव्या जागेत राहाणार आहात. परिस्थितीनुसार बंगलाही मिळेल. सोमवार, मंगळवार व शुक्रवार हे दिवस त्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. उंची फर्निचर व कापड चोपड खरेदी करता येईल. आर्थिक परिस्थिती सुधारेल. लॉटरी अगर रेस यामध्ये भाग घेण्यात काहीच अर्थ नाही. सार्वजनिक कार्यात पुढाकार मिळेल. नोकरीत अनुकूल स्थित्यंतर घडेल. महिलांना डॉक्टरी व्यवसायात फायदा भरमसाठ होईल.

□ □


पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये

शनवारवाड्यातील
शमादान
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०

# चकनाचूर

भाऊ पाध्ये


## फरिदा

### पडद्यावर जान भरणारी कमाल की लडकी

' मजबूर 'मधला सीन अमिताभच्या घरी प्राण त्याची ' मजबुरी ' काय आहे, ह्याचा तपास करण्यासाठी येतो. ' मा ' सुलोचना त्याला अमिताभ पकडला गेलाय म्हणून बोलून जाणार असते इतक्यात बहेन फरिदा मध्येच तोंड घालते. "येईलच भैया आता" आणि मग ती खुशीने फुगल्यागत भैया कशी घरात मजा करतो हे सांगू लागते. आणि सांगता सांगता तिला रहावत नाही. ती कोसळतेच ! अक्षरशः हेलावून सोडते फरिदा आपल्याला. मग प्राण उठतो. तो मा. अलंकार सारखा बच्चाला जवळ घेत नाही की सुलोचनासारखा विधवा आईला दिलासा देत नाही, तो फरिदाच्या डोक्यावर हात ठेऊन तिला आश्वासन देतो, ' तुझा भाऊ परत येईल. ' फरिदाची ती अदाकारी–हलक्या फुलक्या मूडमधून दुःखी मूडमध्ये जाण्याची हा एक सेल्युलॉईडच्या पट्टीवर कोरून ठेवलेला बेहेतरीन नमुना आहे. कधीही न विसरण्यासारखा. म्हणूनच प्राण त्या घरात दुसऱ्या कुणाला दिलासा न देता फक्त फरिदालाच देतो, ते विलक्षण ' फिटिंग ' असा त्या प्रसंगाचा शेवट आहे.

' मजबूर 'चे नायक–नायिका आहेत अमिताभ आणि परवीन बाबी. फरिदा सहाय्यक भूमिकेत तिच्या वाटेला आले आहेत तीन–चारच प्रसंग पण या तीन चार प्रसंगातून तिने या चित्राची नायिका परवीन नाही आपण आहोत हे नुसत्या अदाकारीवर दाखवले आहे. यात ती लॉटरी लागल्यानंतर आपण घरात तळं बांधून त्यात मासे कसे पाळणार आहोत, हे पेश करतो ते प्रसंग किंवा ' कॅरम ' खेळताना अमिताभ आणि मा. अलंकारच्या लबाडीच्या संशयावरनं, तिचे जेवणाच्या ताटावर जाईपर्यंत भांडत राहाणे. प्रत्येक प्रसंग तिने फुलवला, जीवंत केला आहे; बुजुर्ग सुलोचना किंवा आघाडीचा हीरो अमिताभ हे तिला नुसते साथ देतात. ज्यावेळी ' मजबूर ' चित्रपटाचा गोड शेवट होतो, त्यावेळी नेहेमीप्रमाणे हीरो–हिरॉइन्स हातात हात घालून गाणे गाताना न दाखवता दिग्द : रवि टंडन यांनी अमिताभ आपल्या वहिणीसाठी–फरिदासाठी गाताना दाखवून समर्पकता साधली आहे असेच म्हणेन मी.

प्रत्येक जमान्यामध्ये एक तरी चांगली अदाकारा तनुजाची तकदीर घेऊन आलेली असतेच. मला आठवतं एकदा त्यावेळी टॉपला असलेली नंदा म्हणाली होती की, " काय हा व्यवसाय आहे, तनुजासारख्या चांगल्या अभिनेत्रीला या चित्रपटामधून कामे मिळू नयेत. " अगदी असेच उद्गार जया भादुरीने अलीकडे फरिदाच्या बद्दल बोलताना काढले होते. फरिदा मोटी आहे, ठेंगू आहे, हे तिला काम देण्याच्या



**फरिदा जलाल आणि नवा चेहरा महेश – रमेश सैगलच्या ' संकल्प 'मध्ये**

आड येत. तरी 'मजबूर' मधल्या सारख्या सहाय्यक भूमिका मधूनही ती फारशी का चमकू शकत नाही. तिच्यापेक्षा किती सामान्य दर्जाच्या अदाकारा मीना टी–जयश्री टी यांची तीच ती फालतु अदाकारी पाहून प्रेक्षक बोअर झाला आहे, तरी त्यांना कामे मिळतातच पण, फरिदाला मात्र कामे मिळत नाहीत. अलीकडे बऱ्याच दिवसांनी फरिदाचे हिरोइनची भूमिका असलेले पिक्चर ' जीवन रेखा ' आलं होतं, त्यावेळी फरिदाच्या बेहेतरीन अदाकारीच्या अनेक आठवणी जाग्या झाल्या. मी ' लोकसत्ते 'च्या शरद गुर्जरना म्हणालो, " ही इतकी चांगली अदाकारा असून, कधी दिसतच नाही पडद्यावर " त्यावेळी शरद म्हणाला, " तिला योग्य अशा विनोदी भूमिका लिहिल्याच जाताहेत कुठे ? " शरदचे म्हणणे मला पटले. हिंदी सिनेमावाल्यांचा हा एक तरीका बनला आहे. आज चांगले कॉमेडी रोल्स ते लिहीतच नाहीत. रोटीमधली जगदीपची भूमिका, बिदाईमधली असराणीची भूमिका शानदार मधली अरुणा इराणीची भूमिका आणि ' वरदान 'मधली महमूदची भूमिका सोडली तर अलीकडे चांगली विनोदी किंवा हलकी–फुलकी भूमिका पहायला मिळतच नाही. आणि त्सांतल्या त्यात अरुणा इराणी, पद्मा खन्ना ह्या सहाय्यक भूमिकामध्ये अत्यंत सहजतेने हलक्या फुलक्या भूमिका निभावणाऱ्या अदाकारा व्हॅंपिश भूमिकामध्ये पेश होऊ लागल्या आहेत. उरली आहे फक्त फरिदा. तिच्या एकटीसाठी कोण लाईट रोल लिहील ? फरिदाने पडद्यावर पाऊल टाकले, त्यावेळी आपल्या पडद्यावरून विनोद निरोप घेत होता. राजेश खन्नाची हिरोगिरी जोरात होती आणि महमूदच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली होती. फरिदाची पहिलीच भूमिका जवान पायलट राजेशच्या नटखट प्रेयसीची होती. आपले राजेशवर प्यार असताना ' ना–ना–ना–ना ' म्हणणारी फरिदा केवळ मोटी आणि ठेंगू वाटली म्हणून लोकांनी नाके मुरडली ! (तसा राजेश काय उंच आहे म्हणा !) राजेश तर ' आराधना 'मध्ये तिला मुद्दामच ' मोटी ' म्हणून हाक मारायचा (डायलॉगमध्ये नसताना). ' आराधना ' हीट झाला. ' आराधना 'च्या यशामुळे फरिदाकडे काही लहानमोठ्या भूमिका आल्या. काही फालतू निर्मात्यांनी तिला हिरॉइन म्हणून पेश करण्याचाही घाट घातला होता. पण, ती पिक्चर्स पुढे कधी पडद्यावर आलीच नाहीत.

ऱ्यापैकीच तिचा भावी पती तावरेझबरोबरचे जीवनरेखाने कित्येक वर्षांनी पडदा पाह्यला. (आणि त्याबरोबर त्याच्या शादीची बातही पक्की झाली) देव मुखर्जीबरोबरचे 'आगण' मात्र कधी पडदा पाहील तेव्हा पाहील. फरिदाची पिक्चर्स एकूणच निर्माते 'बॅड डेट' समजतात की काय कुणास ठाऊक ?

टमटमीत गाल, हसणारे ओठ, फुललेली नजर, वाटोळा सूर्यफुलासारखा चेहरा, खणखणीत धारदार आवाज अशी ही अदाकारी फक्त ठेंगूपणाचा अपगपणा घेऊन पडद्यावर आली आहे. काहीसे घांदरटपणे डायलॉग टाकणे, कोवळ्या वयातील अॅडोलेसस भाबडेपणाने हसणे, रागावणे, रुसणे, नटखटपणा करणे आणि एखाद्या जसबाती प्रसगामध्ये सारे दुःख–यातना आपण जहरासारख्या प्राशन करून सहन करण्याचा प्रयत्न करीत आहोत असे एक निवात एक्स्प्रेशन पेश करणे ह्या काही फरिदाच्या अदाकारीच्या खास ट्रिक्स आहेत. ह्या अदाकारीमुळेच ती अत्यत सहजपणे स्पॉटेनियस होऊ शकते. 'पारस'मधला एक प्रसग पहा. महमूद आणि ती रस्त्यावर आहेत. महमूद रडघा वागतोय. तर ती खेड्यातील अत्याचाराने पोळून शहरात आली आणि आपल्या भावाला शोधून काढते आहे. 'चल, मी भावाला शोधायला निघाले–तू काय करणार आहेस ?' रडघा महमूद तिला रडून दाखवतो. तेव्हा ती म्हणते, 'बस रडत.' त्यावेळी तिच्या तोंडून जो 'रो !' हा शब्द बाहेर पडतो, त्यावेळी त्या शब्दातून तिच्या साऱ्या यातना बाहेर फुटून निघतात. 'पारस'मध्ये तिचा मुकाबला महमूदशी होता. आणि फिल्मफेअर अवॉर्डसाठी गरम मसाला अरुणा इराणी (कारवा) शी होतो. दोघांच्या समोर ती संपूर्ण ताकदीने उभी राह्यली आणि फिल्मफेअर अवॉर्ड डीझर्विंगली मिळवले (–असे क्वचितच होते !) गेल्या पाच-सहा वर्षांच्या काळामध्ये फरिदाने डझनभर चित्रातच लहान लहान भूमिका केल्या आहेत. त्यामुळेच तिच्या अदाकारीच्या सामर्थ्याचा मुमताझ प्रमाणे अपव्यय झाला नसेल, परतु तिची जवळ जवळ प्रत्येक भूमिका सेल्युलाईडवरच्या शिल्पासारखी लक्षात राह्यली आहे. 'सेक्स' ला आव्हान देण्यासारखे तिच्यामध्ये काहीही नसताना, ती असलेली प्रत्येक फ्रेम नेहेमी ताजी आणि जीवत आणि आकर्षक वाटली. 'मिसफिट्स' क्लार्क गेबल मेरिलीन मन्रोचा ताजेपणा पाहून म्हणतोना 'तू सूर्योदयासारखी पेश होतेस.' फरिदा काही मेरिलीन मन्रो नाही. अगदी 'सूर्योदयासारखी ती पेश होते' असे म्हणणे अतिशयोक्ती वाटत असेल तर– तरी तिच्याविषयी एवढे नक्कीच म्हणता येईल की ती पडद्यावर पेश होते, त्यावेळी पडद्यावर जान भरते. तुम्हाला ती तुमच्या जीवनात वावरावी असे वाटावे इतका तिच्यावर लोभ जडतो. 'अचानक'मध्ये विनोदखन्ना मृत्यूच्या शय्येवर असताना त्याला नाही का नर्सबाई फरिदाचा असाच लोभ वाटत. ती आपली नर्स असावी, ती आपली बहीण असावी, (मजबूर) सेक्रेटरीण असावी (प्यार की कहानी) किंवहुना 'जीवनरेखा'मध्ये तावरेन आणि जलाल आगा तिला किडनॅप करतात त्याप्रमाणे किडनॅप केल्यावर, तिनेच आपल्याला चकमा द्यायला सुरुवात करावी असे वाटत रहाते. (हा. एक गोष्ट. वीरेद्र सिन्हाने तिला 'बुनियाद'मध्ये कॅब्रे करायला लावला होता. तो प्रसग पहाणे मात्र आपल्यावर येऊ नये !)

अलीकडेच फरिदाचा आणि ताबरेजचा वाङ्निश्चय झाला आहे आजची सिनेमा नट्यांची लग्ने आणि सिनेमातून निवृत्त होण्याच्या जमान्यात तिच्या लग्नाचा आणखी एक धक्का बसला असता. पण, आपण लग्नानतरही कामे करीतच रहाणार म्हणून तिने आपल्याला दिलासा दिला आहे. ही लडकी कमालकी आहे. तनुजासारखी जबरदस्त अदाकारी. आणि पडद्यावर दिसली नाही तर आम्ही काय योगिताबालीची आणि परवीन बाबीची कामे पहायची. 'मजबूर'मध्ये अमिताभ गाण म्हणतोना– मी सार काही पाहू शकेन– पण तुझ्या डोळ्यात पाणी आलेल पाहू शकणार नाही. त्याप्रमाणे फरिदाला सांगावस वाटत– 'मी दुसऱ्या अभिनेत्र्यांच्या कसल्याही भूमिका पाहीन पण फरिदा रिटायर झाल्याच मात्र आपल्याला सहन होणार नाही.

¤ ¤


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

**वार्षिक : छत्तीस रुपये**

**सहामाही : वीस रुपये**

**परदेश : (जलमार्ग)**

**पंचावन रुपये**



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. **श्री. ग. माजगावकर**

पृष्ठ ३ वरून

# मुक्काम शहादे : कामात खंड नाही

त्यानंतर फरक पडला आहे. घोटाणी, बाटपाणी, ता. शहादा या भागातही अन्याय आहे पण तेथील लोक अजून धिटाईने अन्यायाविरुद्ध उभे रहाण्यास तयार नाहीत.

दि. ५ रोजी रामपूर, ता. शहादा येथे किरसिंग मोरे याना चर्चेसाठी चला असे म्हणून खोलीत मारहाण झाली. पोलीस तक्रार दिली व मोर्चा आयोजित होणार होता. पण तो कँप हलविला गेला. आता हा अहवाल लिहीत असताना तेथे परत एस. आर. पी. आल्याचे कळते.

दि २३ रोजी तळोदा येथे मोर्चा झाला. या मोर्चामुळे त-हावद धानोरा रस्ता सुरू झाला व ज्या ग्रामपचायतींना पैसे दिले होते त्याची यादी मिळविली व त्याच्यावर दडपण आणण्याचे ठरले. दि. १ ऑक्टोबरला शहादा येथे मोर्चा झाला व सरकारी पातळीवरच्या कामांची एस्टिमेटस् पाठविली गेली व त्यासाठी कलेक्टरकडे प्रयत्न करण्याचे बीडीओने मजूर केले.

या सर्व मोर्चामध्ये धान्यदुकाने, गावातील बधाराचे प्लॉटस्, तलाठ्याविरुद्ध तक्रारी याही माडून, लोणखेडा, सावळदा इत्यादी दुकाने रद्द होऊन नवीन विश्वासू माणसाची दुकाने सुरू होतील असे दिसते.

दि. ३० ऑगस्ट रोजी धुळवद, ता. नदुरबार येथे तरुण मडळ शिबिरातील मुले व गावकरी यानी सरपचाच्या घराला घेराव करून १ महिन्यात कमी दिलेल्या वेतनातील फरक, सालदाराना लहान मुलांना कमी दिलेले साल वसूल करून घेतले. यावेळी बीडीओ, तहसीलदार, फौजदार हजर होते.

या महिन्यात याच गावातील लोकानी गावाबाहेर जाणारे धान्य रोखून गावातील मजुराना विकण्यास भाग पाडले. असेच गावोगावी केले जाईल.

शहाद्यात डामरखेडा भागातील याद्या करून रीतसर तक्रारी बीडीओकडे दाखल केल्या. तळोद्यातही दाखल केल्या. पण त्यातून फारसे निघणारच नाही. पी. के. पाटलानीही कबूल केल्याप्रमाणे काहीच केले नाही. (अपेक्षित होते) सध्या मजुरीचा हगाम फारसा नसल्याने याबाबत फारसे दडपण तयार होणार नाही.

### छायाताईंचे दौरे व सभा

छायाताई (कै. अवरसिंगाच्या पत्नी) व पाहुण्या वसुधाताई यानी नदुरबार तालुक्याच्या तापी काठावर भेटी दिल्या व गावोगावचे प्रश्न सोडविले. येथील वाढता प्रश्न, पीक सरक्षणाचा होता त्याबद्दल कोरीठ येथे दि. २७ ला जाहीर सभा झाली. तरुण मडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्कृष्ट भाषणे केली.

या अगोदर वडगाव तालुका व जमाना भाग, अक्कलकुवा तालुका या भागात छायाताई फिरून आल्या व तेथील श्रमिकांना सघटना करण्याची जाणीव करून दिली. तेथील प्रश्न हाताळण्याची सातपुडा सर्वोदय मडळाने जबाबदारी घेतलेली आहे. दि. ५ रोजी काझीपूर येथे तलावडी आश्रमशाळा उडविण्याविरुद्ध सभा झाली. काझीपूर गावकऱ्याना अपप्रचाराने दूर ठेवण्यात आले पण सभेनतर त्याचाही पाठिंबा मिळाला.

श्री गणपतीची स्थापना शहादा ऑफिसवर झाली ७ दिवसानी मोठ्या मिरवणुकीने ढोलाच्या नी घोषणाच्या गजरात विसर्जन झाले. आपली मिरवणूक एकतर भाग घेणारे खेड्यावरचे लोक आणि घोषणा यामुळे वेगळी उठून दिसत होती. गणपतीबाप्पा मोरया, श्रमिक सघटना बाधूया। गणपतीबाप्पा कष्ट करू, भाडवलशाहीला नष्ट करू इत्यादी घोषणा होत्या. लोकाच्या पाठिंब्याने व पूर्ण शाततेने गणपती समारभ पार पडला. खेड्यावरही जागोजागी सघटनेतर्फे लोकानी गणपती बसविले व तेही शाततेने पार पडले.

या महिन्यात ' इन्किलाब ' प्रसिद्ध झाला नाही. पूर्वीचा इन्किलाब सपविण्याचे ठरले. या महिन्यात कुमार शिराळकराचे ' ऊठ वेड्या तोड बेड्या ' हे मध्यमवर्गीय तरुणाना उद्देशून लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध झाले.

### कार्यकर्ते व पाहुणे

या महिन्यात कुमार, प्रकाश सामत हे दोघेही सुरुवातीपासूनच टायफाईड, अॅमिबीक डिसेन्ट्रीने आजारी होते दि २२ रोजी त्याना घेऊन विश्वास काकडे पुण्याला गेले. आता वृत्तांत लिहीपर्यंत तिघेही तिथेच आहेत. प्रकाशची प्रकृती सुधारत आहे व विश्वासची शारिरीक तपासणी सुरू आहे. दि १६ ला तुळशी परब शारिरिक तपासणीसाठी मुबईस गेले. धुळ्याचे मनोहर पवार आजारी होते. दिलीप नाईक बेळगावचे अनुभवासाठी आलेले कार्यकर्ते १७ तारखेपासून फ्लूने आजारी होते

दि. १ ते ६ पर्यंत विजय कान्हेरे मुबई, पुणे येथे जाऊन आले. मदतीसाठी सिनेमा आयोजन, पुणे येथे श्री. शरद कुलकर्णी, सुलभा ब्रह्मे, आपल्या जर्मन सहानुभूतीदार श्री. मारिआ याच्याशी बोलणे झाले. दि ५ नतर कीरसिंग मोरे उपचारासाठी धुळे येथे गेले त्याचे बरोबर तुळशी परबही होते.

धुळ्याचे तीन कार्यकर्ते अनुभवासाठी येथे आले होते. सुभाष मोरे यानी धुळ्याला धदा करून अभ्यास करण्याचे, सजय मालडे यानी धुळ्याला राहून त्याच्या लघु उद्योग स्थापण्याच्या कामास लागावे व मनोहर पवार ऑक्टोबर अखेरपर्यंत राहून परत जातील असे ठरले दि. १८ नतर वरील दोघे कार्यकर्ते परत गेले.

दि. १ सप्टेंबरला सुदर राजन, इलस्ट्रेटेड वीकलीतर्फे येऊन गेले. डामरखेडा, शहाणा येथील मोर्चा त्यानी बघितला. दि. ४ ते ६ जपानी राजकारणाचे प्राध्यापक श्री टाकावटाके हे दौरा करून गेले. प्रकाशा, गागापूर या भागात फिरले. ते भारतातील गाधीवादी चळवळीचा अभ्यास करीत होते. रणागण साप्ताहिकाचे सपादक अनिल बर्वे तळवे (तळोदा) वगैरे भागात फिरले. त्यानी साप्ताहिकात चळवळीस जागा देण्याचे मान्य केले. अमेरिकन रॉय वॉलफोर्ड व कुमार सप्तर्षी या महिन्यातच येऊन गेले, दि. १ ला बेळगावचे सुधीर जोगळेकर, दिलीप नाईक आले. दिलीप येथे

राहिला, सुधीर जोगळेकर मुंबईस रवाना झाले. ५ सप्टेंबरला कु. वसुधा धागमवार, पीएच्डी (कायदा) आल्या. त्या येथे कायदेशीर सल्ला देण्याचे काम करतील व त्यादृष्टीने त्या अनुभव घेत आहेत.

वटहुकुमामुळे लोकांची विचारणा वाढली होती. सरकारी अधिकाऱ्यामध्येच त्याच्या उपयोगितेची, कामकाजाची नक्की माहिती नाही. धुळ्याचे कलेक्टर तात्पुरते होते. श्री. शरद कुलकर्णी त्या विषयी एक पुस्तिका लिहीत आहेत. (ही पुस्तिका आता ग्रामायनतर्फे प्रकाशित झालेली आहे) त्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर अर्ज लिहिण्याचे काम सुरू होईल. या पुस्तिकेचा संधीसाधू समाजकारण्यांना बराच गैरफायदा होईल अशी शक्यता प्रगट केली जाते. धुळे येथील कलेक्टराशी चर्चा करण्यासाठी मुलाखत घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ☐

## माहे ऑक्टोबर

या महिन्याच्या सुरूवातीसच चाळीसगांव तालुक्यांतील ( जि० जळगाव ) मेहुणबारा गावी श्रमिकांच्या सभेत अशोक मनोहर यानी सस्थेचे प्रतिनिधित्व केले व आपल्या चळवळीची माहिती दिली.

या महिन्यात कार्यकर्ते बरेच कमी होते. तरीही उरलेल्या कार्यकर्त्यांनी नेटाने काम सुरू ठेवले. दि. १५ ला वार्षिक सभेनतर प्रथमच गोविंदराव शिंदे आले व कार्यकर्त्यांच्या तालुकावार सभा झाल्या.

कुमार शिराळकर व प्रकाश सामत याना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलेले विश्वास काकडेही याचवेळी परत आले.

गोविंदरावाबरोबरच श्री. बाबा आढाव व श्री. विजय तेंडुलकर आले होते. त्यांनी या भागाचा पाहाणी दौरा केला. बाबा आढाव यानी समशेरपूर इत्यादी गावातील जातीचा प्रश्न सोडवण्याचे आपले प्रयत्न पाहिले व आपल्या आर्थिक झगड्यातून जातीच्या भिंती तोडण्यात आलेले यश त्यांनी बघितले.

विजय तेंडुलकर यानी 'व्हायोलन्स' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्रकाशा हल्ल्यातील सबधितांच्या मुलाखती घेतल्या.

या महिन्यात छायाताओ, वहारू सोनावणे यांनी कुरंगी, लोहारा या भागात दौरा करून नवीन चैतन्य आणले व रायखेड, ता. शहादा येथील हवालदाराच्या लाच खाण्याच्या प्रवृत्तीविरूद्ध झगडा देण्याचे ठरविले.

दि. १८ रोजी रायखेडला सभा होऊन मोर्चा झाला व हवालदाराने खाल्लेली लाच परत वसूल केली.

दि. १६ रोजी विखरण, ता. नदुरबार येथे पीक सरक्षण सोसायटीने घेतलेल्या बेकायदेशीर दडाविरुद्ध सभा व मोर्चा झाला आणि दडाचे पैसे चेअरमनकडून वसूल केले. या व अितर भागात पीक सरक्षण सोसायट्या परत दादागिरीचे प्रयत्न सुरू करायला बघत होत्या. त्या विरुद्ध चळवळीची ही सुरुवात होती.

नतर ताबडतोब काकर्दे, ता. नदुरबार येथेही दंडाचे पैसे पीक संरक्षण सोसायटीकडून वसूल करण्यात आले.

श्री अण्णासाहेब सहस्रबुद्धे, मधुभाई पडित यांनी दि. २१ पासून या भागाचा दौरा केला. प्रकाशा, कुडावद (ता. शहादा) येथे श्रीमत शेतकऱ्यांच्या बैठका व श्रमिकांच्या सभा झाल्या.

अण्णासाहेबानी भांडवली शेतीचे अर्थशास्त्र शेतकऱ्याना समजावले. कुडावदला फारच थोड्या अवधीत शेकडोची मोठी सभा झाली.

अण्णासाहेबांची कार्यकर्त्यांशी चर्चा झाली व वारवार चर्चा व्हाव्यात असे कार्यकर्त्यांनी सुचवले. रोजगार हमी, रचनात्मक काम ( को-ऑपरेटिव्ह शेती सोसायट्या यांना रूढार्थाने रचनात्मक म्हटले जाते ) अित्यादी विषयांवर चर्चा झाली.

दि. १ ला शहाद्याला मोर्चा झाला व लोहारा तलावाचे काम सुरू झाले आणि अितर कामांची एस्टिमेट्स काढून वर पाठविण्याचे बीडीओने मान्य केले. दि. २४ रोजी कलेक्टर धुळे यांच्याशी रोजगार हमीबद्दल चर्चा झाली व सर्व तालुक्याची दोन वर्षाची कायम काम मिळण्याची योजना तयार करण्याचे त्यानी मजूर केले व काम काढू शकणाऱ्या सर्व खात्याना तशा सूचना गेल्याचे कळते. दि, ३० रोजी महाराष्ट्र बंदच्या वेळी तीनही तालक्यात मोर्चे-घेराव झाले. व सर्व ठिकाणी कामाची मागणी पुढे मांडली गेली व तीनही ठिकाणी शेतीचा हंगाम संपताना नोव्हेबर अखेरपर्यन्त कामे सुरू करण्यासाठी पावले उचलली जातील असे आश्वासन मिळाले.

औरंगपूर, ता. शहादे येथे अेक दिवसाचा सप झाला व मजुरी वाढीचा करार होऊन सप मिटला. या गावात १९७२ सालापासून मजुरांना फार दडपणाखाली ठेवले होते. प्रकाशा, ता. शहादा व परिसरात ज्वारी कापणी, ऊस लावणीचे भाव मजुराच्या सघटित असण्यामुळे दरसालपेक्षा जास्त मिळाले. शिंदे ता. नदुरबार येथे सप झाला व किमान वेतनप्रमाणे मजुरी दिली नव्हती. तो. १ महिन्याचा फरक सर्व चुकार मालकांकडून रोख वसूल केला. नतर दुसऱ्याच दिवशी ताबडतोब पीक सरक्षण सोसायटीच्या वॉचमन लोकांनी मिलाटीवर हल्ला केला. पण आता शातता आहे व कराराप्रमाणे काम सुरू आहे.

दि. १६ रोजी कलेक्टर यांचेशी चर्चा झाली व कायदेशीर व्यवहाराचे अर्ज सुरू करण्याचे ठरले. काही प्रश्न कलेक्टर, सचिवालयाशी चर्चा करून नतरच उत्तर देऊ शकतील.

### शिक्षण

सुरू असलेल्या रात्रीच्या शाळासाठी बाबा आढाव यांनी कंदील दिले. दि. ३० च्या घेरावमध्ये महाराष्ट्रातील इतर-चळवळी, कामगार, मध्यम वर्गीयांचे वेतन गोठवून टाकणारा वटहुकूम, सरकारने फक्त आदिवासीसाठी केलेला जमिनीचा कायदा व त्याबद्दल आपल्या मागण्या यांची लोकांना माहिती दिली.

या महिन्यात दि. १२ ते १६ विक्रम कान्हेरे बाहेर गेले होते. विश्वास काकडे यांनी आर्थिक मदतीचे प्रयत्न वाढावे म्हणून मुबई पुणे येथे प्रयत्न केले.

या महिन्यात केन्द्रिय दुष्काळ निवारण समिती, महाराष्ट्र (पुणे) या समितीला रोजगार हमी कामासाठी आपण जे प्रयत्न करतो ते व त्यातून सुरू झालेली कामे दाखवून मदतीसाठी अर्ज केला. त्यांचे उत्तर आले. त्यानी रु. २,०००-०० चा चेक पाठविला व येथील कामासबधी नियमित रिपोर्ट मागवले आहेत.

या महिन्यातील सर्व सभामधून छायाताअीनी प्रमुख भाषणे केली. कुरंगी, गोगापूर भागाचा दौरा केला. नदुरबारच्या फौजदाराच्या वाढत्या अन्यायखोरीबद्दल त्यानी टीका केली.

दि. २८ रोजी बोरद, ता. तळोदे येथे सभा झाली. या सभेत आपसात फूट पडण्याची कारणे, दारू, जुगार सुरू करण्याचे सालदाराचे व त्याचे हस्तकाचे प्रयत्न हाणून पाडणे, निवडणुकातून गरिबांना पैसे वाटून फूट पाडणे हे विषय माडले गेले.

रोजगार हमी, जमिनी, पीक सरक्षण, पोलीस, मजुरी या प्रश्नांवर तीनही तालुक्यांत या महिन्यांत जोर दिला गेला. ☐